वार्षिक ... ... ... ... ...८
कालभवेर " ... " ...८
किरकोळ अंकास........................४

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे वेळेस.........०।


Per annum in arrears 7 "1Rs. 8 as.
Six monthly...........3 " 8 as.
Single copy.............................. as.

Advertisements
Below 10 lines...2Rs
per line over10... 4as.
Repetition perline3as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

VOL XXIII — AKOLA MONDAY I APRIL 1839 — NO. 12

वर्ष २३ — अकोला सोमवार तारीख १ माहे एप्रील सन १८८९ इ० — अंक १२

### जाहिरात.

सर्वत्र लोकांस प्याराबाई नवरे नथमल मारवाडी राहाणार निंबकरदे याजकडून जाहिरात देऊन जाहिर करण्यांत येतें कीं, माझा नवरा नथमल व यांस दोन बायका माझें मोठ्या सवतीचा मुलगा सुखदेव, व माझी खाशी मुलें दोन आहेत माझा नवरा मयत झाल्यावर नवऱ्याची दुकानदारी वगैरे सर्व खटला चालत आल्या प्रमाणें चालवावा नाहीतर सारख्या तीन वाटण्या कराव्यात अशा करितां आम्ही पंच नेमिलें त्यांची नांवें तनसुकराय श्रीराम मारवाडी शेगांव, गणेशदास भिवराज मारवाडी शेगांव, संभुराम गोविंदराम मारवाडी खामगांव, धनराज उदेभान मारवाडी अगर, जमनादास गिरधारी लाल मारवाडी आकोलें. येणें प्रमाणें. पंचांनीं माझें नवऱ्या मागें खटला दुकानदारी चांगली न चालवितां माझा सावत्र मुलगा आपलाला करून घेऊन सर्व जिनगी दुकानदारी वगैरेचा सत्यानाश करीत आहेत. ह्मणून मी सदरील पंच यांस पंचांतून काढून टाकिलें आहे. कारण या पंचाचें जे काम करण्याचें तें त्यांच्या हातून निलकस होत नाहीं. ह्मणून आह्मी या जाहिरातीनें त्यांचा सर्वांचा पंचपणा रद्द केला आहे. ह्मणून दिली जाहिरात सही.

तारीख २८ माहे मार्च सन १८८९ इसवी.

( सही )

सहीची बांगडी प्यारबाई नवरे नथमल राहाणार निंबकरदे इचे हातची असे.

### नोटीस.

चिरंजीव सुखदेव नथमल मारवाडी राहाणार निंबकरदा तालुका बाळापूर यांस व तनसुकराय श्रीराम मारवाडी शेगांव, गणेशदास भिवराम मारवाडी शेगांव, संभुराम गोविंदराम मारवाडी खामगाव, धनराज उदेराम मारवाडी अगर, जमनादास गिरधारीलाल मारवाडी अकोलें या सर्वांस नोटीस देणार प्याराबाई नवरे नथमल मारवाडी राहाणार निमकरदे नोटीशीनें असें कळवितें कीं, सुखदेव हा माझा सावत्र मुलगा आहे. व माझे खास मुलगे दोन लहान आहेत. माझ्या नवऱ्याची दुकानदारी वगैरे सर्व खटला नवरा मेल्या मागें चालत आल्या प्रमाणें चालवावा. ह्मणून सदरील पाच असामीस पंच नेमिले. परंतु पंच व तुह्मी एक होऊन सर्व जिनगी दुकानचा सत्यानाश होत आहे. तर ही नोटीस पावल्या पासून चार दिवसाचे आंत माझे नवऱ्याची सर्व दुकानदारी येणें वगैरेच्या वाटण्या रीती प्रमाणें तीन वाटण्या करून द्याव्या. आह्मास पंचाचा वगैरे कोणाचा इतबार नाहीं. आह्मी सदरील मुदतींत वाटण्या झाल्या नाहीं तर आह्मी रीती प्रमाणें सरकारांत काम चालवून अखेर निकाल होई पर्यंत जें नुकसान वगैरे होईल तें सर्व व या नोटीशीचा खर्च असें भरून घेतलें जाईल ह्मणून दिली नोटीस सही तारीख २८ माहे मार्च सन १८८९ इ०

( सही )

सहीची बांगडी प्याराबाई नवरे नथमल मारवाडी रहाणार निमकरदे इच्या हातची असे.

### नोटीशीचे उत्तर

पीरदलाल ईश्वरदास गुजराथी साहु दुकान पेठ बाळापूर यांसः—

नोटीस देणार सुंदरलाल दुलीचंद गुजराथी साहु दुकान बाळापूर यांजकडूनः—

नोटीशीनें असें कळवितों कीं, तुह्मी ता० ११ माहे मार्च सन १८८९ इसवी रोजीं शुद्धवऱ्हाडी पत्रांतून नोटीस दिली ती पावली सर्व मजकूर समजला. तुह्मी दुकानचे कागदपत्र घेऊन जाऊन आज नऊ महिने झाले परंतु तुह्मी अजून हिशोब वगैरे कांहीं न करितां उगीच भलताच नोटीस दिली व आपण तारीख ११ च्या नोटीसींत लिहिलें आहे कीं, भगुशींग चयनशींग याजला सर्व कागदपत्र वगैरे देऊन पावती घ्यावी वगैरे त्यांस तह्मी जे कागदपत्र नेले आहेत, त्या येथीं सदरहु भगुशींग याचा कोणच्या ही प्रकारचा संबंध नव्हता. व आतां आह्मी हा तसें करण्यास कबूल नाहीं. कारण दुकानदारी मध्यें आपला व माझा हक्क सारखा आहे. असें असून आपण मजवर हुकमत केली हे कोणच्या ही प्रकारानें बरोबर नाहीं. आतां आपल्यास असें कळवितों कीं, सदरहु दुकानच्या संबंधानें कागदपत्र, वहीखातें वगैरे सर्व कागद तुह्मी आह्मी समक्ष बसून निकाल करून दुसरे कोणाचे मध्यें पडण्यास कारण नाहीं. आतां आह्मी कळविल्या प्रमाणें आपण करण्यास कबूल नसाल व तारीख ११ च्या नोटीशी प्रमाणें आपण सर्व तजवीज कराल तर आह्मी नफा नुकसान वगैरे बद्दल कोणच्या ही प्रकारें जबाबदार नाहीं. हे आपल्यास कळावें ह्मणुन दिली नोटीस सही तारीख २७ माहे मार्च सन १८८९ इ०

( सही. )

सुंदरलाल दुलीचंद साहु गुजराथी राहणार बाळापूर दस्तुर खुद.

### पत्रव्यवहार.

या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

वाशिम ता० २८—३—८९ इ०

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

कृ० सा० न० वि० वि० हवा अगदीं बिघडली आहे. सर्व प्रकारचे रोग डोकीं वर उचलूं लागलें आहेत. महामारी हळू हळू आपलें पाऊल पुढें टाकीतें दररोज एखादे मनुष्य बळी पडतें, असें आढळतें. परंतु ही मोठी दुःखाची गोष्ट आहे कीं अलिकडे असा कांहीं चमत्कार आहे कीं, मनुष्य माहामारीच्या आजारानें आजारी झाले कीं, त्याला लागली वरांतून जबरदस्तीनें गांवाबाहेर चामुंडेचे देवालय आहे तेथें नेऊन टाकतात. अर्थात तेथे औषधाची अगर रहाण्याची अगर निवाऱ्याच्या घराची अगर सोबतीची कांहींच तरतूद नाहीं. तो मनुष्य जबरदस्तीनें तिकडे नेला कीं, समजावें हा फार करून जिवंत तर येत नाहीं. ही व्यवस्था पोलीसचे शिपाई करीत असतात. आतां पोलीसचे शिपायांना हुकूम करणारा कोणतरी असलाच. असें ह्मणतात कीं, मे० सिव्हिलसर्जन साहेब बहादुर यांचें असें मत आहे कीं कॉलरा हा स्पर्शजन्य रोग आहे. परंतु आजपर्यंत हिंदुस्थान सरकार, विलायत सरकार व युरोपिन सरकारें या गोष्टीचा शोध लावीत आहेत परंतु त्यांना ही याचें कारणाचा शोध लागला नाहीं असें ह्मणतात. तसेंच गेल्यावर्षी अकोलें मुक्कामीं मे० आरदेसर दिनशाजी ए० अ० क० सा० यांचें कोर्टांत कॉलरा स्पर्शजन्य आहे किंवा कसें याचे बद्दल मुकद्दमा चालला होता तेव्हां डिफेन्स तर्फेच्या वकिलानें या बाबतींत अनेक प्रकारचीं पुस्तकें वाचली व अनेक प्रकारचे आधार पुढें आणून सिद्ध करून दाखविलें कीं, कॉलरा स्पर्शजन्य नाहीं. असें असता मनस्वीपणाच प्रकारचे मतानें लोकांना जर त्रास होईल हें कारण कोण कोणच्या अनुभवावरून आहे कोण जाणे. चामुंडेचें देवालय रानात आहे गांवापासून बरेच लांब आहे तेथें कांहीं नाहीं. अशा ठिकाणीं मनुष्याला नेऊन टाकणें ह्मणजे मृत्यूच्या स्वाधीन करणें आहे. आतां असा प्रकार असेल तर मग गांवखेड्यांत असल्यानें अनेक उपाय करितां येतात. आतां सरकारला लोकांच्या जिवाची कदर असेल तर चामुंडेचे ठिकाणीं औषधांची रहाण्या, करितां निवाऱ्याच्या गृहाची पहाऱ्याची व अनेक ज्या संकट समईं लागतील त्या सोईची अगोदर सोय करावी मग तिकडे मनुष्यें पाठवित जावें. तिकडे हुकूम करावा.नाहीं तर या गोष्टी तेथें नसतां अशाच्या जे रावर गरीब रयतेच्या जिवाला धोका वाटेल हें खरें कीं होईल. शिवाय कॉलरा स्पर्शजन्य नाहीं असें अनेक मेहनत करून सिद्ध करितां येतें असें गेल्या साली अकोलें मुक्कामीं ठरलेंच आहे. असें असतां तो स्पर्शजन्य आहे असें घेऊन चालणें ह्मणजे अनेक मोठ्या मोठ्या आधारांच्या विरुद्ध जाणें होय. तसेंच हल्लीं धाकट गल्ली जवळची विहीर बंद करण्यांत आली आहे. हल्लीं पाणी मिळत नाहीं. अशा समईं विहिरीचें पाणी बंद करणें तितीं बरें लोकांना दुःखांत टाकण्या सारखें आहे त्या विहिरीच्या पाण्या पासून रोग जर होतो असें जर असेल तर आज पर्यंत त्या पासून कां झाला नाहीं. इतक्यातच कां होऊं लागला. असें एकूण अलीकडे मोठे चमत्कार होतात. हें पाहून मोठे आश्चर्य वाटतें असो. ज्याला जें बरें वाटेल तेंच तो करतो.

मि. नांग उमरावतीचे वकील यांची स्वारी येथें आली आहे. काल रात्रीं त्यांनीं श्री बालासाहेबांचे मंदिरांतील बाहेरचे फरशीवर पुढील मागत (Municipal Elecctions) या विषयीं लोकांना बोधपर व्याख्यान दिलें. त्या प्रमाणें कर्वी लोकांच्या मनावर उतरतो होऊन चांगले लोक निवडले जातात किंवा लोकल बोर्डा प्रमाणेंच निवड होते ते आतां लवकरच समजेल. मात्र इतकें खरें आहे कीं लोकांना Elections चा अर्थ जर चांगला समजला तर खरोखर बहुतकरून चांगली निवड होईल ज्या लोकांना निर्भीडपणें मत देतां येणार नाहीं. त्यांनी मेंबर होण्यास भरीस पडून कामाचा बोजवार करून बेऊं नये.

आपला
"स"

वऱ्हाडसमाचार.

मिती चैत्र शुद्ध १ शके १८११

कलकत्यास स्पेनसर साहेबांनीं ता० १९ मिनहूरीजीं आपल्या विमानारोहणाचा प्रयोग करून दाखविला. प्रयोग पाहाण्या करितां व्हाइसराय साहेब व इतर सर्व लोक आले होते. या पूर्वी त्यांनीं पुष्कळ वेळां खटपट केली परंतु त्यांनां यश आलें नाहीं. त्या प्रसंगीं लोक पैसे देऊन पाहण्या करितां आले होते परंतु स्पेन्सर साहेबांचे सर्व श्रम व्यर्थ गेल्या मुळें लोकांना आपले पैसे व्यर्थ गमावून निराशेनें परत जावें लागलें. याही वेळेस लोक पुष्कळ जमले होते व पूर्वी प्रमाणेंच स्पेनसर साहेब आपणास फसवितात काय असें वाटून लोकांना स्पेनसर साहेबाची फजिती उडविण्याचा विचार या-

लविली. ही गोष्ट त्यांना सहन होऊन त्यांनीं असा निश्चय केला कीं प्राण गेला तरी बेहेतर परंतु या वेळेस विमान उडवून दाखवावयाचेंच. त्या प्रमाणें त्यांनीं १० मिनिटाच्या आंत वाटेल तशी खटपट करून घाईघाईनें लोकांच्या फजितीस भिऊन विमान उडविण्याची खटपट केली व प्राणावर उदार होऊन विमानारूढ झाले. विमानारूढ होतांच विमान आकाश मार्गानें लागलें व थोडक्याच वळांत लोकांना दिसेनासें झालें व कोणच्या दिशेला गेलें हेंही कळेना त्यावरून लोकांना स्पेनसर साहेबांची फार काळजी लागली. हजारों तर्क लोक करूं लागले परंतु खरी बातमी ह्मणून कळेना. व्हाईसराय सुद्धां विचारांत पडले. स्पेनसर साहेबाचें विमान कुठें तरी पडलें. असावें व त्यामुळें स्पेनसर साहेबाचा घात झाला असावा असें सर्वांस वाटलें. त्यावरून शेकडों ठिकाणीं तारा केल्या. कोणी सांगावें त्यांचें विमान अमुक दिशेनें गेलें कोणी सांगावें तमुक दिशेनें गेलें परंतु अमुक ठिकाणीं तें सुखरूप उतरलें अशी कांहीं बातमी लागेना. अशा विवचनेंत कलकत्तावासी

लोकांचे दोन दिवस गेले शेवटीं मागच्या गुरुवारीं ह्मणजे ता. २१ रोजीं कलकत्या पासून १६ मैलावर हुसेनाबादेस ते सुरक्षीत आले अशी बातमी लागली. त्यावरून स्टेटसमन पत्र कारानी त्यानां आणण्या करिता स्पेशयल ट्रेन पाठविली व त्या प्रमाणें ते तींत बसून ता. २२ रोजीं सकाळीं कलकत्यास सुरक्षीत येऊन पोहोचले. कलकत्यास आल्यावर ते ज्या हाटेल मध्ये उतरले होते त्या हाटेल भोंवतीं त्यांनां भेटण्याकरितां थवेच्या थवे जमले. व्हाईसराय साहेबांनीं ही त्यानां आपली गाडी पाठवुन बोलवून घेतले व्हाईसराय साहेबांचें व त्यांचें सुमार एकतास भाषण झालें. कलकत्यास आजकाल जिकडे तिकडे स्पेन्सर साहेबांची हकीकत चालूं आहे प्रयत्नांतीं परमेश्वर ही म्हण कांहीं खोटी नाहीं.

---

राजकीय खटपटीस सरकारी नोकरांनीं मदत करुनयें, अशा बद्दल हिंदुस्थान सरकारानीं सर्व प्रांतिक सरकारास लिहिलें आहे. आजच हा विचार निघण्याचें कारण राष्ट्रीय सभेशिवाय दुसरें दिसत नाहीं ह्या विचारावरून असें दिसतें कीं सरकारी लोकाचें अंग असल्यानें लोक राजकीय खटपटीस सरकारी लोकांच्या भिडेनें मदत करीत असतील व सरकारी कर समजून कदाचित वर्गणी देत असतील अशा प्रकारचा संशय आल्यावरून किंवा प्रत्यक्ष कळाल्यावरून हिंदुस्थान सरकारांनीं ही विचारणा केली असावी. हिंदुस्थान सरकारचें हें करणें फार यथार्थ असें आह्मी समजतों. परंतु कोणचीही गोष्ट निःपक्षपातानें झाली पाहिजे. ज्या प्रमाणें सरकारी नौकरांनीं राजकीय कामास मदत न करण्या बद्दल सरक्युलर करणें इष्ट आहे. त्याच प्रमाणें त्यांनीं व्यत्यय न करण्या विषयीं सरक्युलर करणें अगदीं इष्ट आहे. आमचें निःपक्षपाती सरकार अशी एकपक्षीं गोष्ट करणार नाहीं अशी आमची पूर्ण आशा आहे. हिंदुस्थान सरकारच्या सांगण्यावरून मुंबई सरकारनीं सर्व खात्यांतील अधिकाऱ्यांनीं अशा खटपटीस आपल्या मुख्य आफिसारच्या अनुमोदना शिवाय मदत करू नये वर्गणी जमा करूं नये अशा बद्दल लिहिलें आहे. त्याच प्रमाणें आमच्या इकडे सुद्धां सरकारी इमारती राजकीय सभेस देऊं नये ह्मणून मे. डायरेक्टर साहेबांनीं सरक्युलर केलें आहे. राष्ट्रीय सभेस सरकारी मदत जितकी न मिळेल तितकी बरी.

---

क्राफर्ड प्रकर्ण व क्राफर्ड साहेबांचा निकाल लवकर प्रसिद्ध होण्या विषयीं केलेला अर्ज हिंदुस्थान सरकारच्या सेक्रेटरी कडे कालच येऊन पोंहोंचला असें ता. १९ मिनहू रोजीं पार्लमेंट सभेमध्यें सरजान गोर्स्ट हिंदुस्थान सरकारचे अन्डर सेक्रेटरी, यांनीं सा सांगितल्यावरून कळतें. या शिवाय त्यानां हेंही सांगितलें कीं लार्ड क्रास हिंदुस्थानचे सेक्रेटरी यांचे असें मत आहे कीं या वेळेस या प्रकर्णासंबंधानें कांहींच खुलासा सांगतां येत नाहीं व असा कांहीं खुलासा केल्यास फार अपायकारक होणार आहे. पण या प्रकर्णाचा विचार फार बारकाईनें केला जाणार इंग्लंडमध्यें तर खरी स्थिती अशी आहे परंतु इकडे मात्र आमची इंग्रजी पत्रकार मंडळी हवी तशी कल्पना करता आहेत.

---

## म्युनिसिपालिटीची निवडणूक.

निवडणूक कशी व कोणाची करावी व मत देणाऱ्यावर कोणती जबाबदारी आहे या बद्दल मागेंच आम्ही सांगितलें आहे तरी कदाचित त्याबद्दल विसर पडला असेल ह्मणून लोकाना आणखी एकवार जागृत करणें हें आमचें कर्तव्य आहे आह्मी अगदीं वेळेस सुद्धा लोकांना त्यांच्या कर्तव्याचे स्मरण देतों आहो परंतु यापुढें ते करणें किंवा न करणें हें त्यांच्या मर्जीवर अवलंबून आहे.

आजच्या प्रसंगाला जर लोकांची चुकी झाली तर ती तीन वर्षे पर्यंत सलत राहील. तर आज अगदीं कोणची भीड व मुलाजा न ठेविता आपणाला योग्य वाटतील अशाच मनुष्याच्या नांवापुढें सही करावी व बाकीच्याच्या नांवावर बेधडक काठमारावा. कांहीं उमेदवार लोक आपण निवडले जावें ह्मणून खटपट केवळ लोकांना फसविण्या करितां व एकमेकाचे उट्टें काढण्याकरितां करीत आहेत. निवडणूक करण्याच्या वेळेस आपला खानगी स्नेह भाव किंवा वैमनस्य एकीकडे ठेविलें पाहिजे व केवळ लायकी वरूनच उमेदवाराची निवडणूक केली पाहिजे मग तो आपला स्नेही असो किंवा दुष्मन असो. मुनसिपालिटी सुधारणें हें चांगल्या मेंबरावर अवलंबून आहे. व याची जबाबदारी मत देणाऱ्यावर आहे तर या अधिकाराचा दुरुपयोग त्यांनीं करू नये अशीं त्यांना आमची प्रार्थना आहे. व शेवटचें आमचें इतकेंच सांगणें आहे कीं केवळ अधिकारी मित्यर्थ येणाऱ्या लोकांना होता होईल तोंपर्यंत मत देऊं नये. व त्याच प्रमाणें कोणटच्या लोकाकडे, अधिकाराकडे, ऐटीकडें व थापाकडे लक्ष न देतां केवळ विद्वान मेहनती हुशार व लोकहितेच्छु अशा उमेदवाराची निवडणूक करावी. उमेदवाराची जी यादी प्रसिद्ध झाली आहे त्यांत पुष्कळ लोक मुनसिपालिटींत असणें केवळ मान आहे पण तिचें काम ह्मणजे केवळ रिकामटेकडेपणाचें आहे असें मानणारे आहेत तर अशा प्रकारचे लोक मुनसिपालिटींत न येऊं देण्याविषयीं खबरदारी घेतली जाईल अशी आमची पूर्ण आशा आहे.

---

यंदाची राष्ट्रीय सभा भरण्याविषयीं मुंबई येथील पुढारी लोकांनीं सभा भरून वर्गणी जमविण्याची सुरवात केली हें पाहुन आह्मास आनंद वाटतो. सुमारें ४० हजार रुपये खर्च लागेल असा अंदाजा आहे ही रकम मुंबई इलाखा वऱ्हाड व मध्यें प्रांत यांतून वसूल झाली पाहिजे. आमच्या वऱ्हाडांतील. राष्ट्रीय सभेचे हितेच्छु रावसाहेब देवराव बाबा सारखे गृहस्थ या कामीं आपल्या कडून होईल तितकी खटपट करतीलच.

---

यंदाच्या बजेटांत (जमाखर्चाच्या अंदान पत्रकांत) ५ लक्षांची शिलक निघणार आहे म्हणून म्हणतात. कित्येक पत्र कर्ते शिलकेची आशा तर करीत नाहीं पण फार झालें तर दोन्ही तोंडी सारखीं मिळतील असें म्हणत आहेत. येवढें झालें तरी पुरें आहे.

---

थोड्या दिवसा मागें सेक्रेटरी साहेबांनीं मिठावरील कर कमी करण्या बद्दल आपल्या भाषणांत उल्लेख केला होता त्याचा ही कायतो निकाल यंदाच्या बजेटावरून समजेल. आमच्या सरकारच्या सांपतच्या जमाखर्चाच्या स्थितीला हा कर लवकर उठेलसें वाटत नाहीं. सध्या सरकारला जिकडून प्राप्ती वाढेल असें करणें जरूर आहे. खर्चाच्या बाबी दिवसें दिवस अशा कांहीं तऱ्हेनें वाढत आहेत कीं लार्ड रिपन च्या वेळीं मांचेस्टर वाल्याच्या मालावरील जकात उठविली ती पुनः बसें पर्यंत मिठावरील कर कमी होण्याची आशा नको. मांचेस्टरवाल्याच्या हिताकरितां त्यांच्या वरील कर कमी केला व ब्रह्मदेशाच्या लढाईचा खर्च ही हिंदुस्थानावरच लादला याच्या योगानें सरकारची तारांबळ होऊन हा कर वाढला आहे. आमच्या पुढाऱ्यांना या संबंधानें चळवळ करणें असेल तर त्यांनीं अगोदर विलायती कपड्यावरील उठलेली जकात पुन्हा बसविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आमच्या राष्ट्रीय सभेनें तर या विषयाकड अगोदर लक्ष दिलें पाहिजे.

---

मुंबईस ही सभा एकदां भरली होती तेव्हां पुण्याला ही तिचा लाभ मिळावा याकरितां आमची पुणेकर मंडळी यंदा ती पुण्यास भरविण्याची खटपट करीत आहे. तेथें ही या संबंधानें सभा भरून वर्गणी जमविण्याची खटपट सुरूं झाली आहे व मुंबईकरांचीं मनें वळवून त्यांजकडून सभा पुण्यास भरविण्याची परवानगी घेण्याचें काम प्रोफेसर बाळगंगाधर टिळक व रावसाहेब नामजोशी यांजकडे सोंपविलें आहे.

The Berar Samachar

MONDAY APRIL 1 1889.

## THE CRAWFORD COMMISSION.

The telegram in the Times of India of 21 st March about the question put in Parliament about the crawford case and the answer to it must have been read throughout native circles in India with great anxiety. The report of the Commission is not yet made public nor is the opinion of Lord Reay and his council as representing the Bombay Government, made public; and both are with-held from Parliament on grounds of public policy.

From the time when the very first intelligence about the suspension of Mr. crawford and his flight in disguise to Bombay and his apprehension under a warrant reached the public a keen interest has been taken by the public in the matter. The Englishmen generally and the civil service particularly thought their whole prestige and good name were at stake and the native community looked with pleasure upon the prospect of a long continued fraud being exposed. The high sense of justice and duty evinced by Lord Reay was very warmly applauded; and in Mr. Crawford's trial before a commission, the public hopefully saw the chances of justice being vindicated. Whatever be the results of that Commission, and quite independently of the conviction of Mr. Crawford by the Commissioners, there is no doubt that an amount of dirty and unpleasant things have come to light Great scandals and mighty corruptions have been subjected to the fierce rays of public criticism That Mr. Crawford was for years past spoken of as one who took bribes, was a patent fact; and that this was well known even in European circles is evident from the letters in the Pioneer of some liberal minded Englishmen who care to take impartial views in the matter. All this makes the interval during which the result of the enquiry by the Commission is under the consideration of Lord Cross, more unbearable to the accused over whose head a heavy charge is pending and also to the general public as they await the final decision of the secretary of state with an anxiety one might say, almost unparalled.

When the first step in the matter was taken the public could hardly believe it and the love of Justice of Englishmen was almost admired; but the Anglo Indian papers soon raised a howl attacking the Government of Lord Reay for taking unjustifiable action in the matter and the correspondent from Calcutta of the London Times tried hard to mislead British public opinion in the columns of that influential Journal. But facts were facts and could never be gainsaid. Mr. Crawford's flight to Bombay in disguise, his connections with an infamous Man like Haumantrao which remains unexplained up to this day, and the absence of a motive of the witnesses against Crawford for such a wholesale conspiracy against Crawford are some of the most patent facts that would carry at least a strong moral conviction to an impartial mind. Despite the ingenious explanations of the Times of India of his flight to Bombay the fact remains that a man of Mr. Crawford's position should have fled to Bombay in disguise and yet people are pursuaded to b-

lieve that was not the result of a consciousness of guilt. The Anglo-Indian press which has not been slow to abuse the Bombay government, has in our opinion, already prejudged the case in favor of Mr. Crawford by trying to mislead public opinion here and in England.

Moral turpitude was pointed out as one of the necessary adjuncts of native character; and it was said that the avowed corruption of native magistrates some of whom were men of university education showed what stuff they are made of. Fortunately or unfortunately of late there has been such a scandalous amount of cases of corruption of European officers, there have been so many court martials against corrupt military officers that, it can safely be supposed that corruption is not altogether monopolized by natives alone. The 'Golden Gang' affair has almost shut up the mouths of papers like the Times of India; and the persistent cry for doing away with the corrupt native magistrates on the Bench, has been a little cooled. The native magistrates are corrupt no doubt as they stooped to *give* bribes, but if they are to be believed, what can we say of Mr. Crawford who stooped to *take* them? The corruption of magistrates can neither be pointed out as the result of English education or be twisted into an argument against the Congress. A human being is a human being after all; he is liable to temptations, if only there are temptations before him. The corrupt native magistrates are no index to native character; they only exhibit the frailties they have in common with others of their kind. The very class of persons that become magistrates, also become subordinate judicial officers in that same Presidency; but are they noted for corruption? There is no Revenue Commissioner there to tempt them and there is no corruption.

A special indemnity it was stated only a few days ago, in the Times of India was given to the witnesses at the trial of Lord Macclesfield in the last century. A special Act was passed by Parliament indemnifying all those Judges that had corruptly obtained their offices. If the Legislative in England could do it in the last century, certainly the Bombay Government could do the same in this. As regards their remaining any longer in office as magistrates, it is an administrative question which the Bombay Government may deal with as it thinks best. But when it is urged that they deserve to be magistrates no longer, on grounds of public policy and in the public interests it must also be remembered that that self-same public policy and regard for public interests required that these magistrates should come forward to depose the truth.

The result of the deliberations of the Secretary of State regarding the Crawford case, is, as we have already stated, being awaited with keen anxiety but in the meantime one thing is clear that some effort should be made to dispel the illusions caused in England by the Calcutta correspondent of the London Times, regarding the Crawford case.

---

The Local self-Government scheme is at last a reality. It has often been said it comes too soon we repudiate the charge. It comes rather a little too late. It comes when the Indians are no more what they have been. It comes when several characteristics of the Hindu mind have almost died away; comes when all that peculiar simple honesty love of public security and zeal and that peculiar simple truth have almost been extinguished comes when honest public interest is fast dying away. The Indian merchant is no more what he has been. His Maruti and Gunpati can no more be reliable witnesses for his business, transactions. No more are the debts of the father silently admitted and paid off by the son. A single day beyond the period allowed by the so called 'Law' would dismiss his suit, would absolve the debtor from all his contracts. He has necessarily to muster the art of hunting through all the intricate mazes of the Law. True as a remuneration for the death of all simple honesty and plain truth, the Indian has had a greater security and an advanced education. This very security has tended to alienate him from all public interest. The Indian mind has naturally relapsed into apathy and lethargy. Yes-No.— Scholership has done nothing to counter act. The so called advanced education has nothing done to enable and magnify it. The ideal of Public Interest is too grand to be so realized. 'Public Interest' and 'public security' were living activities in the minds of the leaders of our village communities. They were in fact some little republics; materially helping the main government in administration. There were men and leaders, every where completely understanding and practising our eastern politics. The western of course unknown to them. They should have beautifully comprehended the contrsts. A few lectures would have made them admirable masters. Public spirit lived in them and wanted simply a little change of direction. 'Indian politics' would raise perhaps, amongst our thoughtless readers a sides splitting laughter. Those, we may presume, have never marked that the Eastern politics has successfully grappled with the Western one for a period of years. To illustrate and institute comparasions and contrasts is foreign to our present purpose. Once the Indian was plying his oars in waters fresh. It should not then have been very difficult for him to practise his skill in waters briny but we must return. We congratulate, it comes before that instinctive Indian wisdom has wholly died away. To wait for the time when all our voters should develop into politicians would be an absurdity. We should have to wait to the end of time. It would be a grand ideal never to be realized.

For the present, the elections have, in them a novel interest candidates in hosts have appeared Amongst them are men born and reared neither in ancient India nor in the modern one. They are, as it were, suspended in the mind air unable to walk on earth to taste and enjoy its pleasures, and far more so to soar up sufficiently to live in the vicinity of heaven. They are, we mean, those that can neither understand the past nor the present. They should have never ventured to give in their names; but that they do not understand the responsibilities of their future positions. They are not capable of comprehending that the sacred trust in their hands would be a trial, that an abuse of this trust, no matter whether intentional or otherwise, would afford strong evidences for the utter in capacities of Indians and would be grounds for a clamour that shall with achievement be prejudicial to Indian interests. They have been looking on the membership as a sinecure to confer a glittering glory. Such men we warn shall secure no sufficient votes. Our votes shall be given, we hope, not from favours; conscions conviction of ability shall be the sole test.

Indeed, we confess, we are not transported away. No ecstatic fits we have had we cannot feel the delight of the discovery of a new land having toiled hard through an unknown and dangerous ocean. Some have been looking upon it in this new light we warn then they shall not reel drunk with joy and enthusiasm. For our selves, we can delight only in the recovery of a long lost possession. Of course, time has changed the form; still we can recognise and identify. We can say the system is nothing more than a mere modification. The site and the edifice are the same. Instead of the free stone and the cow dung washing we have a nice hewn polished mason's art and an ostentatious gaudy white wash. Instead of gatherings in sacred temples we have then had in chambers specially constructed for the purpose. Instead of the town crier's call at every door we have a call by wall stuck bills. Instead of the common sense natural regulations as to who should speak and who should vote, we have regulation books conferring the franchise and settling the forms of discussion.

Instead of voluntary spontaneous contributions prompted from a warm security & zeal unknown in modern times, we have a fixed compulsary taxation. The state of society was a different one Natural endowments and distinctions were willingly admitted and loved. Jealousy and malice were unknown. People chose to be guided by their superiors. A due subordination was the most interesting feature. Self sufficiency was unknown. Natural subordinations would willingly surrender. Divisions were easily settled A vague general in capacity was never conceived. You would wouder an unmanageable number of relations lived in the same house without dissentions. You would not believe me, if I, should say at times it amounted to a hundred members.

The Government have conferred on you nothing more than the rights of keeping your dwellings clean and respectable. It is a pity, dear brethren, you are deluded you shall go on advancing. Undcubtedly as you suppose it is the first link yet there are no prospects you shall ascend still further. In this allowance to enforce and administer for yourselves the lauds of sanitation in towns the Government have simply withdrawn its hand from regulating the hours of diet and repose. Your sanguine hopes for your future political aggrandizement, are all unwarranted. Their realizations cannot follow as cause effect. They may come, if they come at all, as offsprings of accidence.

Yet dear brethren, you must not be dssappointed. You must hope. Without it, the future may be darker for you. You must not be reckless of your present position. You must try to maintain yourselves where you are. You must not again be turned out. Give no cause for a further interference on the part of Government. Act with an honest zeal and wisdom.

---

To
The Editor of the Berar Samacher
Sir

In your article on "a few results of our judicial system" you say that only the amount of work done by so and so is noticed by higher authorities but the quality of the work turned out is never noticed and that the judges in the lower courts in order to show off a sufficient work often resort to a number of dodges. and I think you are perfully right in your remarks quantity being the chief criterion of the efficiency and commendation of a judge it often happens that many judges who are anxious to show of their work and get recommendations from higher authorities do their work with unusual haste and thus instead of giving proper justice to the poor litigants, many a time do injustice to them To explain what I say I give the account of a case that was lately decided in your district by one of the most efficient and experienced judge:--

A certain Marvaree brought a suit upon a roojoo-Khata. ( signed by B a Kunbi ) against C describing him as the son and representative of the deceased B, in one of the civil courts in the Akola District In the course of work a summons was issued and served upon B the deceased. At the day of the hearing at the call of the Chaparasee a certain Kunbi calling himself C i. e. *the son* and representative of the deceased B, appeared in the court and admitted the Plaintiff's claim all in all and the experienced judge being accustomed to dispose of cases within minutes and seconds, at once gave a decree to the Plaintiff according to his claim. After the decree was passed the court being applied by the decree holder sent its Kurkamin to attach the property of C. At the times of attachment when the Kurkamin went to the house of c he began to resist the execution saying that neither his father B was dead nor he himself ever appeared in the court and admitted the Plaintiff's claim; but being advised by the Karkoon allowed the execution for the fear of the Penal Code and applied the court for proper decision. The judge putting aside the consideration of his application and being offended by this step of his, at once sanctioned the prosecution of the applicant C for making false statement upon oath but fortunately for him he was aquitted by the trying Magistrate.

What is the reason of such results? can it be any thing other than our detective judicial system.

Had the judge in the above case waited a few minutes to see on whom the summons was served and called for proof for the indentification of C, what would have been the decision? Leaving the decision to your readers.

I remain silent hoping for good results from our new judicial Scheme.

---

## वऱ्हाड.

अकोट येथील पोस्टांत ४०० रुपयाच्या नोटांची अफरातफर झाली व त्याबद्दल खटला चालू आहे ह्मणून मागील अंकीं आह्मी कळविलें. त्या संबंधानें आह्माकडे ह्यां जास्त माहिती आली आहे ती वरून असें समजतें कीं ही अफरातफर झाली त्या वेळीं तेथील कायमचे पोष्ट मास्तर रा. नरहर व्यंकटेश तेथें नसून रा. सताराम मामाजी तारमास्तर हे तेथें होते आक्टींग पोष्टमास्तर होते व त्यांच्या कारकिर्दीत हा घोटाळा झाला आहे.

---

कर्नेल बुलक साहेब डे० क० उमरावती हे तारीख एप्रिल १८८९ इ० पासून १ वर्षे ९ महिन्यांच्या रजेवर जाणार आहेत व त्यांच्या जागीं मि. ए. इलियट, स्पे. अ. क. उमरावती यांस डे० क० नेमणार असें ह्मणतात.

---

रा० ब० श्रीराम भिकाजी जठार डा० आ० प० इं० यांची प्रकृति बरी नसल्यामुळें त्यांनीं एक वर्षाची रजा मागितली आहे.

---

आजरोजीं येथील वऱ्हाडांतील सर्व मुनिसिपल कमिट्यांचे मेंबर निवडले जाणार आहेत व ह्या करितां सरकारनें सर्व कचेऱ्यास सुटी दिली आहे.

---

कर्नेल ग्रांट सा० डे० क० उदईक नरनाळ्यास जाण्या करितां निघणार.

---

गेले आठवड्यांत हारवीसभापतीचे कंपाऊंडास आग लागून चार मनुष्य जळाली. त्यांपैकीं दोन मरण पावलीं.

---

## वर्तमानसार

पेशावर येथें रशियन गडबडी बद्दल कांहीं धोक्याची बातमी पोहोचली आहे. परंतु याबद्दल हिंदुस्थान सरकाराकडे कांहीं बदी आली नाहीं.

हुगळी येथील एका पंतोजास मुलास काठीनें मारल्याबद्दल वीस रुपये दंड झाला. इकडे मारक्या पंतोजीनीं लक्ष द्यावें.

बारिस्टर व वकील एकदम अनेक केसीं तली कामें घेतात, या संबंधानें कलकत्ता हायकोर्ट विचार करीत आहे.

मद्रासचा हिंदुपत्रकर्ता ह्मणतो कीं, हिंदुस्थानांतील सर्व स्त्रियांत शोभिवंत पोषाख दक्षिणेंतील स्त्रियांचा आहे. फक्त एक तर्‍हेंस जाकिट चोळीच्या ऐवजीं करावें. आतां एखादिवेळ अहे त्वरा करा.

ब्रह्मदेशांतुन अझून शांतता होत नाहीं. बंडाळ्या अझून चालल्याच आहेत. बंडवाल्यानीं नुकताच ५० खेडीं जाळून फस्त केलीं.

मद्रासेकडे ५ हिंदु ख्रिस्ती झाले होते, परंतु त्यांस पश्चात्ताप झाल्यावरुन त्यांणी कळविल्यावरून त्यांस पुन्हा हिंदु धर्मांत परत घेण्यांत आलें.

लाच देणाऱ्या मामलेदारांवर फिर्याद करणारा गणेश नारायण साठे यांस पुन्हा कलेक्टर कडून १ एप्रील रोजीं हजर होण्या बद्दल समन्स निघालें आहेत.

अहमदनगरास धान्याच्या महर्गतेनें लोक हवालदील झाले आहेत. दुष्काळाच्या कामाकरितां लोकल फंडांतुन ८० हजार रुपये मंजूर झाले आहेत असें ऐकतों.

कफक्षयास रोग्यानें स्वतः गाणें हा एक चांगला उपाय आहे असें ह्मणतात.

जी. आय. पी. च्या. गुंती स्टेशन जवळ जमिनींत एक हाडांचा सांपळा सांपडला त्याची उंची १९ फूट आहे. हा कोणत्या युगांतील असेल तो असो.

कोर्टाचा निकाल गैरशिस्त वाटला कीं, शेवटपर्यंत आपलें आपण होऊनच करणारी एडिनबरो येथें एक मंडळी आहे.

रेल मार्गाची वृद्धी करण्या करितां सरकार पुढील सरकारी वर्षांत लंडनच्या बाजारांतुन सुमारें ३० लक्ष पौंड कर्ज काढणार आहेत.

ऊसाचा रस काढून घेतलेल्या चिपाडांचा कागद चांगला होतो. असें ह्मणतात.

येत्या सालापासून पोष्टाच्या खात्यांत ह्या दरमहा ८० रुपयांच्या किंवा त्यांपेक्षां वरच्या प्रतीच्या इन्स्पेक्टरांच्या जागांबद्दल एक परीक्षा घेतली जाईल, असा सरकारचा ठराव झाला आहे. क० त०

इंग्रज सरकारचें व मगाकी सरकारचें प्रकरण फाटलें व त्याजकरितां कांहीं आरमार टाजियर्सकडे रवाना झालें असें समजतें.

मद्रासच्या किरसरी खात्यांत आणखी सात कामगार अधिक नेमण्याचें ठरलें त्याबद्दल ८४ हजार रुपयाचा खर्च वाढेल याप्रमाणें लष्करी खर्च वाढून विद्याखात्यास चिमटा बसत आहे. सु० प०

हिंदुस्थानांतील ब्रिटिश शिपायास चालू सालीं १६००० नवीन बंदुका देण्याचें ठरलें आहे.

राजपुतान्यांतील संस्थानिकांकडे मरहठी रक्षणार्थ कांहीं नियमित कामें नेमून देण्यात आली आहेत. भरतपूर व जोधपूर यांनीं पायदळ पलटणी व घोडेस्वार तयारींत ठेवावेत. अल्वारचे राजानें ६०० घोडेस्वार व १००० फौज द्यावी. कोटा संस्थानानें फक्त एक पायदळ पलटण पुरवावी. जयपूरचे महाराजांनीं १००० घोडा सरंजामा सुद्धां तयारींत ठेवावा. व बिकानेर संस्थानिकानें ५०० उंट ठेवले.

इंग्लंडांत कापर सिंडिकेट ह्मणजे तांब्याचा व्यापार करणारी मंडळी हिचें दिवाळें निघालें आहे असें लंडनचे तारीख २० चे तारेवरून समजतें. थोड्या दिवसांपूर्वीं एक टण ह्मणजे ९ पल्लयास ६९ पौंड ह्मणजे हल्लींचे भावानें ९७९ रुपये पडत असत. हा भाव एकदम इतका भयंकर रीतीनें उतरला कीं, ३९ पौंड टन विकूं लागलें आहे. ह्मणजे ७८ आणे शेर तांबें होतें तें आतां ७॥ शेर झालें आहे या वरील व्यापारी मंडळी जवळ १,३०,००० टन तांबें शिल्लक आहे यावरून त्या व्यापार मंडळास ६,८२,५०,००० रुपयांचा तोटा आला आहे शिवाय अमेरिकेंत ज्या तांब्याच्या खाणी त्या खाणीपासून चालू सालीं १,२४,००० टन तांबें उत्पन्न होईल असा अजमास आहे. तेव्हां जगांत होणाऱ्या खपा पेक्षां सुमारें २ लक्ष टन तांबें शिल्लक राहील जेव्हां ही बातमी मुंबईस कळली तेव्हां व्यापारी मंडळी मध्यें मोठी अस्वस्थता उत्पन्न झाली होती. विलायतेंतील व्यापारी मंडळीच्या दिवाळेपणामुळें फ्रान्स येथील ब्यांकेस मोठा धक्का बसला आहे. व ही बातमी विलायतेंतुन बाहेर पडते तोंच हिंदुस्थानांतील सर्व शहरोंशहरीं तांब्या पितळेचे व्यापार करणाऱ्या मंडळीस विलायतेंतून भराभर तारा आल्या आहेत. ज्या व्यापाऱ्याजवळ हजारों रुपयांचें तांबें शिल्लक आहे त्याजला ही वेळ मोठी नुकसानीची समजली पाहिजे न्या० सिं०

गंजम प्रांतांत दुष्काळ पडला असून पाऊस न पडल्या मुळें पिकें बुडालीं आहेत. ताप, देवी, व महामारी वगैरे रोगांनीं बहर माजत चाललें. १४००० लोक रिलीफच्या कामावर लागले आहेत.

उमेदवारांवर मेहेर—ज्या उमेदवारांचें वय पंचवीस वर्षां पेक्षां जास्त झालें आहे. त्यास कोणत्याही सरकारी सिविल खात्यात नोकरी देणें झाल्यास मंजुरी घ्यावी असा सिविल पेन्शन कोड कलम १०६ रूल ३ मध्यें नियम होता. परंतु तो नियम रद्द करून सरकारानें नुकताच असा ठराव केला आहे कीं, सदरहू प्रकारच्या उमेदवारास योग्य कारणामुळें सरकारी नोकरी द्यावी असें कलेक्टरास वाटल्यास त्यास सरकारच्या मंजुरी शिवाय नेमण्यास हरकत नाहीं; यदरचें अन्न खाऊन कित्येक वर्षें नादेड नोकरी करणाऱ्या उमेदवारांस २५ व्या वर्षाचें फार भय होतें. तें पुष्कळ अंशीं कमी झालें ह्मणण्यास हरकत नाहीं. तरी कलेक्टरच्या हातांत उमेदवारांची दोडी शेंडी राहिलीच.

लार्ड लिटन ह कदां हिंदुस्थानचे व्हाइसराय होते, ते हल्लीं पारीस शहरीं इंग्रज सरकारचे वकील आहेत. यांनीं विलायतच्या प्रधान मंडळास असें कळविलें आहे कीं, जनरल बोलांजी यांच्या हातांत जर का फ्रान्स देशाच्या राज्याचीं सूत्रें आलीं आणि तीं येण्याचा काळ आता समीप आला आहे असें दिसतें.) तर हे इंग्लंड देशाशीं लढाई केल्या शिवाय कधींही रहाणार नाहींत. याच्याच्या रीतींत इंग्लंडांत हल्लीं बरीच चळवळ उत्पन्न झाली आहे. मु. सु.

K. B. Rele and caclouseo smosteffi.
PREPARATIONS.

**१ धातु पौष्टिक शक्तिवर्धक गोळ्या.**

शरीर निरोगी सदृढ करणाऱ्या गोळ्या याच आहेत अति श्रमानें व हरएक दुसऱ्या कारणांनीं झालेला क्षीणता, मुखावरची निस्तेजता, पांडुरता, मनाची उदासीनता, भोजनोत्तर, हगवणीनें खोकल्यानें झालेली क्षीणता, स्वभावद्ध. मस्तकशूळ, कटीशूळ, निद्रानाश, गंडमाळा, क्षयरोग, रजस्वलास्त्रीच्या पोटांत दुखणें, धातु जाणें, वाईट स्वप्नें पडणें, हीं ह्यांच्या सेवनानें, नाहींशीं होऊन तोंडावर टवटवी येते मज्जातंतूस तीव्रता येऊन स्मरण शक्ति वाढते काम व अभ्यास करण्यास उल्हास येतो. तोंडास रुचि येऊन भूक लागते. पाचनशक्ति वाढते. ते प्रत्येकानें याचा अवश्य अनुभव घ्यावा. किं० १२ आणे.

**२ परम्यावर खात्रीचे वहतात औषध.**

हें विनवीक अत्युत्तम त्वरित गुणकारी आहे. लघवीची जळजळ, तिडिक, धातु जाणें ही तात्काळ बंद होतात परमा कितो ही जुना व हट्टी असला तरी निश्चयात्मक बरा होतो. किं० १ रु०

**३ परम्यावर पिचकारीचें औषध.**

हें ही परम्यावर रामबाण आहे. किं० ०८ आणे.

**४ धुपणी ( प्रदर ) वर अमोलिक औषध**

सर्व प्रकारच्या नव्या व जुन्या धुपण्या यानें हटकून जलद बऱ्या होतात. भूक फार लागते. रक्तवृद्धि होऊन शक्ति येते. किंमत १ रुपया.

**५ धुपणीवर पिचकारीचें औषध**

वरील औषधा बरोबर हें वापरल्यानें रोगी रोगमुक्त झाला नाहीं हें क्वचितच. किंमत ०८ आणे.

**६ सर्व प्रकारच्या जखमांवर मलम**

खरूज, घांदी, सर्व नव्या व जुन्या जखमा वाय इ० मिटविणारें मलम कायतें हेंच किं० ८ आणें.

**७ खोकल्यावर अचूक औषध.**

यानें कफ सुटा पडतो, पडसें, दमा जातो, क्षयाचा,, ढांग्या घशांत गुदगुली होऊन येणारे इ० खोकले अचूक बरे होतात. किं. १२ आणे.

**८ तापावर रामबाण औषध.**

हिवताप, पाळीचाताप, अंतरताप; जीर्णज्वर, यांवर तर हें रामबाण आहे. जंगल किंवा म्यालेरियन नांवाच्या तापावर हें वरदान आहे यानें भूक लागते अन्न पचतें. किंमत १२ आणे.

**९ अजीर्ण, अतिसार, यांवर औषध.**

अजीर्ण, अतिसार. संग्रणी, अग्निमांद्य, आमरक्ताची व सर्वी हगवण इ० बंद करण्यात हें कधींच मागें हटलें नाहीं. किंमत १२ आणे.

या औषधांच्या गुणाविषयीं ज्या अनेक सर्टिफिकीटा मिळाल्या आहेत त्यांपैकीं एकाचा सारांशः—

"के. बी रेळे यांस लिहावयास अत्यानंद वाटतो कीं, मजकडे पाठविलेली सर्व (वरील) ९ औषधीं मी लक्ष पुर्वक तपासून पाहिली. तीं फार गुणकारीं असून निर्दोष आहेत.

( सही ) डाक्टर वि. वि. गोखले,
"एम. ए. एम. डी"

सूचना--अनुपाना । कागद औषधा बरोबर असतां घाऊक घेणारास चांगलें कमिशन मिळेल. प्याकिंग व पोस्टेज शिवाय पडेल.

विशेष सूचना—आमच्या वरील औषधां शिवाय सर्व प्रकारची दुसरीं इंग्रजी औषधें जसे, पेनकिलर, क्लोरोडाइन, पेपरमिट, काडलिव्हर आइल, वाऱ्याचीं तेलें मलम, साबु, पोल्वारा, टिंकचर्स, सल्याईन्स, इनोज, फ्रुट साल्ट, वैद्यांस दवाखान्या करितां लागणारीं औषधें व शस्त्रें, वगैरे व तरुण व वृद्ध यांस लागणारे उत्तम गारचे चष्मे, मुन्शेत आल्या शिवाय, लागण्या योग्य नंबरांचे पाठविण्यांत येतील त्याच प्रमाणें औषधांची व इतर पुस्तकें ही पाठविण्यांत यतील.

पैसे आल्यास किंवा व्हाल्युपेएबल पार्सलनें औषधें व इतर सामान पाठवूं नारिंग पत्रें पाठवूं नयेत. पत्रव्यवहार खालील पत्त्यावर करावा.

पत्ता. के. बी रेळे कंपनी,
जुबिली मेडिकल हॉल
फणसवाडी- पटेल स्टांकरोड मुंबई
हीं औषधें सर्व इंग्रजी औषध विकणाराकडे व मालकाकडे मिळतील.

"TO THE DEAF."

A person cured of Deafness and Noises in the Head of 23 years, standing by a Simple Remedy, will send a description of it free to any Person who applies to J. H. Nicholson, 5 Old Court House Street, Calcutta.

**बहिऱ्यांस.**

बहिरेपणा आणि २१ वर्षांचा कर्णनाद यांस गुण आणणारें सोपें औषध.

जे. एच . निकलसन, ५ वी ओल्ड कोर्ट हौसस्ट्रीट कलकत्ता, यांस पोस्टेजसह पत्र पाठविलें असतां औषधाबद्दलची माहिती फुकट पाठविली जाईल.

राजमाचीकर व साठे न्यायाश्रयकर्ते पुणे यांनीं नवीन तयार केले.

**हिंदुस्थानचा करारांचा आक्ट.**

सन १८७२ चा ९ वा

समजुतीच्या टिपा व मुंबई, कलकत्ता, मद्रास व अलाहाबाद हायकोर्टाचे निवाड्यां सुद्धां किंमत रु० २॥ व टपाल खर्च ०४ आ.

**विक्रीस तयार.**

कळविण्यांत येतें कीं बंगाल नागपूर रेलवे स्टेशन गोंदिया येथें ऐन व बिजाच्या चांगल्या सरळ व जुन्या अशा मयाली सुमारें २००० आहेत. लांबी बारा फुटापासून वीस फूट पर्यंत व चौरस एक फूट. दराची माहिती पाहिजे असल्यास खालीं सही करणाऱ्याकडे मिळेल.

आपाजी विनायक कॉन्ट्राक्टर गोंदिया.

हें पत्र अकोला येथें के० बा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सालअखेर ७ ... ...
किरकोळ अंकास........................ ०४

नोटीशीबद्दल.
१० ओळींचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस........ ०।०१

Per annum ...
Six monthly............3 ... ...
Single copy................................ ...

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

Advertisements
Below 10 lines...2Rs.
per line over10... 4as.
Repetition derline3as

VOL XXIII | AKOLA MONDAY 8 APRIL 1889 | NO. 13

वर्ष २३ | अकोला सोमवार तारीख ८ माहे एप्रील सन १८८९ इ० | अंक १३

*K. B. Rele and caclousco smosteffi .*
*PREPARATIONS.*

१ धातु पौंष्टिक शक्तिवर्धक गोळ्या.

शरीर निरोगी सदृढ करणाऱ्या गोळ्या ह्याच आहेत अति श्रमानें व हरएक दुसऱ्या कारणांनीं झालेली क्षीणता, मुखावरची निस्तेजता, पांढुरता, मनाची उद्वासिनता, जीर्णज्वरानें, हगवणीनें खोकल्यानें झालेली क्षीणता, स्वप्नावस्था, मस्तकशूळ, कटीशूळ, निद्राभंग, गंडमाळा, क्षयरोग, रजस्वलास्थीतीमध्यें पोटांत दुखणें, धातु जाणें, वाईट स्वप्नें पडणें, हीं ह्यांच्या सेवनानें, नाहींशीं होऊन तोंडावर टवटवी येते मज्जातंतूस तीक्षता येऊन स्मरण शक्ति वाढते काम व अभ्यास करण्यास उल्हास येतो. तोंडास रुचि येऊन भूक लागते. पाचनशक्ति वाढते. ते प्रत्येकानें ह्याचा अवश्य अनुभव घ्यावा. किं० १२ आणे.

२परम्यावर खात्रीचे बस्ताद औषध.

हें मिनटांत अत्युत्तम त्वरित गुणकारी आहे. लघवीची जळजळ, तिडिक, धातु जाणें ही तात्काळ बंद होतात परमा कितो ही जुना व हट्टी असला तरी निश्चयात्मक बरा होतो. किं० १ रु०

३ परम्यावर पिचकारीचें औषध.

हें ही परम्यावर रामबाण आहे. किं० ०८ आणे.

४ धुपणी ( प्रदर ) वर अमोलिक औषध

सर्व प्रकारच्या नव्या व जुन्या धुपण्या ह्यानें हटकून जलद बऱ्या होतात. भूक फार लागते. रक्तवृद्धि होऊन शक्ति येते. किंमत १ रुपया.

५ धुपणीवर पिचकारीचें औषध

वरील औषधा बरोबर हे वापरल्यानें रोगी रोगमुक्त झाला नाहीं हें कचितच. किंमत ०८ आणे.

६ सर्व प्रकारच्या जखमांवर मलम

घट्टा, चांदी, सर्व नव्या व जुन्या जखम्या वाघ इ० मिटविणारे मलम कापतें हेंच किं० ८ आणें.

७ खोकल्यावर अचुक औषध.

ह्यानें कफ सुटा पडतो, पडसे, दमा ज्यांचा, क्षयाचा,, डांग्या घशांत गुदगुली होऊन येणारे इ० खोकले अचुक बरें होतात. किं. १२ आणे.

८ तापावर रामबाण औषध.

हिवताप, पाळीचाताप, अंतरताप; जीर्ण ज्वर, ह्यांवर तर हे रामबाण आहे. जंगल किंवा म्यालेरियन नांवाच्या तापावर हें वस्ताद आहे. ह्यानें भूक लागते अन्न पचतें. किंमत १२ आणे.

९ अजीर्ण, अतिसार, ह्यांवर औषध.

अजीर्ण, अतिसार. संग्रहणी, अग्निमांद्य, आमरक्ताची व साधी हगवण इ० बंद करण्यांत हें कधींच मागें हटलें नाहीं. किंमत १२ आणे.

ह्या औषधांच्या गुणाविषयीं ज्या अनेक सर्टिफिकीटा मिळाल्या आहेत त्यांपैकीं एकाचा सारांशः—

"के. बी. रेळे यांस लिहावयास अत्यानंद वाटतो कीं, मजकडे पाठविलेलीं सर्व (वरील) * औषधीं मी लक्ष पुर्वक तपासून पाहिली. तीं फार गुणकारीं असून निर्धोक आहेत.

( सही ) डाक्टर वि. वि. गोखले,
"एम. ए. एम. डी"

सूचना--अनुपानाचा कागद औषधा बरोबर असतो घाऊक घेणारास चांगलें कमिशन मिळेल. प्याकिंग व पोस्टेज शिवाय पडेल.

विशेष सूचना—आमच्या वरील औषधां शिवाय सर्व प्रकारची दुसरी इंग्रजी औषधें जसे, पेनकिलर, क्लोरोडाईन, पेपरमिंट, काडलिव्हर आईल, वाऱ्याचीं तेलें मलम, साबू, पॉव्डरा, टिंकचर्स, सल्याईन्स, इनोज, फुरुट साल्ट, वैद्यांस दवाखान्या करितां लागणारीं औषधें व शस्त्रें, वगैरे व तरुण व वृद्ध ह्यांस लागणारे उत्तम गारेचे चष्मे, मुंबईंत आल्या शिवाय, लागण्या योग्य नजरांचे पाठविण्यांत येतील त्याच प्रमाणें औषधांचीं व इतर पुस्तकें ही पाठविण्यांत येतील.

पैसे आल्यास किंवा व्ह्याल्युपेएबल पार्सलनें औषधें व इतर सामान पाठवूं नाटपेड पत्रें पाठवू नयेत. पत्रव्यवहार खालील पत्त्यावर करावा.

पत्ता. के. बी रेळे कंपनी,
ज्युबिली मेडिकल हॉल
कात्रसजी- पटेल त्यांकरोड मुंबई
हीं औषधें सर्व इंग्रजी औषध विकणाराकडे व मालकाकडे मिळतील.

## शारदासदन.

आमच्या देशांतील स्त्रियांच्या शिक्षणास साधारणतः साहाय्य व्हावें व विशेषें करून उच्च वर्णांतील निराश्रित विधवांची व इतर स्त्रियांची स्थिति सुधारावी या उद्देशानें शारदासदन या नांवाची शाळा चौपाटीवर नवीन वुईलसनच्या कालेजाच्या पाठीमागें स्थापण्यांत आली आहे. शाळा सोमवार ता० ११ मार्च १८८९ रोजीं सुरू झाली आहे. शाळेचे कांहीं नियम खालीं लिहिल्या प्रमाणें आहेत. ज्या कोणी विद्यार्थिणींची शाळेंत येण्याची इच्छा असेल त्यांनीं खालीं सही करणारांच्या नांवें लेखी अर्ज पाठवावे किंवा समक्ष येऊन भेटावें त्यांस शाळेंत घेण्याचा शाळेच्या साह्यकारिणी मंडळीचा अभिप्राय पडला म्हणजे त्यांस तसें कळविण्यांत येईल.अभिप्राय उलट पडल्यास तसें कळविण्यांत येईल. लेखी अर्ज करणारांनीं आपलें नांव, गांव वगैरे सर्व पत्ता स्पष्ट लिहावा.

ज्यांचीं घरें शाळेपासून बरींच लांब आहेत त्या मुलास एखादी बाई किंवा गाडी पाठवून शाळेंत आणण्याची व घरीं पोहोंचविण्याची तजवीज केली जाईल.

( पंडिता )रमाबाई शाळेच्या
मुख्य अध्यापिका.

३ विद्यार्थिणी.— या शाळेंत प्रथम निराश्रित उच्च वर्णांतील विधवा व इतर निराश्रित उच्च वर्णांतील स्त्रिया यांची सोय करून मग सवड राहिल्यास इतर विद्यार्थिणींस घेतले जाईल. विद्यार्थिणींचें वय तिशीच्या आंत असावें. विद्यार्थिणीस शाळेंत दाखल करण्या पूर्वीं तिच्या चाली रीतीविषयीं शाळेच्या साह्यकारिणी मंडळीकडून चांगली चौकशी केली जाईल मंडळीची खात्री झाल्यावांचून विद्यार्थिणींस घेतलें जाणार नाहीं.

४. शिक्षण.—ह्या शाळेंत साधारण व विशेष धंद्यांचें असें दोन प्रकारचें शिक्षण विद्यार्थिणींच्या शक्ती प्रमाणें व इच्छेप्रमाणें दिलें जाईल. साधारण शिक्षणांत मराठी, गुजराथी. इंग्रजी व संस्कृत इतक्या भाषा विद्यार्थिणींच्या इच्छेप्रमाणें शिकविण्यांत येतील, तसेंच व्याकरण, भुगोलविद्या खगोलविद्या, इतिहास, गणित, रसायणशास्त्र, वनस्पतिशास्त्र, प्राणीशास्त्र, भूगर्भशास्त्र आरोग्यशास्त्र, शारीर, इत्यादि विषयांचे अवश्यक तितकें शिक्षण देण्यांत येईल. शिवाय नीति, मर्यादा, व्यवहार गृहव्यवस्था इत्यादि महत्वाच्या गोष्टींच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष पुरविलें जाईल.

५ धंद्याच्या शिक्षणांत शिवणकाम, कशीदा लोंकरीचें काम, चित्र लेखन, चिनीमातीच्या भांड्यांवर नकशी व चित्रें काढणें, मातीचीं चित्रें करणें, फोटोग्राफ घेणें, लांकडावर नकशी खोदणें, सुरेख तऱ्हेचें बुरडी काम, व किंडरगार्टन नापक बालशिक्षणपद्धति इत्यादि कला शिकविण्यांत येतील.

६. फी.— ज्या विद्यार्थिणींस फी देण्याचें सामर्थ्य असेल त्यांपासून माफक फी घेण्यांत येईल. पण ज्या विद्यार्थिणींस फी देण्याची शक्ति नसेल त्यांस फुकट घेतलें जाईल.

७. निराश्रित विद्यार्थिणीस आश्रय— ज्या विद्यार्थिणींस आपला निर्वाह चालविण्याचें सामर्थ्य नाहीं असें शाळेच्या साह्यकारिणी मंडळीस दिसेल त्यांस शाळेंत रहावयास जागा अन्नवस्त्र, व पुस्तकें ही पुरविलीं जातील. अशा विद्यार्थिणींत विधवा स्त्रियांचा हक्क पहिला समजला जाईल.

८. शाळेंत राहणाऱ्या विद्यार्थिणी- आपला निर्वाह साधारणपणें चालविण्यास समर्थ असून ज्या विद्यार्थिणी शाळेंत राहूं इच्छितील त्यास घर भाड्या खेरीज आपला दुसरा सर्व खर्च द्यावा लागेल. आपला सर्व खर्च सोसण्याचें सामर्थ्य असेल अशा विद्यार्थिणी कडून सर्व खर्च घेण्यांत येईल.

९ धर्मस्वातंत्र्य.— शाळेंत राहाणाऱ्या विद्यार्थिणीस धर्मसंबंधानें व चालीरीतींच्या संबंधानें कोणत्याही प्रकारची गैरसोय न होऊं देण्याकडे विशेष लक्ष पुरविलें जाईल. कोणतेही विशेष धर्ममत शिकविलें जाणार नाहीं.

शाळेची आणखी कांहीं विशेष माहिती पाहिजे असल्यास पंडिता रमाबाइकडे किंवा खालीं ज्यांचीं नांवें दिलीं आहेत त्यांपैकीं कोणत्या तरी एखाद्या गृहस्थाकडे पत्र पाठविल्यास किंवा त्यास समक्ष भेटल्यास मिळेल.

साह्यकारी मंडळी पैकीं कित्येकांची नांवें.

रा. ब. महादेव गोविंद रानडे, पुणें.
डा. रामकृष्ण गोपाळ भांडारकर, पुणें.
रा. ब. गोपाळराव हरी देशमुख, पुणें.
" लालशंकर उमयाशंकर, नासिक.
" शंकर पांडुरंग पंडित, अहमदनगर.
रा. सा. महिपतराम रूपराम, अहमदाबाद.
आ. काशिनाथ त्र्यंबक तेलंग, माथ्यूरोड, मुंबई.
रा. सा. वामन आबाजी मोडक, एलफिन्स्टन हायस्कूल, मुंबई.
डा. आत्माराम पांडुरंग, चौपाटी मुंबई.
डा. सदाशिव वामन कार्णे, ठाकुरद्वारानजिक पालवाचा रस्ता मुंबई.

"TO THE DEAF."

A person cured of Deafness and Noises in the Head of 23 years, standing by a Simple Remedy, will send a description of it free to any Person who applies to J. H. Nicholson, 5 Old Court House Street, Calcutta.

बहिऱ्यांस.

बहिरेपणा आणि २३ वर्षांचा कर्णनाद यांस गुण आणणारे सोपें औषध.

जे. एच्. निकलसन, ५ वी ओल्ड कोर्ट हौसस्ट्रीट कलकत्ता, यांस पोस्टपेड पत्र पाठविलें असतां औषधाबद्दलची माहिती फुकट पाठविली जाईल.

राजमाचीकर व साठे न्यायाश्रयकर्ते पुणें यांनीं नवीन तयार केलें.
हिंदुस्थानचा कराराचा आक्ट.
सन १८७२ चा ९ वा
समजुतीच्या टिपा व मुंबई,कलकत्ता,मद्रास व अलाहाबाद हायकोर्टांचे निवाड्यांसुद्धां किंमत रु० २॥ व टपाल खर्च ०६ आ.

वऱ्हाडसमाचार.

मिती चैत्र शुद्ध ८ शके १८११

आमच्या वाचकांच्या स्मरणांत असेलच कीं हणमंतराव व कार्फडच्या प्रकरणांत मि०

डबीर सिंदेकर वगैरे मंडळीनें क्राफर्ड साहेबाला हणमंतराव मार्फत लांच दिल्याचे कबूल केले आहे. व त्यावरून गणेशनारायण साठे यानीं या लोकांवर लांच दिल्याबद्दल इ. पि. को० क० १६२-१६३ आणि १०९ प्रमाणें मुकदम केले जाऊ नयेत अशा मजकुराचा अर्ज मि. व्हिएल डी० मी० यानकडे ता. २४-८-८८ रोजीं केला होता परंतु तो त्यानें क्रि० प्रो० क० २०२ प्रमाणें नामंजूर केला. पुढें हायकोर्टसमोर जेव्हां तो अर्ज तपासणीच्या नात्यानें गेला त्याविलेस क्रि. पो. क. ३७ अन्वये सदरहु अर्ज फैलावर घेऊन मि. सिंदेकर वगैरे मंडळीवर खटले करण्याबद्दल हायकोर्टाच्या कांहीं जज्जांनीं मुंबई सरकारास शिफारस केली. त्यावरून तो अर्ज चकैशी करिता मि. डब्ल्यु, ए. व्वेस्ट माजिस्ट्रेट पुणें याणकडे परत पाठविला आहे अर्जाच्या चौकशीची तारीख नेमून त्या तारखेस आपल्या पुराव्यानिशीं हजर राहण्याबद्दल माजिस्टेटनें समन्स गेले परंतु मला स्वतः हजर न राहण्या बद्दल द्यावी व माझी पूर्वीची फिर्याद मला काढून घेण्याविषयीं परवानगी द्यावी अशा मतलबाचा अर्ज ता. २३ माहे मार्च सन १८८९ इ. रोजी केला आहे तो असा. आपल्या समन्साप्रमाणें नेमलेल्या तारखेस हजर होण्यास मी तयार आहे परंतु हा फिर्याद दाखल केल्यापासून मला जी कांहीं थोडिशी माहिती मिळाली आहे तिजवरून ह्या फिर्यादीतून आपले अंग काढून घ्यावें असें मला वाटते. पुरावा कोणता हाजर करावा हें कांहीं मला समजत नाहीं. कारण ह्या प्रकरणाच्या संबधानें मला स्वतः कांहींच माहिती नाहीं. वर्तमान पत्रांतून वगैरे जी खटल्यांची हकीकत प्रसिद्ध झाली होती त्यावरून मी फिर्याद केली होती. मी माजिस्ट्रेटास व हायकोर्टास केलेला अर्ज बारकाईनें वाचून पाहिला असतां असें स्पष्ट दिसून येईल कीं शिंदकर व डबीर यांनीं हणमंतराबाविरुद्ध जो पुरावा दिला आहे त्याशिवाय काडीमात्र अधिक पुरावा मजजवळ नाहीं. व असा पुरावा मजजवळ आहे किंवा तो मी कोठून तरी मिळवीन अशा बद्दल ही मी आज पर्यंत कधीं कबूल केलें नाहीं. अशा प्रकारची माहिती असल्या मुळें माझ्या जबानी पासून कांहीं विशेष निष्पन्न होईल असें मला वाटत नाहीं. ह्या शिवाय हाय कोर्टाचे हुकूम लिहितांना शेवटीं असें लिहिलें आहे कीं सदरहु अर्जाची कायद्या प्रमाणें व्यवस्था करण्या करितां माजिस्ट्रेट कडे हा अर्ज परत केला आहे. व ह्या संबंधानें कायदा कसा आहे याजबद्दल मराठ्यानें आपल्या १७ व्या तारखेचे अंकांत चांगलें विवेचन केलें आहे. तो अंक मी या अर्जा सोबत पाठविला आहे. त्या बद्दल आपण चांगला विचार केला असतां मी आपणा समोर येऊन काय बोलेन याचें अनुमान सहज करतां येईल. कायद्यानें ज्या गोष्टीस किंवा कृत्यास गुन्हा झटलें नाहीं ती गोष्ट कितीही निंद्य किंवा अविचाराची असली तरी तिला कोणाच्यानें गुन्हा झणवणार नाहीं. पिनल कोड तयार करण्या करितां इंग्लंड मध्यें जें कमिशन बसलें होतें त्यानीं असें स्पष्ट सांगितलें आहे कीं जों पर्यंत लांच देणारा सरकारी नोकरानें अन्याय करावा झणून लांच देतों व लांच दिले नसतां केवळ न्यायच झाला असतां असें शाबीत होत नाहीं तों पर्यंत लांच देणारानें लांच दिल्या बद्दल गुन्हा केला आहे असें मानणें व त्या बद्दल त्याला शिक्षा करणें हें फार अन्यायाचें व दूषणाचें काम होय असें आह्मी मानतों.

तर अशा कायद्याची व क्राफर्ड प्रकरणांतील सर्व खटल्याचा निःपक्षपातानें व कोणाचा द्वेषभाव न धरितां सद्बुद्धीनें विचार करतां शिंदेकर व डबीर यानवर वर लिहिलेल्या कृत्या बद्दल खटले चालविणें मला योग्य दिसत नाहीं कारण त्यांचें हें कृत्य कायद्या प्रमाणें अपराध होत नाहीं असें मला खास वाटतें. खरोखर पाहिलें असतां आज पर्यंत मी या गृहस्थांना पाहिलें सुद्धां नव्हते व केवळ न्याय दृष्टीनें हे अपराधी आहेत असें मला वाटल्या वरूनच मी असा अर्ज केला होता. परंतु ह्या संबंधाचा खरा कायदा काय आहे हें समजल्यावर माझी फिर्याद काढून घेणें हें माझें कर्तव्य आहे असें मी समजतों. मी जी फिर्याद केली ती द्वेष बुद्धीनें केली नसून केवळ महाराणी सरकारची प्रजा या नात्यानें केली होती. ज्या हाय कोर्टाच्या हुकुमावरून ह्या अर्जाची चौकशी होते आहे त्यांनींच पब्लिक प्रासीक्युटरच्या आंगीं झणजे एखादा सार्वजनिक मनुष्य जो सार्वजनीक कारणा वरून न्याय मागतो आहे त्याच्या आंगीं कोणते गुण असणें जरूर आहे हें पुढील गोष्टी वरून कळून येईल. सरकार विरुद्ध दिनकर आणि दुसरे (बे. हा. रि. व्हाल्यूम पा. १९३) या मुकदम्यांत मि. बिचार्ड यानें स्पष्टपणानें व निःपक्षपातानें आपलें काम करावयाचें हाते व ह्या दोन गोष्टी प्रत्येक पब्लिक प्रासिक्युटर ( झणजे सरकारा तर्फे वकील ) मध्यें असणें अगदीं जरूर आहे. असें हाय कोर्टानें झटलें आहे. सरकारी वकील हा अमुक एक मनुष्या तर्फे नसल्या मुळें त्यानें आपला पक्ष खरा आहे त्या पेक्षां कधीं अधिक बनावून सांगू नये व तो कदाचित कमी होईल झणून कधीं पुरावाही कोठा समोर आणल्या शिवाय ठेवूं नये. त्याचे मुख्य काम झणजे सत्य शोधून काढण्यांत मदत करणें. हें होय आणि कोणच्याही पक्षच्या साक्षीदारास भिती दाखवूं नये किंवा शाबीती होण्या बद्दल कधीं विशेष उत्कंठाही ठेवूं नये दुसरी गोष्ट अशी आहे कीं सरकारांनीं ह्या गृहस्थास ( शिंदेकर वगैरे ) कायद्या अन्वयें तुह्मी खरें सांगितलें असतां माफी मिळेल अशाबद्दल अभ्वासनें दिली आहेत. व खरोखर असा कायदा नसतां तर सरकारांनीं यांना माफी दिली नसती. ह्या सर्व प्रकरणावरून माझी अशी विनंती आहे कीं कायदा तर असा आहेव ह्या मुकदम्याची हकीकत ही ह्या प्रकारची व हायकोर्टाचें झणणें सध्या या प्रकारचे तर सर्व अशी स्थिती असतां मी निपक्षपातानें सार्वजनिक हिता करितां फौजदारी कोर्टांत न्याय मागण्या करितां, येणें झणजे आपल्या वैऱ्याचा सूड उगविणें या शिवाय कांहीं दुसरें योग्य कारण मला आहे असें आपणास वाटेल. काय!

या सर्व कारणा वरून मला सास्वड येथें तारीख १ माहे एप्रिल रोजीं न येण्याबद्दल माफी मिळेल अशी माझी कोर्टास फार नम्रतेनें विनंती आहे.

## सन १८८९-९० सालच्या जमाखर्चाचें अंदाज पत्रक.

या महिन्याच्या पहिल्या तारखे पासून सरकारच्या जमाखर्चाच्या नव्या सालास आरंभ झाला. यंदाच्या सालीं जी जमा यावयाची व जो खर्च व्हावयाचा त्याचा खर्डा फिनन्सायल सेक्रेटरी सर डेव्हीड बार्बर यांनीं तारिख २७ रोजीं सुप्रीम काऊनसील पुढें आणून त्यावर वादविवाद ही झाला. आज पर्यंत हा खर्डा या प्रमाणें पुढें येऊन त्यावर वादविवाद होत नसे. आपले सध्यांचे व्हाईसराय लार्ड लान्सडन यांनीं यंदाच हा एक नवीन मान लोकमतास दिला आहे.

सर डेव्हिड बारबर यांनीं प्रथम गेल्या दोन वर्षांत जमाखर्चाची स्थिती कशी होती व तुट कशी येत गेली हें दाखवून नंतर यंदाच्या जमाखर्चास हात घातला आहे.

यंदाचा इंपिरियल रेव्हेन्यू ८२,९३,१३,-००० रुपये आहे व खर्च ८२,८२,९०,-००० रुपये आहे; झणजे खर्च वजा करितां यंदा १०,६३,००० रुपये शिलक राहील असा अजमास आहे.

खर्चाच्या बाबींत सरहद्दीच्या संरक्षणा करितां व रुपयाची किंमत कमी झाली असतां आलेली तूट भरून काढण्या करितां मोठमोठ्या रकमा अंदाजानें एकीकडे काढिल्या आहेत त्या धरिल्या नाहींत तर शिलकेचा आंकडा याहीपेक्षां वाढेल असा आदमास आहे. उत्पन्न व खर्च या दोहोंचे ही आंकडे यंदा गुदस्तापेक्षां अधीक अधीक आहेत. खर्चाचा आंकडा २२,७७,७,००० रुपयांनीं वाढला आहे व वसूल २९,२१,-७,००० रुपयांनीं वाढला आहे. खर्चीकडे अधीक येणारी रकम बहुधा लष्करी खात्याच्या व रेलवेखात्याच्या कामीं लागणार आहे हें सांगणें नकोच.

उत्पन्नाच्या बहुतेक बाबी यंदा वाढल्या आहेत. रेलवे, जमीन महसूल, आबकारी, जंगल, टपालखातें, तारखातें, टांकशाळा, जंगल, कस्टम्स ( मीठ वगैरे ), प्रांतीक सरकारां पासून आलेला कर, स्टँप, इरिगेशन, या सर्व खात्या पासून सरकारला यंदा अधीक उत्पन्न येईल असा अजमास आहे.

सारांश मध्यें कांहीं अकस्मिक कारणें उद्भवलीं नाहीं तर आमच्या सरकारची दर वर्षी प्रमाणें यंदा तारांबळ उडणार नाहीं असें झणण्यास हरकत नाहीं. खर्च जाऊन कांहींशी शिलक रहाणार आहे. तेव्हां एखादा नवीन कर बसण्याची ही आह्माला यंदा धास्ती नाहीं. सध्यां तर सुमार ठीक दिसतो आहे. पण कोणी सांगावें ब्रीज देशा सारखे मध्येंच एखादें लचांड उपस्थित झालें तर नेम काय! सिकीम प्रकरण अद्याप विझलें नाहीं; वायव्य सरहद्द आ पसरून बसलीच आहे. या सर्वांच्या हातून वाचेल तेव्हां खरें.

दरवर्षी प्रसिद्ध होणारा हा खर्डा म्हणजे आकड्यांचा येक समुद्रच असतो. यांतून परिणाम साधारण वाचकाला महामुष्कील आहे. ज्याना या आंकड्याच्या शास्त्राची माहिती नाहीं किंवा मुळींच अभिरुचि नाहीं त्यांचे तर मार्थेच फिरून जावयाचें तेव्हां हा खर्डा प्रसिद्ध झाला मग तो फक्त सरकारी गॅझेटांत होवो किंवा इंप्रिल कौऊन्सील मध्यें होतो, त्या पासून आम्हाला फायदा करून घेणें मोठें कठीण आहे तथापि त्या मध्यें ज्या एकंदर गोष्टी सांगितलेल्या असतांत व त्यांपासून आपल्याला जी अनुमानें काढिता येतात त्याचा मात्र आपण विचार केला पाहिजे उदाहरणार्थ निरनिराळ्या प्रांतांत सरकारांवर बसलेला कर घ्या. हा कर यंदा ७४ लाख रुपये म्हणजे गुदस्ता पेक्षां २४ लक्ष ४७ हजार रुपयांनीं वाढला आहे प्रांतातला सरकारांवर हें कराचें ओझें लादल्या कारणानें त्यांची कशी तारांबळ उडते आहे हे सर्वत्र महशूरच आहे हा पैसा इंपीरियल खजिन्यांत कसा तरी रिचवला पाहिजे या करितां मग त्याना वाटेल तशी काटकसर करितां येते व ही काटकसर शेवटीं विद्याखातें, पब्लिक वर्कस, दवाखानें वगैरे जीं लोकहितार्थ अवश्य कामें आहेत. त्यांना भोवतें. मुंबई इलाख्यांत सध्यां शाळाखात्या संबधानें कशी धामधूम चालली आहे हें सर्वांस माहित आहेच. तेव्हां इतकें अगदीं कंठा पर्यंत येऊन पोंचे पर्यंत कराचें ओझें प्रांतिक सरकारावर कां लादावें हें समजत नाहीं. आमच्या लोकांनीं या गोष्टीचा विचार करून या गोष्टी संबंधानें सरकारची कान उघाडणी केली पाहिजे.

फॅमिन इनशरन्स फंड झणून सरकारची उत्पन्नाची बाब आहे. वास्तविक पहातां ही बाब दुष्काळा सारख्या अकस्मिक होणाऱ्या संकट समयीं प्रजेला आश्रय देण्या करितां उत्पन्न केलेली आहे परंत तिचा मूळ हेतु एकीकडे राहून सध्यां जमीन महसूल किंवा दुसऱ्या कायमच्या बाबी या पैकींच ही एक होऊन बसली आहे. दुष्काळांत लाक उपाशी मरत कांना. सरकार त्या करितां पैसे उपटून पदरांत घालीतच आहे.

इतके दिवस अफूचे उत्पन्न वाढल्याबद्दल आपण ऐकत होतों. यंदा तरी गांजावरील करही वाढणार असा अंदाज आहे. त्या प्रमाणें आहे. शाबास आमच्या लोकांची. या कामीं आमची चांगली सुधारणा करीत आहेत खरें. केन साहेबांनीं जागोजाग केलेलीं भाषणें व त्यापिकेल्या सभा यांचा परिणाम आमच्या लोकांवर हाच कां व्हावा. सरकाचें अपकारी खातें झणजे शुद्ध रिकामें ओझें आहे. पण यांत सरकारला तरी दोष कां द्यावा. आमचेंच लोक आपल्या स्वाधीन नाहींत तेथें दुसऱ्यास काय बोल लावावा.

या व अशा सारख्या ज्या अनेक गोष्टी सदर खर्ड्या वरून आपल्या दृष्टोत्पत्तीस येत आहेत त्याचा आपण अगोदर विचार केला पाहिजे.

॥ भवो हि लोकाभ्युदयाय तादृशाम ॥

कालिदास.

हिंदुस्थानचें दुर्दैव कांहीं विचित्र आहे कीं त्याच्या हिताची गोष्ट ते फार वेळ टिकूंच देत नाहीं. त्याचें कल्याण करण्यासाठीं झटणारा एखादा कोणी निपजला, मग तो इकडे झणा किंवा परदेशांत झणा, कीं त्या-

ला आयुष्य थोडें झालेंच. "उदारचरितानांतु" भेद मनांत न आणिता या हतभागी हिंदुस्थानाच्या हितासाठीं झटणारीं जीं काय थोडीशीं डोकीं इंग्लडांत आहेत त्या पैकीं जान ब्राईट सद्गृहस्थ एक होते. हे गृहस्थ गेल्या महिन्याच्या २७ व्या तारखेस परलोक वासी झाले. यांच्या मरणानें इंग्लड व हिंदुस्थान हे दोन्ही देश शोकाकूल झाले आहेत यांचे सर्व आयुष्य सत्य, न्याय व मनुष्य जाती यांच्या सेवेंत गेले लहानपणीं चांगलेसें शिक्षण न मिळता केवळ स्वपराक्रमावर वाढून आजमितीस ते स्वदेशांत व परदेशांत ही योग्यतेच्या अतिउच्च शिखरास जाऊन पोंचले होते. सत्य पक्षासाठीं भांडणें हा त्यांचा मोठा बाण असे व तो राखण्या साठीं ते प्रसंग विशेषीं स्वहितास ही लाथ मारीत असत बिद्याही त्यांच्या अंगीं इतकी होती की इतक्या महत्वास चढले असतां ही मला कांहीं येत नाहीं असें ते म्हणत व "राज्यकार्य धुरंधर" या नावांस आपण शोभत नाहीं असें बोलून दाखवीत वास्तविक पहातां यांच्या सारखे राजकार्य कुशल स्पष्ट वक्त पार्लमेंटांत फारच थोडे निघतील पार्लमेंटांची सुधारणा, व्यापार स्वतंत्र्य व हिंदुस्थानची राज्य व्यवस्था या विषया संबंधानें यांनीं पार्लमेंटांत जी कामगिरी बजाविली आहे तिजकडे पाहिलें असतां यांची गणना पहिल्या प्रतिच्या मुत्सद्यांत करितां येईल. व्यापार स्वातंत्र्या विषयीं चळवळ चालू असतां त्या चळवळींचे उत्पादक मि. काबडन यांना त्यांनीं चांगली मदत केली. हिंदुस्थानावर ही त्यांचे अनंत उपकार आहेत. पार्लमेंटांत व सर्व इंग्लंडांत हिंदुस्थानचा कळवळा बाळगून त्याच्या बतीनें भांडण्यास कोणी नाहीं असें पाहून यानी आपल्या या हतभागी देशाचा पक्ष उचलिला व इंग्लंडच्या लोकांचे लक्ष इकडे लाविलें. यांचीं त्या वेळेचीं भाषणें इतकीं उत्कृष्ट व माहितीनें इतकीं भरलेलीं आहेत कीं त्यांना अद्याप पावेतो वक्तृत्वाचे उत्तम मासले म्हणून गणतात. हिंदुस्थानच्या राज्य व्यवस्थेंत सुधारणा करण्या विषयीं यांची आपल्या देशांतील लोकांच्या मागें नेहमी टोचणी लागलेली असे व आणखी काहीं दिवस वांचते तर या संबंधांची चौकशी करण्या करितां रायल कमिशन लवकरच बसलें असतें यांत संशय नाहीं. असा हा मोहरा आपल्यास फार दिवस लाभला नाहीं हें आपलें मोठें दुर्दैवच समजावयाचें. असो. आमच्या लोकांनीं या सद्गृहस्थांबद्दल आपली पूज्यबुद्धि दर्शविण्या करितां व त्यांनीं आजवर आपल्यावर केलेल्या अनंत उपकाराबद्दल त्यांचे उतराई होण्या करितां त्यांचें कांहीं स्मारक करावें. अशा रीतीनें खर्च झालेला पैसा फुकट खर्च केला असें ह्मणतां येणार नाहीं.

---

# The Berar Samachar

**MONDAY APRIL 8 1889**

## 'THEY PRAYED FOR BREAD AND A STONE WAS GIVEN THEM.'

The latest Gazette of India publishes what purports to be the pleasure of the Government of India about the management of civil and criminal work in Berar. People awaited the coming of the Judicial scheme with the utmost anxiety and to their astonishment and utter regret they find that the new scheme is grand deception. It is altogether unsuited to the requirements of the province and the whole scheme is not only not progressive but it is a distinct retrograde step regarding the Judicial administration of the province. We might as well here note the antecedents in connection with this coming scheme. A new Judicial scheme for the province became a necessity as the existing system did not work satisfactorily. Opinions of local officers were invited and Mr Cordery the Resident proposed a scheme to the Government of India which in his opinion was suited to the province. Like every other Government act, every thing in connection with the schemes proposed by the local officers and that proposed by Mr. Cordery was all behind the curtains; publicity was never given to the schemes as it certainly should have been, and public criticism was never invited. The Berar Sarvajanik Sabha sent up certain representations to the Resident and to the India Government but the Resident declined to forward them as he said the papers from his office in connection with the scheme had been already sent on to the India Government. Public opinion was thus most systematically ignored and at last the scheme is at once sent out to us a cut and dried code which cheats the people out of their most important remedies and leaves the whole province to the tender mercies of a set of ignorant patronage-system judges and to the still tenderer mercies of foolish appellate courts. Whoever reads the scheme as codified even cursorily will find that it is not systematic; but want of system is the least fault in it. We do not hesitate to give it as our opinion that the rules have been drafted by a mere clerk of 40 or 50 rupees a month and passed on from officer to officer without so much as a passing thought as to the usefulness of the scheme or to its aptitude to provincial need. Now who is responsible for all this mismanagement? We hold the Foreign Department of the Government of India responsible for all this.

Now we will for the present give one salient feature of the system which will distinctly prove how ruinous is the new scheme to the liberties and interests of the people. The people of this province wanted the High Court *within* the province as they had to undergo great trouble and expense in going to Hyderabad for final appeals and thus justice was practically shut out to them. Now what does the Government do? They say well you are troubled, are you? We will tell you an easy remedy and that is have done with the appeal to Hyderabad Court altogether. The people wanted bread and a stone was thrown into their face. People wanted not an extinction of the remedy of second appeals in the province itself. Now the scheme that is given to us keeps exactly the present system intact and only abolishes the Court of the Resident. It gives two appeals only in cases below five hundread and *only one* appeal in cases above five hundred. That is to say in comparatively more important cases there is only *one* appeal and in minor cases two. Who would have thought that such a glaring absurdity would be an essential feature of the new scheme. One remedy has now been cut off from the people, and that too an important and much pryed remedy. Even in regulation provinces where there are trained lawyers on the Bench there is one safe guard after another while here where there are military men on the Bench who do not pretend to have any legal training at all the scheme only gives the province *one* appeal. The miscarriage of justice in this province from the lowest to the highest Court in the province is notorious, we can print a series of glaringly absurd decisions passed by no less an officer than the Judicial Commissioner of the province. Under these circumstances to cut off one remedy and that a final one from the people is simply monstrous. It would be now the misfortune of persons who may have to appear in appeal to be denied justice in the most practical manner. Nobody can say that the officers here appointed are fit to do Judicial work with notable exceptions, and the best evidence of this is to see how many decisions in civil appeals of the Judicial Commissioner are reversed by the Resident and how many convictions in murder cases set aside. With the existing staff of officers it would be cruel and unjust in the extreme to bring in the new scheme. Any thing would be desirable but an advent of the new scheme with the officers as at present we are even willing to have the old system of appeal to the Resident rather than have no appeal at all. We have not slightest hesitation in saying that the whole province desires a continuation of the old system rather than the new scheme.

The public mind has already been greatly agitated by the new scheme. The representative people of the Sarvajanik Sabha at Amraoti are, we hear, going to hold a grand meeting for memorializing the Government of India on the matter and sending a telegram to suspend the operation of the new law till their memorial is disposed of. We have much to write about the subject but we only state at present that very grand efforts must be made to represent the matter properly to Government and we feel no doubt that the scheme will be taken up throughout Berar in that spirit.

---

### Shegaon New Election of Municipal Members.

To

The Editor Berar Samachar Akola.

Dated 6th, April 1889.

Dear Sir,

Would you mind publishing the following few lines in a corner of your valuable paper in your issue.

The new Municipal election under the new law, came off here under the Vice Presidencyship of Captain R. V. Garrett Assistant Commissioner Khamgaon precisely at 10. 30. A. M. this day. Gentlemen who are interested in the affair and the Polling officers were present at the occasion. The sealed boxes were opened by Captain Garrett in the presence of a General meeting. Out of 13 candidates 9 were elected. The highest No. of votes gained was by Mr. Doorgiah Pillay next in order comes Mr. Bunkut Bawanidass.

The following are the successful candidates.

Ward No. 1

Messrs E. C. Rich agent

,, M. Doorgiah Pillay Medical offir.

Ward No. II

,, Narain Kurtaji

,, Hari Kukaji.

Ward No. III

,, Vishnu Mahdave Head Master.

Ward No. IV

,, Gopal Govind.

,, Bankut Bawandass.

Ward No. V

,, Maroti Daryaji.

Ward No. VI

,, Bhagwan Mauaji.

The following gentlemen are proposed to be members on the Government side.

Messrs Maroti Kurtaji.

,, Annaji Keshave.

The Talug officer Bapu Kashinath.

Yours.

"X"

---

Pandit Suraj Narayen, Assistant Commissioner, 3 rd class, is appointed to officiate as Assistant Commissioner, 2nd class, with effect from the I st February 1889. *vice* Maulvi Mahammad Nizamuddin transferred to Ajmir or till further orders.

Under Section 12, Act X of 1882, the Resident is pleased to appoint Mr. C. H. Price, Extra Assistant Commissioner in the Amraoti District, to be a Magistrate of the I st class in that district with additional powers under Sections 110, 133, and 191-C, Code of Criminal Procedure.

Mr. Ganesh Govind, Tahsildar of Chandur in the Amraoti District, is granted privilege leave for two months with effect from 1st April 1899 or from such subsequent date as he may avail himself of it.

Mr Govind Gangadher, Naib Tahsilldar of Balapur in the Akola District, is appointed to officiate as Tahsildar of Chandur during the absence of Mr. Ganesh Govind on privilege leave or until further orders.

---

## वऱ्हाड.

गेल्या ता० १ रोजीं म्युनिसिपल मेंबराची निवडणूक झाली तींत खालीं लिहिल्या प्रमाणें मेंबर निवडण्यांत आले.

अकोलें—मेसर्स देवराव विनायक वकील हरी रामचंद्र रोहणखेडकर, मिरजा आबासबेग, कृष्णाजी मल्हार पैठणकर, गणोबा राघोबा नाईक, विष्णु मोरेश्वर महाजनी, सिलीमखा दाऊदखान, दत्तात्रय विष्णु भागवत, टिकमदास ताराचंद, साराबजी मंचरजी, जयकृष्ण बगाजी नाईक, नामदेव राजन्ना, शंकर गोविंद वकील, मौलवी हकमोद्दीन वकील, रामप्रताप रघुनाथदास, रोज अ० इंजिनिअर, जमशेटजी पेस्तनजी, हिचिन्स साहेब.

खामगांव—मेसर्स सी. शेषाचीलम तहशिलदार, मुलतानचंद, बेमनजी हुमर्सजी, अनंत परशराम पोस्ट मास्तर, एच. सी. मेकेंटायर, शंकरराव रामचंद्र, केशवराव वकील शामराव रामचंद्र, नाझर व गंगाधर बाळकृष्ण.

अकोट— मेसर्स अमीरखा डाक्तर, लक्ष्मण खुशालराव, खाजेशिराजुद्दीन, रामप्रताप किसन दयाल, मारुती नाईक आसल्कार रघुनाथसिंग जमादार, नरुद्दीन काजी, कृष्णाजी सदाशिव तांबे, गणेश भगवंत देशमुख.

मौलव्ही महमद निजामउद्दीन यांची अजमीर येथें नेमणूक झाल्यामुळें पंडित सुरज नारायण असिस्टंट कमिशनर तिसरा क्लास यांस दुसरा क्लास असिस्टंट कमिशनर नेमिलें.

मि. प्राईस यांस उमरावती जिल्ह्यांत पहिला वर्ग माजिस्ट्रेट नेमिलें,

चांदूरचे तहशिलदार मि. गणेश गोविंद यांस दोन महिन्याची रजा देऊन त्याचे जागीं बाळापूरचे नायब तहशिलदार रा. गोविंद गंगाधर यांस नेमिलें.

---

## वर्तमानसार.

ब्रिटिश सरकार २१५ लाख पौंड खर्च करून सत्तर लढाऊ गलबतें बांधीत आहे.

इंग्रज सरकारनें अमिरास, असें कळविल्या ची बातमी आहे, कीं रशियाशीं तुह्मी घुसपूस चालविल्यास त्या कामांत आमचे कडून यत्किंचितही मदत होणार नाहीं.

रशियानें अफगाण सीमेवरील सर्व नाकीं धरिलीं आहेत.

इंग्लंड व मोरोको यांचे मध्यें तंटा उद्भवला आहे.

मद्रासेहून कलकत्यापर्यंत समुद्र किनाऱ्यानें आगगाडी होणार. के०

नाकोबाबाद येथील एका मिशनरी साहेबांची विधवा मुलगी एका मुसलमान स्वाराचा हात धरून निघून गेली. पुढें हा बोभाट झाल्यावर तिनें पेशावर येथें प्रसिद्धपणें एका म्हशीदींत मुसलमानी धर्म स्विकारून पूर्वी 'मेमसाहेब' होती ती आतां 'बिब्बी' बनली!

अफगाण सरहद्दी कडील गोष्ट अशी आहे कीं, अमीर व त्याचा शत्रु इशायखान यांजमध्यें गेल्या आठवड्यांत एक दोन झटापटी झाल्या व इशाकखानास आंतून रशियाची मदत आहे असें दिसलें.

ता. १ एप्रील रोजीं मि. स्पेनसर हे कलकत्यास पुनः विमान उडविणार आहेत एक पत्रकर्ता ह्मणतो कीं, सगळा बंगाल पहा याला उलटेल कीं काय इतके लोकांचे चित्त वेधून राहिलें आहे.

जावा जावांच्या भांडणावरून मुंबईस एका स्त्रीनें अफू खाऊन आत्महत्या केली. बायकांच्या भांडणाचा परिणाम कोणत्या वेळीं कसा होईल याचा नेम नाहीं, करितां पुरुषांनीं अशा भांडणा बद्दल फार सावधगिरी ठेवावी हे योग्य आहे.

विलक्षण प्रदर्शन—फ्रान्स देशांत येत्य वर्षीं एक विलक्षण प्रदर्शन भरणार आहे. या मध्यें फक्त शिकारीची हत्यारें व शिकारींत मारलेले तऱ्हेतऱ्हेचे प्राणी एवढेंच दाखविलें जातील. हत्यारांचा शोध जारीनें चालला आहे. पाषाण युगाच्या वेळेपासून मनुष्यानें यथार्थ योजिलेल्या हत्यारांपैकीं जीं जीं सांपडतील तीं तीं गोळा करण्याचा कमेटीनें निश्चय केला आहे. न्या. सि.

वैसराय साहेब यांची स्वारी अलाहाबादेस ता. ६ एप्रिल रोजीं येऊन लखनौस दुसऱ्या दिवशीं जाऊन पुढें ता. ८ रोजीं सिमल्यास जाईल असें समजतें.

झांजिबार येथें अतिशय अस्वस्थता झाली आहे. तेथील लोकांमध्यें युरोपियन लोकां विषयीं अत्यंत द्वेष उत्पन्न झाला आहे असें तिकडील आलेल्या युरोपियन सरदारानें सांगितलें.

इंग्लंडचे नामांकित वक्ते मि. जानब्रैट हे मार्चच्या २७ व्या तारखेस सकाळीं वारल्याचें दुःखकारक वर्तमान त्याच तारखेच्या तारेवरून समजतें.

रशियाचे सरदार जनरल रोजिब्याच हे चारजुईहून कर्कीस गेले. याजवरून रशियन लोकांची हालचाल पुनः सुरू झाली. असें दिसतें.

महाराणी विक्टोरिया यांची स्वारी स्पेन देशांत गेली आहे. तेथें स्पेनच्या राणी साहेबांची व त्यांची भेट झाली. सु. प.

डेकन मायनिंग कंपनीच्या प्रकरणाबद्दल गव्हरनरजनरलाच्या भेटी करितां कलकत्यास गेलेले निझामाचे पोलिटिकल सेक्रेटरी नबाब मोहसीन उलमुल्क हे हल्लीं मुंबईस आले आहेत.

डेकन मायनिंग कंपनीच्या संबंधाच्या प्रकरणाचा निकाल झाला अशी जी बातमी आहे. ती खोटी आहे असें सांगतात.

सदर्न मराठा रेल्वेचा फाटा नंजनगुडपर्यंत वाढविण्याचें ठरलें व त्यास म्हैसूरसरकारचे मंजुरी मिळाली. हें ठिकाण म्हैसूर पासून १४ मैलांवर आहे.

ड्यूक आफ बकिंगहाम हे या आठवड्यांत मरणपावले. हे पूर्वी मद्रासेस गव्हरनर होते. ठा० अ०

बेळगांव येथील म्युनिसिपालिटीच्या कागदपत्रांत कांहीं खोडाखोड झाल्याचे दिसून आल्यावरून म्यानेजिंग कमिटीचे सर्व मेंबर, चेअरमन व सेक्रेटरी यांजवर फौजदारींत काम चालविण्याविषयीं तेथील जज्ज साहेबांनीं रुकार दिल्याचें कळतें.

कांहीं राजकीय मसलती संबधानें मि. ह्यूम हे लंडनाला जाण्याचे विचारांत आहेत.

दक्षिण हैद्राबाद येथें पाण्याचे अत्यंत दौर्भिक्ष्य झालें आहे सिकंदराबाद येथें पूर्वीं कोणत्याही काळी न आटलेल्या विहिरी हल्लींच कोरड्या टणठणीत पडल्या आहेत.

काशी येथील म्युनि० ने पाण्याच्या पुरवठ्या करितां व डेनेज करितां ४० लाख रुपये खर्चण्याचा ठराव केला.

मारवाड्यांची सोनेरी टोळी युरोपियनगाडीच्या सोनेरी टोळीची कृत्यें बाहेर निघताहेत. नाहीं तोंच मारवाड्यांच्या सोनेरी टोळींचीं कृत्यें बाहेर पडलीं आहेत. कांहीं मारवाड्यांनीं आज कित्येक दिवस दुकानांतून आणि आगगाड्यांतुन माल चोरण्याचा धंदा चालविला आहे. लक्षाधीश व्यापाऱ्यांप्रमाणें पोषाक करून दुकानांतून शिरावयाचे आणि दुकानदार नमुने दाखवीत असतां ते लांटवावयाचे असा त्यांचा क्रम चालला होता. सांवत बारमल हंसराज नांवाचा एक मारवाडी त्याच्या तीन सोबत्यांसह पकडला गेला आहे. हा व्यवहार त्यांच्या निरनिराळ्या प्रदेशांतून चालला होता.

काश्मीरच्या महाराजांस पदच्युत करून त्या संस्थानचा कारभार कौन्सिलानें चालवावा असासरकारानें ठरविल्याचें कळतें.

रुप्याचें भांडें पेटींत ठेवितांना त्यांत एक कापुराची पुडी ठेवावी ह्मणजे हवेनें त्या भांड्यांला येणार काळकटपणा आपोआप नाहींसा होतो अशी एकानें युक्ति काढली आहे. क० त०

रशियांतील दक्षिण भागांतील व वायव्य भागांतील प्रदेशांत अतिशय मोठा दुष्काळ पडल्याची खबर आहे, गांवोगांव गरीब शेतकरी अन्नावाचून मरताहेत. सरकारांनीं अद्यापि तिकडे लक्ष पुरविलें नाहीं.

पारिस येथील एका वर्तमानपत्रांत अलाहाबादच्या राष्ट्रीयसभेची हकीकत प्रसिद्ध झाली आहे.

सिक्कीमकडे ज्यास्त सैन्य धाडण्याचा विचार आहे.

पोष्टानें मुलें पाठविणें— एका जर्मन पत्रांतील खालची गोष्ट लिहिली आहे. न्यूयार्क येथें जाणाऱ्या आगबोटींतून कोणी तीन मुलें पाठविली. त्यांचीं वयें ७ पासून १० पर्यंत होतीं. त्यांच्या करितां अगोदर पैसे भरून पास पोषाखास अडकून दिले होते. तेवढ्यावर त्याची प्रवासांत सर्व प्रकारची सोय होऊन तीं न्यूयार्कपर्यंत सुखरूपपणें पोंचलीं.

स्वतंत्र अमेरिकेंत १७०२००० इतकी लोकसंख्या आहे.

पंधरा फूट उंचीचा एक हाडांचा सांपळा जी. आय. पी. च्या गुटी स्टेशनाजवळ सांपडला आहे.

कोचीन येथें भयंकर अग्निप्रलय होऊन व्यापारी लोकांचें फार नुकसान झाल्याची बातमी आली आहे. ते० मि०

लढाऊ उतारूं बुडालें—सुलतान नांवाचें इंग्लंडचें अति मोठें लढाऊ झाज माल्टा येथें नुकतेंच बुडालें.

चाळीस लक्ष पौंडाचे नवें कर्ज— रेल्वे वाढविण्याकरितां येत्या सरकारी वर्षांत हिंदुस्थान सरकार लंडनांत ४०,००,००० पौंडाचें नवें कर्ज काढणार आहे.

लोखंड जडण्याच लुकण ६ भाग गंधक ६ भाग पांढरें शिसें, १ भाग बोराकस अशा तीन जिनसांचा एक जीव करावा. नंतर गंधकाच्या क्षारांत तें मिश्रण पातळ करून तुटलेले रूळ, सांधे जोडणें अशा कामास तें लावावें, आणि चांगलें सुकूं द्यावें. सुकल्यावर लोखंडाचा एक जीव होतो.

नवी हिऱ्याची खाण— म्हैसूर इलाख्यांतील अर्सीकरी तालुक्यांत हिऱ्याची खाण लागली आहे. उत्तम जातीचे असें पुष्कळ हिरे तिकडे सांपडले आहेत. म्हैसूरच्या महाराजा पासून तिकडील जागा कौलानें घेण्यासाठीं गोऱ्या व्यापाऱ्यांनीं गर्दी उडविली आहे

कांचेच्या नळीच्या एका टोकांशीं विजेचा दिवा लावून त्या नळीचा शरिराचे जे भाग उघड दिसत नाहींत त्या भागांतील रोगांची परीक्षा करण्याकडे व्हिएना येथील डाक्तर लोक उपयोग करूं लागले आहेत. या नळीनें कातड्याचे आंतील भाग सुद्धां साफ दिसतात.

शु० सु०

---

नोटीस.

रा. रा. वामनराव गोविंदराव जमादार रहाणार मूर्तिजापूर यांस खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी आह्मांस अमृतराव देशमुख यांनीं लिहून दिलेले किस्तीचे दोन दस्तऐवज तारीख २२ माहे जून सन १८८६ इसवी रोजीं गहाण दिलेले आहेत. त्या दस्तऐवजांतील सन १८८६ ची किस्तीची मुदत जवळ आलेली आहे. ह्यासाठीं चार दिवसाचे आंत येऊन आमचे गाहाण खताचे रुपये व्याजा सुद्धा देऊन सदर्हू दस्तऐवज काढून घ्यावेत असें न केल्यास रीती प्रमाणें फिर्याद करून फिर्यादीचे व नोटीसीचे खर्चासुद्धां रुपये भरून घेऊ व किस्तीचे रुपये मुदती बाहेर गेल्यास आम्हीं जबाबदार नाहीं. तारीख २–४–८९ इसवी.

सही.

सावतराम रामप्रसाद दस्तुर जैकृष्ण बगाजी खुद.

## दामोदर काशीनाथ काळे आणि कंपनी यांचा दवाखाना.

या ठिकाणीं मनुष्याचे व गुरांचे सर्व रोगांवर औषधें मिळतात.

औषधें घेण्यास फार सुलभ आहेत. कोणत्याही रोगांवर वैद्य व अलोपाथिक डाक्टर जीं औषधें देतात त्याहून आमचे जवळ असलेल्या औषधांनीं फार लौकर चांगला व फार वेळ टिकणारा गुण येतो.

पटकी, मूळव्याधि, परमा, अम्लपित्त खरूज, पैण, नायटे, खवडे, हिवताप संधिवायू दमा व खोकला, मंदर लहान मुलांचे अंगांत येणें, मुलांचे पोटांतील ढवा, गरोदर अवस्थेंतील ओकारी, बाळंतरोग व इतर प्रकारचे माणसांचे सर्व रोग ह्यांजवर उत्तम गुण देणारीं औषधें आह्मी आमचे दवाखान्यांत ठेविलीं आहेत.

गुरांचे रोग—पटकी, लाळ खेसणें, पाठीला लागणें. पोट फुगणें, गळा सुजणें, आवरक, आंचळांतून रक्त येणें, क्षतें, पोटांतील कृमी, ज्वर व इतर सर्व रोग यांजवर या दवाखान्यांत औषधें ठेविलीं आहेत. गाई, बैल हाशी, हेले, घोडे कुत्रीं मांजेर, बकरी, या जनावरांचे सर्व रोगांवर आह्मी औषधें ठेविलीं आहेत.

या दवाखान्यांत रोग्यांना औषधाबद्दल थोडी किंमत द्यावयास लागेल.

बाहेर गांवीं राहणारे लोकांना आपआपले रोगाची हकिकत लिहून कळविली असतां माफकदरानें त्यांस अभिप्राय मिळेल. औषधें मागविलीं असतां जीं औषधें आह्मी पाठवूं त्यांजबरोबर औषधें घेण्याचे माहितीचा कागद पाठवूं.

वर लिहिलेल्या कित्येक रोगांवरील औषधाचे एका कुपींत पांच मनुष्यांस पुरण्याइतकें औषध असतें.

जुने रोग व ज्या रोगांना बरे करण्यास वेळ लागतो अशा रोगांना पिडलेल्या लोकांस त्यांची मर्जी असेल तर ठराव करूं ठरावाची जी रकम ठरेल त्यापैकीं कांहीं आगाऊ द्यावी लागेल.

"हा दवाखाना उमरावती येथें भुसार दरवाजा बाहेर मिस्टर प्रल्हाद नारायण जोग वकील यांचे वाड्यांत खालचे दिवाणखान्यात आहे"

उमरावती मेडिकल हॉल ता० २४-१०-८८

दामोदर काशिनाथ काळे आण कंपनी.

## विक्रीस तयार.

कळविण्यांत येतें कीं बंगाल नागपूर रेल्वे स्टेशन गोंदिया येथें ऐन व बिजाच्या चांगल्या सरळ व जुन्या अशा मयाली सुमारें २००० आहेत. लांबी बारा फुटा पासून वीस फूट पर्यंत व चौरस एक फूट. ह्याची माहिती पाहिजे असल्यास खालीं सही करणाऱ्याकडे मिळेल.

आपाजी विनायक कॉनट्राक्टर गोंदिया.

---

☞ हें पत्र अकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

| | | | |
|---|---|---|---|
| ही | " | ३ | ८ |
| सालअखेर | " | ७ | " ८ |
| किरकोळ अंकास...... | | | |

नोटीशीबद्दल,
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस.........०।

annum in advance 5 Postage 13 as.
Per annum in arrears 7 "1Rs. 8 as.
Six monthly...........3 " 8 as.
Single copy..........................4 as.

Advertisements
Below 10 lines...2Rs.
per line over10... 4as.
Repetition derline3as


# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.


VOL XXIII — AKOLA MONDAY 15 APRIL 1889 — NO. 14

वर्ष २३ — अकोला सोमवार तारीख १५ माहे एप्रील सन १८८९ इ० — अंक १४


## शारदासदन.

आमच्या देशांतील स्त्रियांच्या शिक्षणास साधारणतः साहाय्य व्हावें व विशेषें करून उच्च वर्णांतील निराश्रित विधवांची व इतर स्त्रियांची स्थिति सुधारावी या उद्देशानें शारदासदन या नांवाची शाळा चौपाटीवर नवीन वुईलसनच्या कालेजाच्या पाठीमागें स्थापण्यांत आली आहे. शाळा सोमवार ता० ११ मार्च १८८९ रोजीं सुरू झाली आहे. शाळेचे कांहीं नियम खालीं लिहिल्या प्रमाणें आहेत. ज्या कोणी विद्यार्थिणींची शाळेंत येण्याची इच्छा असेल त्यांनीं खालीं सही करणारांच्या नांवें लेखी अर्ज पाठवावें. किंवा समक्ष येऊन भेटावें त्यांस शाळेंत घेण्याचा शाळेच्या साह्यकारिणी मंडळीचा अभिप्राय पडला ह्मणजे त्यांस तसें कळविण्यांत येईल. अभिप्राय उलट पडल्यास तसें कळविण्यांत येईल. लेखी अर्ज करणारांनीं आपलें नांव, गांव वगैरे सर्व पत्ता स्पष्ट लिहावा.

ज्यांचीं घरें शाळेपासून बरेंच लांब आहेत त्या मुलास एखादी बाई किंवा गाडी पाठवून शाळेंत आणण्याची व घरीं पोहोंचविण्याची तजवीज केली जाईल.

( पंडिता )रमाबाई शाळेच्या
मुख्य अध्यापिका.

३ विद्यार्थिणी.— या शाळेंत प्रथम निराश्रित उच्च वर्णांतील विधवा व इतर निराश्रित उच्च वर्णांतील स्त्रिया यांचो सोय करून मग सवड राहिल्यास इतर विद्यार्थिणींस घेतले जाईल. विद्यार्थिणींचें वय तिशीच्या आंत असावें. विद्यार्थिणीस शाळेंत दाखल करण्या पूर्वीं तिच्या चाली रीतीविषयीं शाळेच्या साह्यकारिणी मंडळीकडून चांगली चौकशी केली जाईल मंडळीची खात्री झाल्यावांचून विद्यार्थिणीस घेतलें जाणार नाहीं.

४. शिक्षण.— ह्या शाळेंत साधारण व विशेष धंद्यांचें असें दोन प्रकारचें शिक्षण विद्यार्थिणींच्या शक्ती प्रमाणें व इच्छेप्रमाणें दिलें जाईल. साधारण शिक्षणांत मराठी, गुजराथी. इंग्रजी व संस्कृत इतक्या भाषा विद्यार्थिणींच्या इच्छेप्रमाणें शिकविण्यांत येतील, तसेंच व्याकरण, भुगोलविद्या खगोलविद्या, इतिहास, गणित, रसायणशास्त्र, वनस्पतिशास्त्र, प्राणीशास्त्र, भूगर्भशास्त्र आरोग्यशास्त्र, शारीर, इत्यादि विषयांचें अवश्यक तितकें शिक्षण देण्यांत येईल. शिवाय नीति, मर्यादा, व्यवहार गृहव्यवस्था इत्यादि महत्वाच्या गोष्टींच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष पुरविलें जाईल.

५ धंद्यांच्या शिक्षणांत शिवणकाम, कशीदा लोकरीचें काम, चित्र लेखन, चिनामातीच्या भांड्यांवर नकशा व चित्रें काढणें, मातीचीं चित्रें करणें, फोटोग्राफ घेणें, लांकडावर नकशी खोदणें, कुरेख तऱ्हेचें बुरडी काम, व किंडरगार्टन नायक बालशिक्षणपद्धति इत्यादि कला शिकविण्यांत येतील.

६. फी.— ज्या विद्यार्थिणींस फी देण्याचें सामर्थ्य असेल त्यांपासून माफक फी घेण्यांत येईल. पण ज्या विद्यार्थिणींस फी देण्याची शक्ति नसेल त्यांस फुकट घेतलें जाईल.

७. निराश्रित विद्यार्थिणीस आश्रय— ज्या विद्यार्थिणींस आपला निर्वाह चालविण्याचें सामर्थ्य नाहीं असें शाळेच्या साह्यकारिणी मंडळीस दिसेल त्यांस शाळेंत रहावयास जागा अन्नवस्त्र, व पुस्तकें ही पुरविलीं जातील. अशा विद्यार्थिणींत विधवा स्त्रियांचा हक्क पहिला समजला जाईल.

८. शाळेंत राहणाऱ्या विद्यार्थिणी— आपला निर्वाह साधारणपणें चालविण्यास समर्थ असून ज्या विद्यार्थिणी शाळेंत राहूं इच्छितील त्यास घर भाड्या खेरीज आपला दुसरा सर्व खर्च द्यावा लागेल. आपला सर्व खर्च सोसण्याचें सामर्थ्य असेल अशा विद्यार्थिणी कडून सर्व खर्च घेण्यांत येईल.

९ धर्मस्वातंत्र्य.— शाळेंत राहाणाऱ्या विद्यार्थिणीस धर्मसंबंधानें व चालीरीतींच्या संबंधानें कोणत्याही प्रकारची गैरसोय न होऊं देण्याकडे विशेष लक्ष पुरविलें जाईल. कोणतेही विशेष धर्ममत शिकविलें जाणार नाहीं.

शाळेची आणखी कांहीं विशेष माहिती पाहिजे असल्यास पंडिता रमाबाइकडे किंवा खालीं ज्यांचीं नांवें दिलीं आहेत त्यांपैकीं कोणत्या तरी एखाद्या गृहस्थाकडे पत्र पाठविल्यास किंवा त्यास समक्ष भेटल्यास मिळेल.

साह्यकारी मंडळी पैकीं कित्येकांचीं नांवें
रा. ब. महादेव गोविंद रानडे, पुणें.
डा. रामकृष्ण गोपाळ भांडारकर, पुणें
रा. ब. गोपाळराव हरी देशमुख, पुणें.
" लालशंकर उमयाशंकर, नासिक.
" शंकर पांडुरंग पंडित, अहमदनगर.
रा. सा. महिपतराम रूपराम, अहमदाबाद.
आ. काशिनाथ त्र्यंबक तेलंग, माल्यूरोड, मुंबई.
रा. सा. वामन आबाजी मोडक, एलफिन्स्टन हायस्कूल, मुंबई.
डा. आत्माराम पांडुरंग, चौपाटी मुंबई.
डा. सदाशिव वामन कार्णे, ठाकुरद्वारानजिक पालवाचा रस्ता मुंबई.

---

नोटीस.

नोटीस पैकू वल्लद जगनाजी गाईकवाड जात कुणबी राहणार कसबे वणी तालुके वणी जिल्हे वणी यांस खालीं सही करणार याजकडून देण्यांत येते कीं कजबे वणी येथील आमचे शेतबनाम नैनाईचें सन १२९८ फसली सालास तुह्मास तिजाई बटाइनें वहितीस दिलें होतें तें साल भरून गेले आतां सन १२९९ फसली सालास तिजाई बटाईनें आम्ही तुम्हास देत नाहीं पाहिजे असल्यास गालिना ठेका रुपये ४० चाळीस शिके कलदारास कबूल असल्यास देऊं मात्र ही नोटीस पोंचल्यापासून आठ दिवसाचे आंत तुम्ही आम्हाकडे येऊन योग्य रितीनें दस्तैवज लिहून द्यावा नाहींतर शेत वाहू नये सदरील आमचे योग्य परवानगी वाचून शेत वहीत कराल तर वर लिहिलेला सालीना ठेका यां नोटिसीचे आधारें तुम्हास कबूल झाला असें समजून या नोटिशीचे खर्चासह ठेक्याचे रुपये तुम्हापासून वसूल करण्यांत येतील कळावें तारीख १० माहे एप्रील सन १८८९ इसवी

सही
गणेश केशव देशमुख राहणार रावेरी
प्रगणें राळेगांव तालुके केळा
पूर जिल्हावणी दस्तुर खुद्द

---

नोटीस.

कवतिकाबाई जवजे नारायणराव देशमुख तर्फे मुखत्यार गणपतराव वल्लद देवराव देशमुख मौजे अंदुर तालुके बाळापूर यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यात येते कीं, आम्ही तारीख ११ माहे मार्च सन १८८९ इसवी रोजीं तुम्हास मुद्दाम शिपाई पाठविला व त्याज बरोबर पत्रांत कळविलें कीं तुमचा रुसुमाबद्दलचा पैसा घेऊन जावा. तरीपण तुम्ही पैसा घेण्यास न येतां पत्राचें उत्तर ही पाठविलें नाहीं. सबब आम्ही जनाब दिपुटी साहेब बहादूर यांचे हुकुमानें खुशालचंद फुलचंद साहु दुकान पेठ बाळापूर यांचे येथें पैसा जमा केला आहे तो १०३७०=।१ एक हजार सदतीस रुपये तीन आणे चार पाई. सदरहू पैसा तुम्ही येऊन त्याचे वरून घेऊन जावें. जर आपण सदरहू पैशाबद्दल दिवाणींत दावा कराल तर मी कोणतेही प्रकारचा खर्च देणार नाहीं. तो खर्च तुमचा तुम्हास सोसावा लागेल. करितां नोटीस पावल्या पासून १२ दिवसाचे आंत तुम्ही पैसा घेऊन जावा कळावें तारीख ८—४—८९ इ०

( सही )
दवलतराव फत्तेशिंग देशमुख दस्तुर खुद्द.

---

वऱ्हाडसमाचार.

मिती चैत्र शुद्ध १५ शके १८११

---

आह्मी मागील अंकीं कळविलेंच आहे कीं क्राफर्ड प्रकरणाचा निकाल आणखी कांहीं दिवस बाहेर येऊं शकत नाहीं व तो पर्यंत लोकना व मुख्यत्वें करून क्राफर्ड साहेबांला आपले दिवस विवंचनेंत घालविले पाहिजेत.

क्राफर्ड साहेबांस सस्पेंड केल्याची, व ते वेषांतर करून पळून गेल्याची, व त्याला वारंटा वरून धरून पुण्यास आणल्याची बातमी प्रथमतः जेव्हां लोकांना कळली तेव्हां पासून सर्व लोकांचें चित्त त्या गोष्टीकडे बरेंच वळलें. साधारणतः सर्व युरोपियन लोकांना व मुख्यत्वें करून सिविल सरवंडला तर आपला मानमरातब, व सत्कीर्ति ह्या प्रकरणाच्या निकालावर अवलंबून आहे असें वाटू लागलें व नेटिव्ह लोकांना, बरेच दिवसां पासून कुजत असलेलें पाप बाहेर पडण्याचा प्रसंग आपोआप आला ह्मणून थोडासा आनंद वाटला. ह्या वेळीं लार्ड रि साहेबांनीं आपली न्याया विषयीं दाखविलेली आस्था व स्वकर्तव्य कर्माची चाडही फार प्रशंसनीय झाली आहेत. आणि त्याच प्रमाणें ह्या प्रकरणाची कमिशन पुढें चौकशी होऊन सर्व खरें तथ्य बाहेर येईल असें सर्व लोकांस वाटलें.

त्या कमिशनचा परिणाम कसाही होवो. परंतु त्या कमिशन पुढें साहेब बहादूर हे आरोपी झाल्या वरून बऱ्याच वाईट वाईट गोष्टी उजेडांत आल्या.

ही गोष्ट खरी आहे कीं, क्राफर्ड साहेब बरेच दिवसां पासून लांच घेतात असें लोक ह्मणत असत. परंतु कायद्याच्या भीतीमुळें ती उजेडांत आणण्यास कोणाची छाती होईना ही गोष्ट केवळ नेटिवासच माहित होती असें नाहीं तर युरोपियन लोकांना देखील ठाऊक होती; असें त्यांच्या पैकीं कांहीं न्यायप्रिय लोकांकडून 'पायनीर' पत्रामध्यें जीं पत्रें लिहून आलीं आहेत त्यावरून स्पष्ट कळून येतें.

जेव्हां हें प्रकरण पहिल्यानदां सुरू झालें तेव्हां लोकांनीं तर त्यावर विश्वास सुद्धां ठेविला नाहीं. व त्याच वेळीं इंग्लिश लोकांच्या न्यायाच्या गोडी विषयीं त्यांना फार आश्चर्य वाटलें. हें प्रकरण सुरू झाल्या बरोबर इंग्रजी पत्रकारांनीं ओरड सुरू केली. व लार्ड रि साहेबांनीं केलेल्या गोष्टीबद्दल त्यास दोष देऊं लागले. इतकेंच नाहींतर कमिशनचा रिपोर्ट सेक्रेटरीकडे जातो आहे असें समजतांच भलभलत्या गोष्टी सांगून इंग्लंडचें लोकांचें मत या संबंधानें कलुषित करण्याचा प्रयत्न चालविला. लंडन टाईम्सच्या कलकत्ता येथील एका बातमीदारानें तर, हें कृत्य केवळ ब्राह्मणाच्या कटा मुळें उपस्थित झालें आहे अशा प्रकारचा लेख लिहिला. परंतु खरें तें खरें तें कधींही खोटें व्हावयाचें नाहीं.

क्राफर्ड साहेबांनीं वेषांतर करून मुंबईस पळून जावे, त्यांचा हणमंतरावांशीं संबंध असावा वगैरे गोष्टीवरून एखाद्या निःपक्षपाती गृहस्थाच्या खचित वाटेल कीं खरोखर ह्या ठिकाणीं अनीतिचा कांहीं तरी लेश आहे.

काफर्ड साहेब मुंबईस वेषांतर करून कां पळून गेले. या विषयीं टाइम्सपत्रकारानें जरी बरीच कारणें दिलीं आहेत तरी ही गोष्ट निर्विवाद आहे कीं, काफर्ड साहेबां सारख्या मोठ्या मनुष्यानें वेषांतर करून पळून जाण्यास कांहीं तरी गुप्त कारण असावें. व ही गोष्ट जो पर्यंत स्पष्ट रीतीनें लोकांस समजून दिली जात नाहीं तों पर्यंत लोकमत कधीं ही बदलावयाचें नाहीं. कमिशनरनें किंवा स्टेट सेक्रेटरीनें जरी साहेबांना निर्दोषी ठरविलें, तरी लोकनिंदेचा ठराव उलटेल अशी गोष्ट नाहीं.

नेटिव्ह लोक नीतिमध्यें फार हलके आहेत असें इंग्रजीपत्रकाराचें ह्मणणें आहे. परंतु ही गोष्ट खरी आहे कीं जों पर्यंत "सोन्याची टोळी" ( Golden gang ) बाहेर आली नव्हती तों पर्यंत तरी अशा प्रकारचा दोषारोप नेटिवावर चालिला असतां परंतु यापुढें तो यथार्थ आहे असें ह्मणतां येईल काय?

कोणत्या ही जातीचा किंवा कोणत्याही धर्माचा किंवा कोणत्या ही देशांतला मनुष्य घ्या तो मनुष्य स्वभावाच्या दोषास पात्र आहेच. स्वभावाची पाहाण्याची परीक्षा जों पर्यंत प्रयोजन अलें नाहीं किंवा जों पर्यंत तो मोहोंपाशांत सांपडला नाहीं तोंपर्यंत तो चांगलाच ह्मणता येईल. परंतु एकदां मोह पाशाच्या कचाट्यांत सांपडल्यावर त्यांतून पार पडेल किंवा नाहीं याचा मात्र संशयच.

कोणी कशाही वल्गना केल्या तरी इंग्रज सरकार न्यायी आहे त्यांच्या न्याय कोर्टांत एकास न्याय दुसऱ्यास अन्याय अशी गोष्ट कधीं ही होणार नाहीं.

## डोंगर पोखरून उंदीर काढला.

आज कितीक दिवस वऱ्हाडच्या न्याय खात्यांत सुधारणा होणार होणार ह्मणून अफवा उठली होती. सध्यांच्या न्यायसंस्था अपुऱ्या व गैरसोईच्या आहेत. अशा बद्दलची लोकांची रड सरकारच्या कानापर्यंत जाऊन ज्युडिशियल स्कीम नांवाची नवीन व्यवस्था सरकार करणार असें खात्रीनें ठरलें होतें. या व्यवस्थेबद्दल लोकांच्या मनांत नाना तऱ्हेच्या कल्पना येऊन सर्वांचे डोळे तिजकडे लागले होते. सरते शेवटीं गेल्या महिन्याच्या ३० व्या तारखेच्या सरकारी ग्याझिटांत एकदाचे हे नियम आले. परंतु काय इसापनीतींतील गोष्टी प्रमाणें सर्व रात्रभर डोंगराला प्रसव वेदना होऊन शेवटीं एक उंदीर चटकर उडी मारून बाहेर निघाला आहे. या नवीन व्यवस्थेसंबंधानें नियम करतांना सरकारनें लोकांच्या हिताकडे, सोईकडे व हाजर झालेल्या ओरडी कडे मुळींच लक्ष दिलें ना. हीं असें ह्मटल्या वाचून आमच्यानें रहावत नाहीं.

सांप्रत या संबंधानें जे नियम कायद्याच्या रूपानें बाहेर आले आहेत त्यांत विशेष ह्मणून बिलकुल नाहीं. हे मग कोणी तयार केले असतील परमेश्वर जाणे. अर्थात सरकारच्या इतर कायद्या प्रमाणें हा कायदा तयार करण्यापूर्वीं प्रांतांतील सर्व मुख्य अधिकाऱ्यांचीं मतें घेतलीं असतील परंतु हें सर्व काम अगदीं गुप्त रीतीनें झालेलें आहे. कमिशनर ज्युडिशियल कमिशनर व सर्व डेपुटी कमिशनर यांच्या पुढें हे नियम आले असतीलच परंतु त्यांनीं आपल्या खऱ्या अनुभवाचा न्याय दृष्टीनें उपयोग न करितां आपलीं मतें यांच्या अनुकूल कशीं दिलीं याचें आह्मास मोठें नवल वाटतें. आमच्या इकडील कांहीं प्रमुख वकील मंडळीस या कायद्यांतील कांहीं व्यंगें अगोदरच समजलीं होतीं असें कळतें व त्यांनी सार्वजनिक सभेमध्यें हा प्रश्न काढून त्या संबंधानें एक अर्ज ही पाठविला होता. परंतु अलिशान रेसिडेंट साहेब यांजकडून "कायदा इंडिया सरकारकडे गेला आतां त्या संबंधानें विचार करितां येत नाहीं" असा जबाब मिळाल्याचें कळतें.

या कायद्यांतील ठळक ठळक दोष आज आम्हीं पुढें आणणार आहों वर ह्मटलेंच आहे कीं सदरहू नियमांत लोकांच्या हिताकडे किंवा सोईकडे मुळींच लक्ष दिलें गेलें नाहीं. आजपर्यंत न्याय मिळण्याच्या ज्या कांहीं महत्वाच्या सोई त्याच्या हातीं होत्या त्याही त्यांजकडून काढून घेतल्या आहेत. आमच्या इकडील न्यायाधीश अपील कोर्टे यांत जे दोष दिसून येत ते काढून टाकणें एकीकडेच राहून उलटी सर्व सत्ता त्याच्याच हातांत ठेविली आहे. सध्यां आमच्या लोकांची मोठी रड हीच होती कीं, हायकोर्टासाठीं खर्च व त्रास भोगीत हैद्राबादेस जावें लागतें करितां आमच्या प्रांतांतच ती सोय करावी. सरकारानें ही गोष्ट मान्य केली. पण कशी तुह्माला हैद्राबादेस जाण्याचा त्रास होतो ना! ठीक आहे. आम्ही अशी तजवीज काढितों कीं, तुम्हाला हैद्राबादेस जाण्याची गरजच पडणार नाहीं. हैद्राबादचें रेसिडेंटचें कोर्टच बंद करून टाकतो ह्मणजे झालें कीं नाहीं. जे काय होईल तें तुमच्या प्रांतांतच. प्रांतांतल्या प्रांतांतील सर्व व्यवस्था हल्लीं प्रमाणें कायमच. मात्र इकडे न्याय मिळाला नाहींतर हैद्राबादपर्यंत भांडून न्याय मिळविण्याची जी आशा होती ती सर्व नष्ट झाली. ५०० रुपयाच्या वरील दाव्यांना मुळीं दुसरें अपीलच बंद. ५०० च्या खालीं मात्र दोन अपिलें. ह्मणजे महत्वाच्या दाव्यांना आजपर्यंत दोन अपिलें चालत असत तीं अजिबात बंद करून टाकिलीं. लोकांनीं हैद्राबादचें कोर्ट नको ह्मटलें खरें परंतु तसलें कोर्ट आमच्या प्रांतांत ही नको असें केव्हां ह्मटलें होतें. तेव्हां ही जी एक महत्वाची व मोठी उपयुक्त सोय आजपर्यंत लोकांस बरी वाईट मिळत होती ती समूळ नाहींशी करून टाकिली. मुंबईसारख्या रेग्युलेशन प्राव्हीन्स मध्यें ह्मणजे जेथें न्यायाधीश तेंच काम शिकलेले मोठें विद्वान व आपल्या कामांत निष्णात असे आहेत तेथें ही एका ठिकाणीं न्याय झाला नाहीं तर त्याच्यावर दुसरें अशीं एकावर एक दोन दोन तीन तीन साधनें आहेत. मग आमच्या प्रांतांत जेथें न्यायाधिशाच्या सिंहासनावर बसलेले बहुतेक लोक हेंडरहप खात्यांतून आलेले, ज्यांना कायदा ह्मणजे कामावर आल्यावर शिकावयाचा, व कितीकवेळ काम केल्यावर ही ज्यांचे कायद्या संबंधीं अज्ञान अनेक प्रसंगीं दिसून येतें अशा ठिकाणीं असलीं साधनें असलेलीं बंद व्हावीं हें नवीन नाहीं काय? आमच्या प्रांतांतील न्यायाधिशांनीं केलेले उत्कृष्ट न्यायाचे मासले देऊं लागलें असतां कागदाच्या कागद भरून जातील. अगदीं खालच्या दर्जाच्या कोर्टी पासून तों थेट ज्युडिशियल कोर्टापर्यंत असल्या गोष्टी नेहमीं घडलेल्या आपण ऐकितों. मग अशी अवस्था जेथें आहे तेथें लोकांना असलेली सोय बंद करून सर्वस्वी प्रांतांतील अधिकाऱ्यांच्या हातीं सोंपविणें या सारखें चमत्कारिक दुसरें काय आहे. हल्लींच्याच व्यवस्थेंतच सुधारणा करण्यास पाहिजे होती. ही नवीन व्यवस्था अमलांत येण्यास आमचे हल्लींचे अधिकारी मंडळी मुळींच योग्य नाहीं असें ह्मणण्यास हरकत नाहीं. सरकारला ही नवीन व्यवस्था आमलांत आणावयाची आहे तर त्यांनीं तिला योग्य असें दुसरें वाकबगार अधिकारी तरी बाहेरून आणावे असें आह्मी ह्मणतो.

आमच्या प्रांतस्थ लोकांनीं या संबंधानें चळवळ अगोदर केली पाहिजे. सार्वजनिक सभेनें हें काम अगोदर हातीं घेऊन लोकमत सरकारच्या कानावर घातलें पाहिजे. आमच्या सरकारनें ही आपलाच हेका न करितां लोकमताकडे लक्ष देऊन व योग्यायोग्य विचार करून जें नीट दिसेल तेंच केलें पाहिजे. आम्हास असें कळतें कीं, आमचे हल्लींचे कमिशनर साहेब मि० प्लाउडन व रेसिडेंट मि. हावेल यांना देखील या कायद्यांतील कांहीं कांहीं गोष्टी पसंत पडल्या नव्हत्या. असें असतां हिंदुस्थान सरकारनें आपल्या या मोठ्या अधिकाऱ्यांच्या मताचा विचार न करितां आपलाच हेका करावा. हें नवल नव्हे काय?

## वऱ्हाडांतील न्यायाच्या कोर्टाचा नवीन कायदा (ज्यु. स्कीम.)

हा कायदा गेल्या महिन्याच्या ३० व्या तारखेच्या सरकारी ग्याझिटांत प्रसिद्ध झाला आहे व तो येत्या जुलाई महिन्याच्या पहिल्या तारखेपासून अमलांत येईल. याचा गोषवारा आम्ही आपल्या वाचकांकरितां येथें देतो:—

आजपर्यंत न्यायाचें मुख्य कोर्ट ( हायकोर्ट ) रेसिडेंट हैद्राबाद यांचे होतें तें बंद होऊन ज्युडिशियल कमिशनरचें कोर्टच हायकोर्ट समजलें जाईल. दिवाणी व फौजदारी अपिलाचें मुख्य कोर्ट यापुढें ज्युडिशल कमिशनर यांचेंच समजावयाचें. या कोर्टाच्या हाताखालीं पहिला, दुसरा व तिसरा या वर्गांचे डेपुटी कमिशनर पहिला, दुसरा व तिसरा या वर्गाचे असिस्टंट कमिशनर आणि पहिला व दुसरा या वर्गांचे तहशिलदार यांचीं दिवाणी कोर्टे राहतील. असिस्टंट कमिशनरा मध्यें एक्स्ट्रा अ. कमिशनर व तहशिलदार यांमध्यें आस्याची यांचा समावेश होतो.

डेपुटी कमिशनर यांचे कोर्ट अव्वल दाव्याला सर्वांत मोठ्या दर्जाचें कोर्ट समजलें जाईल. या कोर्टांत कितीही रकमेचे दावे आले तरी ते चालतील. त्या खालच्या दर्जाच्या कोर्टी खालीं दिलेल्या रकमा पर्यंत दावे चालतील:—

पहिला वर्ग असिस्टंट कमिशनर—५ह. रु. प.
२रा ........................१ हजार....
३रा ........................५०० रु.
१ ला वर्ग तहशिलदार....३०० रु...
२ रा ........................१०० रु.

या शिवाय दुसऱ्या कोणत्याही अधिकाऱ्यांस डे० क० चे किंवा तहशिलदाराचे दिवाणी अधिकार देण्याचा अधिकार रेसिडेंट साहेबांस आहे. अशा रीतीनें डे० क० चे अधिकार मिळालेल्या अधिकाऱ्यांस सिव्हिल जज्ज व तहशिलदाराचे अधिकार मिळालेल्या अधिकाऱ्यांस मुनसफ हीं नांवें दिलीं जातील. त्याच प्रमाणें पहिला व दुसरा वर्गाचे असिस्टंट कमिशनर यांस अनुक्रमें ५०० व हजार रुपया पर्यंत स्मालकाज कोर्टाचे अधिकार रेसिडेंट साहेबांस देतां येतील. योग्य वाटेल त्या ठिकाणीं एखाद्या नायब तहसिलदारास ही ५० रुपये पर्यंत स्मालकाज कोर्टाचे अधिकार देतां येतील.

अपीलें

डेपुटी कमिशनरच्या हाताखालील कोर्टांनीं ५०० रुपया खालील दिलेल्या अव्वल दाव्या वरील हुकूमनाम्यावर काय देशीर अपील डेपुटी कमिशनरकडे होईल. डे. कमिशनर, व पहिल्या आणि दुसऱ्या वर्गाचे असि. कमिशनर यांच्या हाताखालील सिव्हील जज्जानीं ५०० रुपया वरील दिलेल्या अव्वल दाव्यावर व त्याच प्रमाणें डेपुटी कमिशनर आणि जे सिव्हील जज्ज डेपुटी कमिशनरच्या हाताखालीं नाहींत त्यांहीं दिलेल्या अव्वल हुकुमनाम्यावर अपील जुडिशिल कमिशनरच्या कोर्टांत होईल. जुडिशियल कमिशनर यांच्या हाताखालच्या सर्व अपील कोर्टावर अपील जुडिशल कमिशनरकडे होईल.

जुडिशिल कमिशनर यांस पुढील विषयांवर नियम करण्याचे अधिकार दिले आहेत:—

(१) निरनिराळ्या कोर्टांत कोणते अर्जनविस असावे

(२) कोर्टांनीं कोणत्या नमुन्याचे शिक्के वापरावे

(३) ज्या मुकद्दम्यांत नकला देतां येतात असे मुकद्दमे चालविण्याच्या रिती व नक्कल फी आणि शोधन फी यांचे दर.

(४) कोर्टांतील क्लार्क वगैरे लोकांस निरनिराळे अधिकार देणें.

(५) आफिसांतील बुकें, नमुने, तक्ते वगैरे कसे ठेवावे.

(६) कोर्टाच्या कामाची देखरेख तपासणी इत्यादिकांची योजना.

(७) न्याय खात्यांतील लोकांनीं आपलीं कामें चांगल्या रितीनें करावी या करितां योजावयाचे उपाय.

सदरहू नियम रेसिडेंन्ट साहेबांनीं मंजूर केल्यावर रेसिडेन्सी आर्डर मध्यें प्रसिद्ध होतील व नंतर त्यांची अमलबारी होईल. अर्जनवीसासंबंधाचे नियम त्यांनीं मोडल्यास ५० रुपये पर्यंत दंड करण्याचा अधिकार ज्युडीशल कमिशनरांस आहे. बाब (७) यांत सांगितल्या अन्वयें क्लार्क वगैरे लोकांनीं आपल्या कामांत हयगय केली अगर अन्यप्रकारें गैरवर्तन केलें तर त्यास एक महिन्याचा पगार दंड करण्याचा नियम केला जाईल. कोणतें कोर्ट कोणत्या ठिकाणीं भरावें या बद्दल नियम रेसिडेंट साहेब ठरवितील व ते नियम होईपर्यंत कोर्टाच्या हद्दींत तें कोठें भरविण्यास हरकत नाहीं.

The Berar Samachar

MONDAY APRIL 15 1889

## THE NEW JUDICIAL SCHEME.

We said in our last that the new law which is to come into operation in coming July was very detective; and the very first defect was that it gave only one appeal in cases above 500. This is only about the curtailing of remedies to clients; but there is yet another and a very radical defect in the new law and that is the mixing up of the Civil Judicial and executive functions. The evil that had to be cured is there in all its vigour. The change suggested in the existing system referred to this separation being very necessary; and yet nobody has attended to it and the new scheme leaves things just where they are and perhaps makes them worse. This mixing up of the two functions has, as has been repeatedly shown in these columns led to great injustice by the subordinate Judicial officers being under the control of the Deputy Commissioners in almost every capacity of the latter. This sacrifice of the independence of the subordinate Judicial service nobody has looked to—we mean- none of the authorities, although the people of the province have cried themselves hoarse over the matter. This is not a sentimental grievance as may at first sight appear, there are not a few cases in which the subordinate have received directions from superior officers to act in such and such a way. Besides this standing evil of the system there is another and that is that civil work has to be ignored and shelved on often *sine die*. Revenue work *must* be done and so *must* be criminal; poor civil work which pays government most and can complain the least is put back. What a Justice to litigants in civil cases.

It is said that the opinion of local officers supported this separation but if that is the case who is responsible for this omission from the new rules. Certainly it must be the foreign office of the Government of India. Things appear to be some how extremely mismanaged there.

Perhaps the great obstacle in the way suggested by the higher authorities is that creating an independent High Courts means increased expenditure and that the separation of the two functions means also so much more spent. But why should the Government be so chary to spend an extra lakh of rupees when they are not so particular in all other respects about their trusty. If more money has to be spent, it has to be spent on a useful purpose- a purpose which it is one of the most important functions of a civilized government. And what does it matter really, if more is spent to give people real justice? But as the Sarvajanik Sabha's note spent up to Government shows that with proper arrangement with the existing staff the province can get a High Court with only an extra lakh or so. But who is to take all this trouble to consider the Sabha's note.

A public meeting was convened, we learn at Amraoti, to consider what steps should be taken in connection with the coming sheme; and it was resolved to send a telegram to the Government of India to suspend the operation of the new rules and to memorialize Government on the subject.

## (EDITORIAL NOTE.)

The elections in the local Municipalities show a fair percentage of votes that actually polled. In Akola out of 1065 voters on the last revised list 435 or above 40 percent polled; at Bassim out of 714 voters, 173 actually polled or a little above 24 percent; at Amraoti out of 1897 voters 656 polled; or above 34 percent at Elichpur City out of 1270 voters 322 appeared, or above 25 percent; at Shegaon out of 558 voters 366 appeared or 65 percent and more judging by these figures it is fair to say that a considerable interest was taken by the voters at the elections. It would appear that as the 1st April was a Hindoo holiday the first of the Hindoo year many people did not actually care to come to the poll. We may hope for much good at the hands of the new Municipalities.—

Colonel Bullock is about to retire; and we feel great pleasure when we say that he is an officer who is universally liked in Berar. In the district where he is now, every poor ryot knows his Dipty Sab as well as his Patel or Pandia. In his Judicial capacity, he is about the only military officer who is fit to hold office on the Bench. He had exemplary patience and the public will know how much the local Bar esteemed him when they learn from us that the whole Bar at Amraoti went up to him on 8 th April and assured him that they were satisfied that he had done his best. He hated any injustice to ulaties and others that were unfortunately concerned in the *Surbarai* business and he always took particular care to see the payments *made* to people, on his tours. He *did* very good service, to Government on the Daugs Frontier by the settlement of long-disputed claims and it is a pity that his services in Berar for such a length of time, should not have been able to bring him a higher appointment which he richly deserved.

We have been losing good men of late from the province and Col. Bullock's departure from the province is much to be deplored. The Amraoti towns people assembled in a public meeting have, we learn, asked him to return to India after the expiry of his leave which to say the least is a very high compliment to him. We really think that the higher authorities would be making a great mistake not to provide for Col:- Bullock in the new scheme.

It is expected that Mr. R. D. Hare, whose services were lent to H. H. the Nizam's Government, will be one of the Session Judges. Mr. Hare is a very able officer, of great promise.

Colonel R. Bullock, Deputy Commissioner, Amraoti District, having obtained long furlough to Europe, gave over charge of his duties on the 8th instant to Mr. A. Elliot, Special Assistant Commissioner. Captain Morris, Assistant Commissioner, Ellichpur District, is to take over Mr. Elliot's duties. Colonel Bullock is expected to leave Amraoti about the 15th instant.

It is stated that Mr. D. Fitzpatrick C. S. I., Chief Commissioner of Assam will assume the duties of Resident at Hyderabad in the course of the summer.

## वऱ्हाड.

कारंजा तारीख १२।४।८९ इसवी रोजीं दोनप्रहरीं यांस मूलजी जेठा आणि कंपनी यांच्या कंपौडांत आगीचा मोठा प्रलय झाला हजार बाराशे रुईचे बोझे जळून खाक झाले नुकसान सरासरी एक लक्षावर झालें असा अजमास आहे. आग विझविण्या करितां पुष्कळ लोक झटत होते पण त्यांचे सर्व प्रयत्न व्यर्थ गेले. खुद्द मुळजी जेठाचे एजंट मि० प्रयागजीभाई यांचे पाय भाजले इतकें जातीनें ते झटले पण ईश्वरेच्छे पुढें कांहीं चाललें नाहीं.

अकोट येथील पोष्टमास्तर व शिपाई यांजवर रजिष्टर पत्रांतून नोटा काढून घेतल्या बद्दल फौजदारी मुकद्दमे मे. डेव्हीस स्पे. अ. क. याज पुढें चालें होतें त्याचा निकाल तारीख १३।४।८९ इसवी रोजीं झाला शिपायास चार वर्षांची शिक्षा झाली व पोष्टमास्तर निर्दोषी ठरला आह्माला जी हकिकत कळली होती त्या मानानें निकाल फार सुरेख झाला.

मि. आवर्ड स्पे. अ. क. यांनीं आणखी एक महिन्याची रजा जास्त घेतली असें ह्मणतात.

कर्नल आर. बुलक. डे. क. उमरावती यांनीं आपले कामाचा चार्ज मि. ए. इलियट यांस गेल्या आठ तारखेस व ते आजच्या गाडीनें मुंबईस जाणार.

कर्नल बुलक हे उमरावती नेटिव्ह क्लबचे मेंबर आहेत ह्मणून त्यांस व त्यांचे पत्नीस ते स्वदेशीं जाणार या निमित्त त्या क्लबनें पानसुपारी केली.

ह्या प्रांता करितां जी जुडिशियल स्कीम मंजूर झाली ती फारच गैरसोईची व अहितावह आहे ह्मणून ती अमलांत आणूं नये अशा विषयीं वऱ्हाडांतून एक तपशिलवार अर्ज सरकारकडे जात आहे.

नागपूर प्रांतावर थोडे दिवस असलेले दयाळू चीफ कमिशनर मे. फिट्स प्याट्रिक साहेब जे हल्लीं आसामास चीफ कमिशनर आहेत, त्यांस हैद्राबादचे रेसिडेंट नेमिलें व त्यांच्या जागीं मि. वार्ड सी. एस्. यांस नेमिलें असें कळतें.

वऱ्हाडांतील अकोला जिल्ह्यांतील म्यु. क. सरकार तर्फे खालील लोकांची नेमणूक झाली असें समजतें.

मि. शेख इस्मायल.
मि. आर एटकिन.
" शेख कादर.
" महंमद हुसेन.
" तहशिलदार.
" गोपाळ गणेश ढेरे.

खामगांव

| | |
|---|---|
| | मे. क्रॅकनेट |
| | भालेखान. |
| | असिस्टंट कमिशनर |
| शिगांव | लच्छु खेट्री |
| | मारुती कडताजी |
| अकोट | गनुशींग |
| | कृष्णाजी सदाशिव तांबे |
| | मुबारकअली |

गेल्या ता० ३, ५ व ६ रोजीं उमरावती मुनसिपालिटीची जनरल कमेटी भरून नव्या मेंबराच्या निवडणुकीचा निकाल करण्यांत आला. निकाल खालीं लिहिल्या प्रमाणें झाला जे गृहस्थ निवडले गेले त्यांच्या नांवापुढें फुल्या दिल्या आहेतः—

दक्षिणभाग

सुमारें १००० मत देणाऱ्यांपैकीं २९६ लोक मत देण्यास आले होते.

| नांव. | मतें. |
|---|---|
| मि० विष्णु हरी जोशी सेक्रेटरी + | २१७ |
| " एकनाथ लक्ष्मण × | १९३ |
| " कोंडो बाळाजी + | २४२ |
| " बाळकृष्ण जैराम पेंडके + | १९७ |
| " रंगनाथ नरसिंव्ह मुधोळकर + | १९४ |
| " प्रल्हाद नारायण जोग + | १८५ |
| " विठ्ठल नारायण काळीकर | १०२ |
| " सिद्धेश्वर कृष्ण | ९८ |
| " सदाशिव नारायण | ८४ |
| " विष्णु नारायण डांगे | ६२ |
| " माधवराव साठे | ६० |
| " जनार्दन सावळाराम | ३० |
| " गणेश राजाराम | २९ |
| " लक्ष्मण कृष्ण चिपळोनकर | २४ |
| " गोपाळ गोविंद | १८ |

या भागांत वरील अनुक्रमें सहा गृहस्थ मेंबर निवडले गेले.

उत्तरभाग.

सुमारें ५०० मत देणाऱ्यांपैकीं १३० लोक मत देण्यास आले होते.

| नांव | मतें |
|---|---|
| मि० बाळकृष्ण बळवंत सुळे. + | ९६ |
| " विष्णु हरि जोशी | ८९ |
| " मोरो विश्वनाथ जोशी − | ८८ |
| " केवलचंद − | ७२ |
| " एकनाथ लक्ष्मण | ५० |
| " अंताजी गोविंद केसकर + | १४ |
| " रघुनाथ बाळकृष्ण तळवळकर + | १५ |
| " श्री किसनदास + | ४१ |
| " कोंडो बाळाजी | ३५ |
| " बाळकृष्ण हरि करंदीकर | ३२ |
| " रामभाऊ पऱ्हाळकर | १२ |
| " बहिरवदान जेठमल | ११ |
| " सदाशिव नारायण | १६ |
| " बाळकृष्ण जयराम पेंडके | १५ |
| " फत्तेअली बोहरी | १४ |
| रा० सा० वामनराव भोळे | ७ |
| मि० लालमन | ६ |
| " सिद्धेश्वर कृष्ण | ४ |
| " उदेमल | [illegible] |
| " वासुदेव विठ्ठल चांदेकर | [illegible] |
| " हरिरामजी किसनरामजी | [illegible] |

या भागांत रा० रा० विष्णू हरि व रा० रा० एकनाथ लक्ष्मण यांनी राजिनामे दि[ले] त्यामुळें त्यांची नावें सोडून अनुक्रमें सहा गृहस्थ निवडले गेले.

पुर्व भाग.

५०० मत देणाऱ्यांपैकी १८७ लो[क] मत देण्यास आले होते.

| नांव | म[तें] |
|---|---|
| मि० बळवंतराव खोत × | १५ |
| " यशवंत गोविंद प्र. सि. कर्ते + | १४ |
| " रामचंद्र नरसिंह मुधोळकर + | १३ |
| " विष्णु हरि जोशी | १३ |
| " जनार्दन शास्त्री वकील − | १ |
| " नारायणराव केतकर − | [illegible] |
| मि० एफ. एक्स. डिसा − | [illegible] |
| " एकनाथ लक्ष्मण | [illegible] |
| " वासुदेवराव जोग | [illegible] |
| " कोंडो बाळाजी | [illegible] |
| रा० सा० वामनराव भोळे | [illegible] |
| मि० गोविंदराव काणे | [illegible] |
| मि० कृष्णा स्वामी | [illegible] |

वर्तमानसार.

.... मद.... कानें हाजन

वर्षाचा अगाऊ ...
सहामाही " ३ " ०८
...कभरेर " ० " ०८
किरकोळ अंकास....................

नोटिशीबद्दल.
१० ओळींचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस........०१

Rs.
annum in advance 8 Postage 13 as.
Per annum in arrears 7 "1Rs. 8 as.
Six monthly..............3 " 9 as.
Single copy.............................4 as.

Advertisements
Below 10 lines...2Rs.
per line over10... 4as.
Repetition derline3as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR.

VOL XXIII | AKOLA MONDAY 22 APRIL 1889 | NO. 15

वर्ष २३ | अकोला सोमवार तारीख २२ माहे एप्रील सन १८८९ इ० | अंक १५

## पत्रव्यवहार.

या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मनास मिळूनच असतील असें समजूं नये.

मु० आकोला वऱ्हाड ता० २०।४।८९
रा० रा० वऱ्हाडसमाचार कर्ते यांस.

क० सा० न० वि० वि० किल्येकांचा असा समज आहे कीं, हल्लींचे डायरेक्टर साहेब एक वर्षाच्या रजेवर गेल्यावर त्यांच्या जागीं मि० एट्किन् साहेब आकोला हायस्कूलचे हेडमास्तर यांची नेमणूक होईल. कदाचित साहेब बहादूर गोरकाय असल्यामुळें हा लोकांचा समज खरा होण्याचा बहुधा फार संभव आहे. परंतु साहेब बहादुरांचा त्या जागेवर हक्क पोहोंचतो किंवा कसें याचा विचार करूं जातां असें दिसतें कीं शाळाखातें स्थापन झाल्या दिवसा पासून शाळाखात्याचें स्वामित्व Directorship युरोपियन लोकांचे हातांत होतें. तें सन १८७५ सालचे नवंबर महिन्यांत नेटिवांचे हातांत आलें. तेव्हां पासून आज पंधरावर्षें नेटिवांच्या अधिकाराखालीं खात्याची अतिशय भरभराट झाली. सर्व गोष्टींची व्यवस्था नीट लागून कमी खर्चांत अधीक फळ दिसूं लागलें. प्रथमतः राव बहादुर नारायण भाई दांडेकर यांच्याकडे या खात्याचे अधिपत्य आलें. त्यांनीं आपल्या मुदतींत नेटिव मोठी मोठी जबाबदारीचीं कामें करण्यास लायक आहेत असे अनेक गोष्टी करून दाखविलें. त्यांनीं पेनशन घेतल्यावर ही मोठी जागा आमचे वऱ्हाड शाळाखात्याचे अनुभविक ... याळू, विद्वान् न्यायी व निःपक्षपाती श्रीं... भिकाजी जठार बि. ए. यांना देऊन ...रानें आपला गुणग्राहीपणा दाखविला. हे जठार साहेब प्रथमतः कैलासवासीं डाक्टर सिक्लैर साहेब शाळाखात्याचे जनक (पहिले डायरेक्टर) यांचे आमदानींत वऱ्हाडांत आले. हे डाक्टर सिक्लैर यांचे पूर्ण विश्वासातले व मेहेरबानींतले होते. यांचे सल्या शिवाय वऱ्हाड शाळाखात्यात त्यांचे अंमलांचे वेळीं एक ही गोष्ट होत नसे. वऱ्हाडांतील सर्व मास्तर पहिल्यानें बाहेरचे प्रांतातून आणावे लागले. पहिल्यानें इकडील कोणाला माहिती नव्हती तेव्हां लोक इकडे लोकांच्या पदयावर येण्यास भीत असत. परंतु डाक्टर सिक्लैर चे मंत्री मंडळींचे सल्यानें कांहीं अडचण पडली नाहीं. व चांगल्या शिक्षक मंडळींची निवड होऊन पंचवीस वर्षांचे काळांत वऱ्हाडांत इतर नांवाजलेल्या प्रांतां सारखे विद्वान लोक उत्पन्न होऊं लागले. व हल्लीं वऱ्हाड शाळाखात्याचे पाऊल फार पुढें आहे. राव बहादूर जठार साहेब हे प्रथमतः आकोल्या जिल्ह्याचे डे. ए. इन्स्पेक्टर होते. तें काम त्यांनीं चांगलें केलें. पुढें उमरावती हायस्कूल मिस्तर मॅकेन्ब्यास साहेब यांचे अंमला खालीं हेडमास्तर असतां गडबड्या खाऊन मोडण्याच्या पंथास आले तेव्हां मॅक्याक साहेबांनीं रजा घेऊन पलायन केलें तेव्हां अशा मोडल्या स्थितींतल्या हायस्कुलावर मि० जठार यांची हेडमास्तरचे जागीं नेमणूक झाली. तेव्हां त्यांनीं अतिशय मेहनत घेऊन तें हायस्कूल उत्तम स्थितींत आणून सोडून दिलें. पुढें त्यांस मि० इलियट साहेबांनीं एजुकेशनल इन्स्पेक्टरांचें काम सोडून बडोद्यास गेल्यावर त्यांचे जागीं ए० इन्स्पेक्टर नेमिलें. तें काम त्यांनीं आठ वर्षें केलें. सर्व खात्याची व लहान मोठ्या लोकांची त्यांस माहिती झाली. पुढें भाई साहेब पेनशन घेऊन गेल्यावर सन १८८४ इसवी साकांत त्यांना डायरेक्टर नेमिलें. अगोदर काम करण्याची हौस मोठी, विद्वत्ता गाढी, अनुभव व दया ही अतिशय तेव्हां या कारकीर्दींत काम उत्तम चाललें. कोणाचें बिलकूल तिळप्राय ही नुकसान झालें नाहीं. आपमतलबी लोकांच्या लबाड्या कोणत्याही प्रकारच्या चालल्या नाहींत. सर्व मास्तर लोकांना आपल्या स्वतःच्या मुलांप्रमाणें वागविलें. सर्व लोक मोठ्या आनंदानें आपापलीं कामें करीत आहेत. इतक्यांत रावबहादुरांनीं एक वर्षाची रजा घेतल्याची वर्तमान पत्रावरून बाहेर आला व रावबहादुरांची प्रकृती नीट नाहीं असें लोकांनीं वर्तमानपत्रद्वारें वाचल्यावरून सर्वांना मोठें दुःख वाटत आहे. ईश्वर करो व रावबहादुरांची प्रकृति लवकर चांगली होऊन ते लवकर आपल्या कामीं रुजूं होवोत अशी अनन्य भावानें सर्वांची परमेश्वरापाशीं प्रार्थना आहे. ते रजेवर गेल्यावर मि० एट्किन् डायरेक्टर होणार हे घेऊन चाललें तर मि० एट्किन यांना डायरेक्टरच्या कामाचा अनुभव मुळींच नाहीं. खात्यांतील लोकांची त्यांना माहिती नाहीं. तेव्हां अशा अनभ्यस्त मनुष्याच्या हातीं काम गेल्यानें अनेक प्रकारच्या अडचणी येतील. त्यांना दुसऱ्याच्या तोंडानें पाणी प्यावें लागेल. त्यांचे हाताखालील कामगार कोण कसे किती शेतीवान किती पापभीरू किती सात्विक आहेत याची त्यांना मुळींच माहिती नाहीं असें म्हटलें तरी चालेल. आजपर्यंत त्यांनीं दोनतीन वेळां बदली डायरेक्टरचें काम केलें. परंतु ते थोडक्या मुदतीचे असल्यामुळें कागदांवर सह्या करण्या शिवाय फारसे अधिक कांहीं त्यांना करावें लागलें असेल असें म्हणवत नाहीं. आतां वर्षभर त्यांना निरुपाय मग सर्वच त्यांच्या हातून किती व्हावयाचा. शिवाय युरोपियन लोकांचे वारें वऱ्हाडशाळाखात्यास फार दिवसांपासून नसल्यामुळें आतां त्यांतील कामगारांना हा एक प्रकारें कसेंसें वाटण्याचा संभव आहे. शिवाय इतके दिवस नेटिवांच्या हातांत तें खातें असून आतां युरोपियनाचे हातांत देणें बरोबर नाहीं. हल्लीं जी सुव्यवस्था चालली आहे त्यांत घोटाळा आणणें आहे. घोटाळा होईल असें जरी म्हणता येत नाहीं तरी अशा प्रकारची हल्लीं सुदैवानें मे० कमिशनर साहेब बहादुर व आलिशान रेसिडेंट साहेब बहादुर हे अधिकारी योग्य व नेटिवांची योग्यता जाणणारे आहेत. तरी आमचें राणी सरकारचे हल्लींचे प्रतिनिधी ( Lord Laudsdown ) ज्यांच्या हातांत ही जागा भरावयाचा अधिकार ते ही माझ्या मताचे आहेत तेव्हां इतक्या वर्षें नेटिवांना ही जागा देऊन आतां ती युरोपियनाला देतील असें सहसा होईल असें म्हणवत नाहीं. हल्लीं वऱ्हाड शाळाखात्याचे इन्स्पेक्टर मि० महाजनी हे सर्व प्रकारें ही जागा करण्यास लायक आहेत. ते विद्वान असून काम करण्यांत पहिल्या प्रतीचे हुषार आहेत. ते लेखणीचे पुरे असून अनुभव आज दोन आडीच वर्षांत फार संपादन केला आहे. तेव्हा त्यांना ही जागा हक्काच्या पायरीनें पाहतां मिळणें अगदीं वाजवी आहे. मुंबई इलाख्यांत हायस्कुलच्या हेडमास्तरांना एजुकेशन इन्स्पेक्टरची जागा देतात परंतु डायरेक्टरची देतांना पाहण्यांत आलें नाहीं. तेव्हां एजुकेशनल इन्स्पेक्टरमध्यें सोडून देऊन हेडमास्तर हायस्कुल युरोपियन म्हणून त्याना देणें बरोबर होणार नाहीं. याचा विचार योग्य अधिकारी व वऱ्हाडांतील वर्तमानपत्रवाले करतील कळावें हे विनंती.

आपला
"क्ष"

मु० कुरुम तारीख १८-४-८९
रा० रा० वऱ्हाडसमाचार कर्ते यांस.

वि० वि० नवाब बुलक साहेब बहादुर डे० के० उमरावती हे गेले सोमवारीं रजेवर गेले. त्या संबंधानें हिंमतराव यांनीं त्यांस स्टेशनवर पानसुपारीचा बेत केला त्या कामीं हिंमतराव तुकाराम देशमुख यशवंत नारायण मुनसरीम व बातखा डेविडाक्टर यांनीं फार मेहनत घेतली. साहेब बहादुरांचे संबंधानें येथील रयतेनें दुःख प्रदर्शित केलें व त्या प्रमाणें साहेब बहादुरास ही गहिंवर आला. कळावें.

आपला एक
"क्ष"

## वऱ्हाडसमाचार.

मिती चैत्र वद्य ७ शके १८११

हिंदुस्थान सरकारांनीं नुकतांच मंजूर केलेला वऱ्हाडाकरितां दिवाणी कोर्टाचा कायदा जो ता० १ जुलैपासून अंमलांत येणार आहे त्यांत पांचशे रुपयाचे दाव्यावर एकच अपील आहे. त्यामुळें लोकांस फार गैरसोय होणार आहे म्हणून त्या कायद्यांतील गैर सोईचा तो अमलांत येण्यापूर्वीं पुन्हा विचार होण्याकरितां अर्ज पाठविण्याचा विचार करण्याकरितां ता० १६ एप्रिल १८८९ रोजीं नवी जवळील धर्म शाळेंत सभा भरली होती.

त्या सभेंत बहुतेक सर्व व्यापारी व गांवांतील सर्व जातीची प्रमुख मंडळी जमली होती.

मि० कादरभाई शेठ यांची सभेच्या अध्यक्षाचे ठिकाणी योजना झाल्यावर मि० गोपाळखुशालराव वकील व गोविंद विश्वनाथ बर्वे यांनीं सभेचा उद्देश व कायद्यापासून होणारी गैरसोय थोडक्यांत कळविली. त्यावरून सर्वानुमतें अर्ज करावेसे ठरलें. अर्ज तयार करण्याकरितां खालील गृहस्थांची सब कमेटी नेमिली.

मि. दत्तात्रय विष्णु भागवत
मि० शंकर गोविंद.
रा० साहेब देवराव विनायक.
मि० गोविंद विश्वनाथ.
मि० गोपाळ खुशाल.
मि० मौलवी हकिमुद्दीन.

सदरहू मंडळीनें अर्ज तयार करून पुनः ता० ५ मे १८८९ इसवी रोजीं सर्व लोकांची जाहीर सभा भरवून तींत तो अर्ज वाचावा. अर्जांत मजकूर लिहावयाचा तो.

पांचशे रुपयांचे दाव्यांस दोन अपीलें असावीं.

सेशन जज्जास हजार रुपयांवरील दाव्यांतील पहिले अपीलाचा अधिकार असावा.

स्पेशल अ. कमिशनरास हजार रुपये पर्यंतच्या दाव्यांतील पहिलें अपिल घेण्याचा अधिकार असावा.

व अकोलें, वाशीम, बुलढाणें येथील स्पे. अ. क. यांस पांच हजारापेक्षां अधीक रकमेचे असल घावे व हजार रुपया पर्यंतच्या दाव्यावर पहिलें अपील घेण्याचा अधिकार असावा.

सबॉर्डिनेट कोर्टांचे फक्त दोनच वर्ग असावेत.

नायब तहशिलदार व तहशिलदार यांस दिवाणी अधिकार नसावेत.

हीं व या शिवाय ज्या कांहीं दुसऱ्या गैरसोयी असतील त्या दूर करण्या विषयींचा अर्ज वरील मंडळीनें इंग्रजींत तयार करावा असें सर्वानुमतें ठरलें. वरील अर्ज तयार होऊन जाण्यास वेळ लागेल सबब सदरहू अर्ज दरम्यान जाऊन त्याचा विचार होईपर्यंत सदरहू कायदा अंमलांत येऊं नये अशा हिंदुस्थान सरकारास तार करावी असें ही सर्वानुमतें ठरलें. येणें प्रमाणें कार्य होऊन सभा विसर्जन झाली.

येथील मोर्ना नदीच्या संबंधानें बारा माहीची व्यवस्था म्युनसिपालिटीनें उत्तम ठेविल्यामुळें भर उन्हाळ्यांत ही लोकांस पाणी वापरण्यास विपूल मिळूं लागलें आहे तरी वेळोवेळ लहानमोठ्या कारणामुळें म्युनसिपालिटीस निरनिराळ्या सूचना कराणें भाग पडतें. हल्लीं नदीच्या पाण्यास वास मारूं लागला आहे शिवाय नदीवर पाहारा करण्याचें काम सध्यांच्या थोड्या शिपायांच्या आटोक्या बाहेरचें आहे तर पाणी स्वच्छ व निर्मळ ठेवण्यास म्युनसिपालिटीनें विशेष कसोशी करून लवकर तजवीज केली पाहिजे.

अकोल्या सारख्या शहरच्या आणि व्यापारी वस्तीच्या मानानें आगीच्या संबंधानें म्युनसिपालिटीकडून म्हणण्यासारखी कांहींच व्यवस्था नाहीं असल्यास पाहिजे. सुरतेस मोठा अग्निप्रलय उठला त्यावेळीं लार्ड रे साहेब खुद्द सुरतेस स्पेशल गाडीनें गेले होते तेव्हां सुरत शहरच्या म्युनसिपालिटीची आग विझविण्याच्या संबंधानें पुर्वव्यवस्थेंत पराकाष्ठेची मांदानी पाहून त्यांस मोठा अचंबा वाटला. त्याच मासल्यांतली अकोला म्युनसिपालिटी आहे कारण आग विझविण्याची साधनसामुग्री आमच्या येथें फार थोडी आहे. सुरतेस-बारा तेरा तासांत राखेचे रंक झाले आणि घरनादार असे हवालदिल लोक अन्नान्न करीत गयावाया फिरूं लागले. असा भयंकर प्रसंग दुसऱ्यावर गुदरलेला पाहून यथाशक्ती पीडित जनांस साह्य करणें आणि आपण स्वतः शहाणे होणें हें प्रत्येकाचें कर्तव्य होय. म्युनसिपालिटीकडून एवढ्या मोठ्या खर्चाचें काम होत नसल्यास त्यांनीं घरोघर प्रत्येक बिऱ्हाडामागें पांचपांच घागरी, मोठें घर असल्यास दहादहा घागरी, आणि पेठेंतर प्रत्येक व्यापाऱ्यास पंचवीस पंचवीस घागरी पाणी अनेक त्याक्षणीं उपयोगास मिळण्यासाठीं नवीन नियम केला पाहिजे. आणि आमच्या मतें असले अत्यंत महत्वाचे सार्वजनिक संरक्षणाचे नियम रेसिडेन्ट साहेबांस तार करून त्यांच्या मंजुरातीनें लष्करी सरक्युलराप्रमाणें कडक रितीनें अमलांत आणले पाहिजेत. हें आमचें म्हणणें विशेष जबरदस्तीचें आणि अन्यायाचें दिसेल तरी प्रसंग येऊन ठेपणार (ईश्वर करो आणि तशी पाळी न येवो) आमच्या म्हणण्याची सत्यता तत्काळ दिसून येईल.

गेल्या आठवड्यांत नागपूर येथील जी आय. पी रेल्वेची मोठी गुडशेड( माल ठेवण्याची जागा) गन पावडरनें पेट घेतल्यामुळें जळून खाक झाली. तीन लाख रुपयांचें नुकसान झालें आहे असें ऐकतों. उज्जनीस ही एक मोठी आग लागून पुष्कळ [illegible] झाली. वऱ्हाडांतील कारंजाच्या [illegible] चार दिवसा पूर्वी आग लागून एक [illegible] नुकसान झालें. आणि खुद्द [illegible] रा. रा. प्रयागजी शेट यांस [illegible] झाली. खामगांवास फटाकड्याच्या [illegible] पेट घेतल्या मुळें सहा मनुष्यें तत्काळ प्राणास मुकलीं. वाभणगांवच्याही फाक्टरीस आग लागून बरेंच नुकसान झालें. आहे. आमच्या अकोल्यासही हाजीच्या व टिकमदास ताराचंद यांच्या फाक्टरीत 'ओपनर' पायीन आग लागून सहा मनुष्यें प्राणास मुकलीं. इतके प्रचंड प्रळय आगी मुळें होत आहेत तेव्हां आम्ही वर केलेल्या सूचनेचें लोकांस विलक्षण स्वरूप वाटणार नाहीं इतकेंच नव्हे तर ते स्वतां होऊन वरील म्हणण्या प्रमाणें नियम करण्यांत उद्युक्त होतील अशी आमची खात्री आहे.

अग्निप्रळय होऊन प्राणहानि होते या ईश्वरी क्षोभा बद्दल कोणी कोणा बद्दल जबाबदार होऊं शकणार नाहीं हें खरें परंतु फाक्टरी, गिरण्या, वगैरे कारखान्यांतून यंत्रांतल्या कांहीं चुकीमुळें आगी भडकून त्यांतील कामगार आणि मजूरदार मंडळी प्राणास मुकतात त्या बद्दल ही त्या त्या कारखान्यांच्या मालकांस विशेष तऱ्हेनें जबाबदार धरितां येत नाहीं तरी गतप्राण झालेल्या नौकर मंडळीची बायका पोरें अनाथ होतात तेव्हां त्यांच्या चरितार्था पुरती तजवीज करणें कारखानदारांच्या शिरावर आहे किंवा नाहीं या प्रश्नाचा उलगडा होणें या प्रसंगीं अत्यंत महत्वाचें आहे. हा प्रश्न येथील डेपुटी कमिशनर मनावर घेऊन रेसिडेंट मार्फत त्याचा निकाल करितील तर वऱ्हाडांतील फाक्टरीतून काम करणाऱ्या मजूरांचें सर्वस्व नष्ठ झाल्यावर त्यांच्या बायका पोरास कोणीही त्राता उरला नाहीं असें न होतां त्यांचा थोडी बहुत वास पूस केल्याचें श्रेय सरकारास येणार आहे.

क्राफर्ड साहेब शेवटी निर्दोषी ठरले या पुढें ते लांचखाऊ नाहींत अशी द्वाही फिरली आहे. अर्थात् आम्हांस ही त्यांस लांचखाऊ असें लेखितां येत नाहीं. असो. कायद्याचा भाग आटपला आणि प्रकरण निकालास लागलें हें सर्वोत्कृष्ट झालें. क्राफर्ड साहेबांस " हातउसनी देवघेव केल्या बद्दल कामा वरून दूर केलें आहे आणि त्यास पेनशन ही मिळणार नाहीं. म्हातारा अपराधा बद्दल एवढ्या मोठ्या कामगारास भयंकर शिक्षा झाली हें कोणी ही सांगेल म्हणून क्राफर्ड साहेबांस या निकालांवर अपिल करण्या साठीं आमची मनापासून शिफारस आहे.

क्राफर्ड प्रकर्णाचा निकाल करतांना त्या प्रकरणाशी संबद्ध असलेल्या मामलेदारा संबंधानें लार्ड क्रासनी मुंबई सरकारास असें लिहून कळविलें आहे कीं, सर्व साधारण असा नियम असला पाहिजे कीं, ज्या माजिस्ट्रेटांनीं लांच दिला आहे त्यांचे अधिकार काढून घेतले पाहिजेत. तरी या नियमाची अंमलबजावणी करण्याचें काम तुमच्या विचारा वर सोंपवितों. तुम्ही मामलेदार लोकांस त्यांनीं साक्षी द्याव्या म्हणून जें अभय दिलें तें फार चांगलें केलें. व तुम्हाला वाटेल त्या मनुष्याला होणाऱ्या नुकसानीबद्दल बक्षीसादाखल योग्य वेतन द्यावें. परंतु त्या संबंधानें काय ती व्यवस्था करावयाची असेल ती लौकर मात्र करावी. मुंबई सरकार फार न्यायी व दूरदर्शी आहे त्यांनीं सेक्रेटरी कडून लिहून येण्यापूर्वींच मामलेदार लोकांचे फौजदारी अधिकार काढून घेतले होते. व त्यांनीं फक्त मुलकी काम करावें असें ठरविलें होतें. ह्या मामलेदार लोकांच्या नेमणूका कायम राहणें आतां केवळ लार्ड री साहेबाच्या विचारावर अवलंबून आहे व अपराधाचें महत्व ज्या मानानें असेल त्या मानानें त्याला शिक्षा होणार आहे. यावरून सर्वच मामलेदार काढले जातील असें वाटत नाहीं. कदाचित कित्येक काढले जातील, कित्येक बहाल राहतील व कित्येकांना कम्पेनसेशन मिळेल.

न्याय देवतेची निर्भत्सना करून पाहणारे गणेश नारायण साठे यांनीं कोर्टांत हजर राहण्या बदल माफी देण्याचा अर्ज केला होता परंतु अर्जा प्रमाणें त्याना माफी न मिळतां त्याना माजिस्ट्रेट साहेबांपुढें हजर रहावें लागलें. व रीति प्रमाणें हा अर्ज तुम्हीच लिहीला काय व तुम्ही लिहिलेला अर्ज हाच काय म्हणून त्यांस वाचण्यास दिला. परंतु या आमच्या न्यायमूर्तींस तो अर्ज चांगला वाचतां येईना व त्यांतील कांहीं शब्दांचा अर्थ ही सांगतां येईना. त्यावरून माजिस्ट्रेट साहेबास संशय उत्पन्न होऊन त्याला विचारलें कीं या अर्जाचे लेखक आपणच काय? सदहू प्रश्नाचें उत्तर देण्या करितां एक दिवसाची मुदत पाहिजे म्हणून म्हटलें. त्यावरून माजिस्ट्रेट साहेबांनीं एक दिवसाची मुदत दिली पुढें दुसरे दिवशीं सदहू न्यायमूर्तींनें येऊन कळविलें कीं, श्रीधर विठ्ठल दातें यांनीं हा अर्ज लिहिण्याचें कामांत मला मदत केली होती. परंतु माजिस्ट्रेट साहेबांची त्याच्या बोलण्यावरून खात्री न होऊन असें वाटलें कीं हा मनुष्य केवळ तोतया असून याच्या पाठीमागें बरीच मंडळी असावी. त्यावरून या कामांत कोणकोणांचे अंग आहे त्यांची नांवें सांगण्यास त्याला सांगितलें असतां तो कळविना म्हणून माजिस्ट्रेट साहेबांनीं साठ्यांना सात दिवस पर्यंत कारागृहांत ठेवावें असा हुकूम दिला. साठे यांची स्वारी जेव्हां जेल मंदिरांत जाऊन बसली तेव्हां न्यायदेवतेचें खरें स्वरूप त्यांच्या दृष्टीस पडूं लागलें व त्यावरून या कामांत सामील असलेल्या मनुष्यांची नांवें निवेदन करावीं असें त्यांना वाटून त्यानें दुसरे दिवशीं सर्व मनुष्यांच्या नांवाचा पाढा वाचला. त्यावरून त्यांना, त्यांचा अर्ज काढून घेण्यास परवानगी दिली आतां या वडलेल्या सर्व हकीकतीवरून मि. डिहडाल डि० मा० यांनीं साठ्यांच्या अर्जाचा प्रथम जो निकाल केला तो किती यथार्थ होता हें कळून सहजी येईल

The Berar Samachar

MONDAY APRIL 22 1889

## THE LAST OF THE CRAWFORD CASE.

The Crawford case has at last come to an end. Lord Cross has acquitted Mr. Crawford of the more serious charges of corruption and bribery and convicted him of borrowing money from people within his jurisdiction as Commissioner. This result was almost anticipated since the Commissioners during the course of the trial at Poona, seemed favorably disposed to the accused. But as sure as this result was supposed to be in store, so surely has the result tarnished British Justice. The people will remember at least for three generations more that in the Crawford case it was distinctly proved so far, at any rate, as native public opinion went, that there was one law for the *white* and another for the *black*. That a man who was so notoriously in debt and who spent always beyond his means must necessarily have inducements to become corrupt. But as in this case when there is positive evidence of persons saying that they gave moneys to Mr. Crawford's agent Hanmantrao and further the objects for which they gave money *were* accomplished what better evidence is required to convict an accused. But in judging Mr. Crawford, we believe the ordinary tests of weighing evidence were forgotten; and that considerations which ought not to have weighed with the Commissioners did influence their judgment.

Though the report of the Commissioners is not before the public we know it definitely now that they have acquitted Mr. Crawford of the charges of bribery and corruption. The Bombay Government, on the contrary, has found him guilty; and the Secretary of State agrees with the Commissioners and finding Crawford guilty of the minor charges, orders his name to be struck off the civil list thus practically depriving him of his pension. The reasons that the Commissioners might have given for acquitting Mr. Crawford are not before the public but it is very probable that they disbelieved the evidence on record. Now those who have been following the evidence, as it was reported in the papers, must have from the very beginning seen the conclusive nature of the evidence given against Mr. Crawford. The witnesses that deposed to the facts of bribery were not the ordinary professional witnesses or mere loafers, but were men, after all, of respectable positions. It would indeed be very curious to note the reasons why the Commissioners thought such evidence to prove nothing against Crawford. The fact of Mr. Crawford's taking bribes for years past was so notorious in native society and, we believe that some of the Collectors also knew or had heard of it, that when Mr. Crawford was first apprehended, it was thought that the charges could easily be proved against him. If then bribery could not be proved even when it was so rampant and bare-faced, surely there must be radical defect in the ideas of the Commissioners about evidence and its due weight.

But on the other hand, the Bombay Government comes to a conclusion exactly the reverse of that arrived at by the Commissioners and that too on the self-same evidence. Had the Bombay Government any motive to be prejudiced against Mr. Crawford? We should think, if any thing, they were bound in a way to vindicate the name of the most important branch of the British administrative service; but they have, after giving their best consideration to the matter, declared him guilty. Now does the Bombay Council lack in any legal ability? Mr. Justice West who was on the High Court Bench for years and whose judgments are so highly respected was in Lord Reay's Council; and such a Council declare that Mr. Crawford is guilty. To the unbiassed public this is quite enough. We believe and will continue to believe that the Bombay Government was right and that the Commissioners were wrong.

Lord Cross in his despatch allows weight to the Commissioner's decision in this case on the ground that the

had opportunities of hearing evidence themselves which Lord Cross himself and the Bombay Government never had. Now it would be perfectly pertinent to remark, if the Commissioners made a note with regard to each and all the witnesses that their demeanours were bad and impressed them badly the witnesses were all, at that rate, the most cold-blooded rascals that had in the perversion of their consciences come to swear falsely before the Commissioners and who were detected notwithstanding, by the all-knowing commissioners. This is one of the shabbiest reasons given by the Secretary of State for upholding the judgment of the Commission. Do not Courts of appeal in this country and in England reverse findings of *fact* come to in the Lower Courts. Compare with this the decision of this same Lord Cross in the notorious Wilson's case. There the Commissioners and the Government were *unanimous* in their opinion of Wilson's guilt and yet Lord Cross found it convenient to upset that concurrent finding. Where was this reason then? Did not the Commissioners also examine witnesses then and why was not weight given to their finding on this same ground then? The long and short of it all is, that any reason that is convenient to be given might be given at any time. If one is determined to come to a conclusion, he must find reasons to support it.

Says the Secretary of State— 'With regard to the charges of corruption, whatever might have been my opinion if I had been called upon to decide this matter upon the printed matters alone, I feel bound to attach weight' &c. to the opinion of the Commissioners. This is a way of expressing oneself in what they call a 'political' way. Why did not Lord Cross give his personal opinion on the evidence? If the Lower Courts were once admitted to have finality of finding on matters of fact, then appeal-Courts would have to be abolished altogether. Did not the importance of the case require in fact that Lord Cross should give his personal opinion in the matter?

We do not care at all if Crawford is or is not deprived of his pension. We do not grudge him anything of the kind. We only lament to see an utter miscarriage of justice— a miscarriage which will continue long to impress the native public and have a very bad moral influence indeed on the public mind. Justice is after all not vindicated. The Civil service has gained the day no doubt but let them remember that the retribution of all sins done by England's sons in India must follow in time to come as sure as the day follows the night.

Mr. Govindrao Yeshwant, Tahsildar of Darwha in the Wun District, is granted privilege leave for two months with effect from the 15th April 1889, or from such subsequent date as he may avail himself of it.

Mr. Gopal Balwant, Naib Tahsildar of Kelapur, is appointed to officiate as tahsildar of Darwha during the absence of Mr. Govindrao Yeshwant on privilege leave, or until further orders.

## वऱ्हाड.

हवामानः—यंदा उन्हाळ्याचें मान सर्व हिंदुस्थानभर वाढलें आहे तेव्हां ठिकठिकाणीं सामान्याहून पेक्षां उष्ण विशेष होऊं लागला आहे. पाण्या बद्दल ओरड गांवोगांव ऐकूं येते आणि उष्णते मुळें नरापरांना उपद्रवही थोडा नव्हत सर्वत्र आहे. हाच प्रकार वऱ्हाड प्रांतांत कमजास्त प्रमाणानें आढळून येईल. गेल्या दोन चार दिवसा पासून दिवसा उन्हाच्या तिरपा आणि रात्रीं उन्हाळ्या झळा या मुळें लोक अगदीं बेहोष होऊन गेले आहेत. तशांत मधून मधून अग्नी येतात ह्मणून मनस्वी उकडूं लागलें आहे. गोरगरिबांचे अतोनात हाल होतात व त्यांची दैना अनावर होत चालली आहे. उन्हातापांत काबाडकष्ट करून भीटभाकर मिळवावी ती सुद्धां सुखानें खाण्यास मिळत नाहीं. ह्याबद्दल स्थानिक सरकारांतून कांहीं विचारपूस होऊन लोकांची आपद् थोडी नव्हत तरी दूर होईल काय!

रा. रा. चिंतामण मोरेश्वर आपटे इनस्पेक्टर आफ रजिस्ट्रेशन यांनीं पूर्वीं चार महिन्यांची रजा घेतली होती ती आणखी डाक्टरच्या सर्टिफिकिटावरून तीन महिने वाढविण्याचें गेल्या रेसिडेन्सी आरडर वरून समजतें.

वऱ्हाडांतील कोर्टांचा कायदा अखेर पंधराखीच्या रेसिडेन्सी आर्डरमधून अमलवारी साठीं जाहीर झाला आहे. वऱ्हाडांत नवीन पद्धतीची न्याय मनुसधी सुरु होणार ह्मणून पुष्कळ दिवसांपासून गाजत होतें वऱ्हाडांपासून तों हा काळ पावेतों वऱ्हाडांतील वर्तमानपत्रांतून एक सारखी भवती न भवती चालली आहे. गेल्या दोन तीन अंकांत नवीन कायदा कसकसा अनर्थकारक होत जाईल हें आह्मी इंग्रजींतून आणि मराठींतून सरकारास विदित केलें आहे. कोर्टें नवीन पद्धतीवर चालविण्यापूर्वीं सरकारचें मुख्य कर्तव्य हें होय कीं, नव्या कायद्याचा खर्डा सर्व लोकांच्या पुढें मांडिला पाहिजे.तशी व्यवस्था होण्याचा रंग दिसेना. जिल्ह्याजिल्ह्याच्या अधिकाऱ्यांचीं मतें लिहून जाऊं लागलीं आणि अर्धी अर्धी माहिती मिळेल तशी तशी कांहीं वर्तमान पत्रांतून येऊं लागली तेव्हां आह्मी शिळोप्याच्या चार गप्पा प्रमाणें नवीन कायद्याची थट्टा होऊन आपणावर अरिष्ट ओढवूं नये ह्मणून अलिशान रेसिडेंट साहेबांस हात जोडून विनंती केली कीं नवीन कायद्याचा खर्डा लोकांच्या नजरे पुढें वर्तमान पत्रद्वारा यावा आणि लोकांचें अभिप्राय घेऊन त्यावर सरकारनें विचार करावा. परंतु आमचे लिहिणें सर्वैव 'अरण्यरुदितोपम' ठरलें आणि लोकांच्या नव्या कायद्या संबंधानें आशेचा अगदीं बीमोड झाला हें पाहून आम्ही फार दिलगीर आहों. आमची पुन्हा कमिशनर, व रेसिडेंट साहेबांस विनंति आहे कीं, त्यांनीं दोन महिन्यांनीं हा कायदा अमलांत येण्या पूर्वीं हल्लीं वर्तमानपत्रांतून येणाऱ्या लेखांचें आणि थोडक्या दिवसांनीं होणाऱ्या अर्जांचें चांगलें मनन करावें आणि आवश्यक लागणारे सरी फेरबदल करावे. ह्या आणीबाणीच्या प्रसंगीं हो जर ' पिच्छेसे आई सो आगे चली ' पातळ प्रकार घडून आला आणि लोकांच्या ह्मणण्याकडे दुर्लक्ष झालें तर रयतेचें अहित होईल आणि सरकार आपलें कर्तव्य बजावीत नाहीं. असें आम्हांस ह्मणावें लागेल.

रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी एजुकेशनल इन्स्पेक्टर यांस ते घेतील त्या तारखे पासून दोन महिन्यांची हक्काची रजा मिळाल्याचें गेल्या रेसिडेन्सी आरडरवरून प्रथम कळलें. मोठमोठे हुद्देवाले अधिकारी रजा घेतात त्या पूर्वीं त्या रजेची बातमी लोकांत अगोदर पसरली असते तसल्या प्रकारची गुणगुण हो या वेळीं लोकांच्या कानीं पडली नव्हती. अशा काहीं कारणामुळें लोकांचे उद्गार निरनिराळे बाहेर पडूं लागले आहेत ते खरे किंवा खोटे हें खात्रीनें अन्य मनुष्यास सांगतां येणार नाहीं. परंतु अण्णासाहेब धोरणी आणि दूरदर्शी गृहस्थ आहेत तेव्हां डायरेक्टरच्या जागेवर स्वतांचे हक्क सरकार मार्फत पोंचतील किंवा नाहीं याची परीक्षा तूर्त एक वर्षभर कोंकणीवर त्यांनीं पाहिली असावी आणि कदाचित् राव साहेब जटार यांच्या रजेंत निराशा होण्याचा संभव आहे तो टाळून मनाचें शांतवन केलें असावें असा कांहीं गृहस्थ तर्क बांधतात.

रा० रा० गोविंद यशवंत दारव्ह्याचे तहशीलदार यांस गेल्या पंधराचे तारखेपासून किंवा ते रजेवर जातील त्या दिवसांपासून दोन महिन्याची हक्काची रजा मिळाली आहे. राजश्री गोविंदराव रजेवर आहेत तोपर्यंत त्यांचे जागीं गोपाळ बळवंत केळापूरचे नायब तहशिलदार यांस आक्टिंग नेमिलें आहे.

सन १८८२ च्या दहाव्या अक्टाच्या बाराव्या नियमा अन्वयें मि० इ० मार्शल एक्स्ट्रा असि० कमिशनर बुलढाणा यांस तिसरे वर्ग माजिस्ट्रेट केलें आहे आणि त्यांच्या कोर्टांत पांचशे रुपयापर्यंत दावे चालतील.

सन १८८५ सालचा वऱ्हाड फारेस्ट लॉ वणी जिल्ह्यास लागू करूं नये ह्मणून अलिशान रेसिडेंट साहेबांनीं हुकूम फर्माविला आहे.

रा. रा. गोविंदराव देशमुख उमरेकर हे एका खेड्याहून पटकीच्या आजारानें बेजार झाल्या मुळें अकोल्यास परत आले हें कळताच त्यांचे वडील बंधु रा. रा. अमृतराव ला लीज शोध समाचार घेण्या साठीं अकोल्यास आले तोंच दुसरे दिवशीं त्यास हागवणीनें देवाज्ञा झाली. धाकटे बंधु हल्लीं कुशल आहेत. मनुष्य मनांत योजतो एक आणि ईश्वरी नेम असतो दुसराच!

येथें गेल्या मार्चच्या विसावे तारखे पासून एप्रील बीस तारखे पर्यंत एकंदर ८१ असामी कालऱ्याच्या सपाट्यांत सापडले त्या पैकीं १६ मरण पावले. या महिनाभरांत सरासरीनें दहा अकरा दिवसांत हवेचा उपद्रव बिलकूल नव्हता डाम गंवक वगैरे रस्तोरस्तीं टाकणें आणि शहर सफाई होईल तितकी चांगली ठेवणें हीं कामें मुनिसिपालिटी कडून बरी बजाविलीं जातात पण कालरा झालेल्या मनुष्यास औषधोपचार पाहिजे तसा चांगल्या रीतीनें होत नाहीं ह्मणून लोकांची कुरकूर आहे.

कुरणखेड येथील जाहगीरदार असामी

जहागिरीचा पैसा घेण्यासाठीं उमरावतीस गेले असतां आठजणा पैकीं सहाजण एकाएकी मरण पावले. लोकांच्या मतें कालरा असावा असें प्रथम ठरलें पण हल्लीं विषप्रयोग झाला होता असें शोधांतीं कळतें.

(मागाहून आलेल्या नोटीसा.)

राजश्री ईश्वरदास जमनादास दुकान पाथर्डी तर्फे वहिवाटदार बिरदीचंद रामदत्त मारवाडी मुक्काम पाथर्डी यांस खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमचे दुकानची बाकी आमचेकडे रुपये १,०१४ मिती कार्तिक शुद्ध १ संवत १९४५ रोजीं हिशेब करून रुजूं करून घेतली आहे. आम्ही तुम्हास कापूस खंडी सही दर १८ प्रमाणें २२८ रुपयांचा दिला पैकी ५० रुपये आम्ही तेव्हांच घेतले बाकी राहिले आमचेकडे आज मिती पावेतों नक्की घेणें ८३६ रुपये शिवाय त्या रुपयाचे आज मिती पर्यंतचे बारा आणे शेंकड्या प्रमाणें व्याज अशी रकम शंकाराम शिवप्रताप यांचे तेल्हारे येथील दुकानांतून घेऊन जाणें आणि खात्याचा आज पावेतों चुकती देणें. रुपये घेऊन सर्व रकमेची पावती न दिल्यास नोटीस पावल्या पासून पुढें व्याज मिळणार नाहीं हें खूप समजावें कळावें तारीख २०।४।८९

( सही. )

पुर्णाजी वलद कुकाजी पाटील मौजे पायरडी

निशाणी खुद.

## नोटीस.

बापु भातार नागनकर जिल्हा सातारा तालुके तासगांव यांस नोटीस देणार सिलेमान वलद नबीभाई रहाणार तुगेजो हल्लीं वस्ती वऱ्हाड अकोलें नोटीशीनें असें कळवितों कीं, बया ही तुझी मुलगी माझी बायकी हल्लीं व तीन पासून मजला झालेले मुल या उभयतांस डिगेजीहून माहेरपणास नेलीस त्या वेळी बरोबर बायकीने रुपये रोख १०० शंभर व साडी रुपये २१ ची व हसली रुपये १० ची असें घेऊन जाऊन आज अदमासें चार वर्षें जाहालीं. मी बायकोस आणण्या करितां माझा बाप व भाऊ आ उभयतांस दोन वेळा पाठविलें परतु पाठवून दिला नाहीं. व या सर्व गोष्टी वरून तुमचें मनांत पाठविण्याचे नाहीं असें खास दिसते. तर तुम्ही ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसांत सदहू रोकड १०० रु. साडी २१ रु. व हसली १० रुपयासह बायकोस पोचती करावी. असें न केल्यास व तुम्ही पुढें मी तिच्या खावटीचे रुपये वगैरे मागाल तर त्याजबद्दल आम्ही कांहीं एक देणार नाहीं शिवाय लग्नाकरितां जो खर्च केला आहे त्यासुद्धां तुह्मावर फिर्याद करून निकाल होईपर्यंत सर्व नुकसान भरून घेऊं. व आम्ही दुसरें लग्न करूं मग कोणत्याही प्रकारचा आम्हावर हक्क नाहीं कळावें तारीख २१-४-१८८९ इ०

( सही )

शिलेमान वलद नबीभाई जमादार राहणार अकोले निशाणी खुद.

## वर्तमानसार.

लंडनची ता. १२ मिन्हूची तार इंग्लिहा-यांत लिहिल्या जोगी आहे. मि. क्राफर्डच्या विरुद्ध हिंदुस्थानचे स्टेट सक्रेटरी लार्ड क्रास यांनीं क्राफर्ड प्रकरणाचा न्याय दिला हें ऐकून बहुतेक नेटिव लोकांस आनंद होणार आहे. याच आशयाची ही वरील तार आहे. हीच तार पुढें आणखी असें ह्मणतें कीं सर जान घोस्टई यांनीं वंलून दाखविलें कीं पुढील आशयाची तार लार्ड क्रास यांनीं लार्ड रीस पाठविली आहे त्यांत लाच देणाऱ्या मामलेदारांस शिक्षा होणें रास्त आहे पण त्याचा निकाल करणें लार्ड रीयर सोंपवितों मुंबई सरकारांनें दिलेलें वचन मला अगदीं मान्य आहे व मी त्याची प्रशंसा करितों. या कामांत ज्या ज्या गोष्टी करावयाच्या त्या लवकर कराव्या' दक्षिण महाराष्ट्रांत पुंडावा करणारा मि० क्राफर्ड गुन्हेगार ठरला यामुळें इतर लाच खाऊ कामदारांस एक प्रकारचा धडा मिळाला असें होतें. स्टेट सेक्रेटरी नेहमीच्या वहिवाटी प्रमाणें मि० क्राफर्डपास सोडून देणारच हें जें प्रत्येक नेटिवाच्या तोंडून ऐकूं येत होतें तें खोटें ठरलें इतकेंच नाहीं तर बिचाऱ्या लाच देऊं मामलेदारांचेंही कांहीं विशेष प्रकारचें नुकसान होण्याचा संभव नाहीं. या दोन्ही गोष्टी फार उत्तम झाल्या आहेत याप्रकारा स्टेट सेक्रेटरीवरही बोटें मोडणार कीं काय? इंग्रजी अमलांत असल्या ज्या न्यायाच्या गोष्टी नेहमीं होतील तर इंग्रजी राज्यास वारावार नाहीं असेंच ह्मणावें लागेल. एकंदरीनें झालेला न्याय उत्तम झाला व नेटिवावराल एक भयंकर व बीभ आरोप टळला.

हिंदुस्थानांतून येणारा गहूं फार वाईट असतो, त्यांत भेसळ फार असते व त्या मानानें त्याची किंमत फार पडते ह्मणून या भेसळीचें कांहीं प्रमाण असावें तें शेकडा दोन टके असावें, त्याहून अधीक असल्यास त्याची किंमत कमी द्यावी ह्मणजे आपल्या लोकांस चांगला गहूं खावयास मिळेल याबद्दल विचार करण्या करितां हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरी येथील व्यापाऱ्यांची लवकरच एक सभा भरविणार आहेत असें ह्मणतात.

इजिप्सांतील एक बडा सरदार शकि एक सिनासी हा लढाईची मोठी तयारी करीत असून तो लवकरच खारटूम शहरावर हल्ला करणार आहे. याच्या मदतीस प्रसिद्ध महादीहाही बरोबर बरीच फौज घेऊन जाणार आहे. खारटूम शहरा जवळ इतक्यांत खात्रीनें लढाई होणार असें वराची ता. ७ मिन्हूची तार सांगते.

सरदेसाई माधवराव यांनीं पूर्व आफ्रिकेंत जर्मन लोकांची जी वस्ती होत आहे त्याबद्दल एक लेख प्रसिद्ध करून तो जर्मन प्रधान प्रिन्स बिस्मार्क यांजकडे पहाण्यास पाठविला होता. तो वाचून पुढील अभिप्राय पाठविला आहे तो:—

आफ्रिकेंतील रहिवाशी वसाहत करणाऱ्या जर्मन लोकांनीं कसें वागावें अशा बद्दलचे नियम करून तुह्मी पाठविले ते मोठ्या उत्सुकतेनें वाचले आणि तुह्मी सांगितलेले नियम जर वसाहात करणारे जर्मन लोक अंमलांत आणतील तर आफ्रिकेंतील रहिवाशी लोक व वसाहत करणारे जर्मन लोक ह्यांचा निकट संबंध होईल असें मला वाटतें. आफ्रिकेंतील लोकांच्या चालीरीती व स्वभाव जर्मन लोकांस अजून कळला नाहीं. आमच्या लोकांच्या वसाहती बद्दल तुह्मी इतकी कळ कळ दाखवितां याबद्दल मी तुमचा फार आभारी आहे.

सरदेसाई माधवराव यांनीं पाठविलेले नियम जर्मन भाषेंत भाषांतर करून पुन्हा प्रसिद्ध करण्याचें जर्मन प्रधान प्रिन्स बिस्मार्क यांच्या मनांत आहे असें ह्मणतात या हकीगती वरून सरदेसाई माधवराव हे नेटिव पिकर नसून जर्मन कालोचा एशनी पिकर झाले ह्मणावयाचे.

सरक आणि पेंजडे पहाण्या करतां रशियन जनरल कोमारफ हा निघाला आहे असें चार अलिकडील तार सांगते.

आमच्या इलाख्यांतील शेतकऱ्यांची काय स्थिती आहे याचा विचार करण्या करतां येत्या इस्टर सणांत मद्रास येथें प्रांतिक सभा भरणार आहे.

कोलंबो शहरांत पटकी उठली आहे.

किलातीनादीर नांवाचा एक लहानसा प्रांत इराणानें राशियास दिला असें ह्मणतात खरें असेल तर आमच्या गोरखून पाठविलेल्या हुंडीचा काय उपयोग झाला.

वेळोवेळीं आगी लागून बरेंच नुकसान होत असल्यामुळें त्रावणकोरच्या महाराजांनीं २०००० रुपये निराळे काढून ठेवले आहेत व त्यांतून गरीब लोकांच्या घरांवर कौलें घालावी असें ठरविलें आहे. ज्ञा. अ.

लोण्याची झाडें—मध्य आफ्रिकेमध्यें 'शी' नांवाचें एका झाडाचा शोध लागला आहे. त्याच्या फळाच्या बीयांच्या पासून लोणी निघतें. तें कठीण, सुंदर, व पांढरें असें असतें. आणि तें इतकें उत्तम असतें कीं, त्यांत अगा उष्ण हवेंत ही तें कोणत्याही क्षाराशिवाय व वर्षे पर्यंत टिकतें.

पुनियचे मजुरनर असें कळवितात कीं या प्रांतांत शेतांतील धान्य अगर फळ चोरल्या बद्दल जिवंत जाळून टाकण्याची भयंकर रीत आहे. ते लोक धान्य चोरणाऱ्या इसमाच्या नातेवाईकाकडून या शिक्षेस आमची मंजुरी आहे अशी दस्तऐवजावर सही करून घेतात व त्यास कडून स्वहस्ते विस्तव पेटवितात. चुकियांग या गांवीं नुकतीच अशी हकिकत घडली आहे कीं, एक इसम आपलें शेत राखण्यास्तव दुसऱ्याचें शेतांतून जात असतां त्यानें तेथील मक्याचीं कणसें चोरल्यावरून त्या शेत राख्यानें त्यास आपले मालकाकडे नेलें. त्या गरीब इसमाची आई आपली नातेवाईक मंडळी घेऊन त्या मालकास दया मागूं लागली. परंतु त्या मालकानें तिच्या हातें अखेरीस विस्तव पेटवून त्या मनुष्यास दहन केलें. पुढें ही बातमी सरकारी अधिकाऱ्यास कळून त्याने त्या धन्यास व नोकरास हयात सक्त मजुरी व देहांत शिक्षा अशा अनुक्रमें सजा दिल्या.

वैद्यकीय पाठशाळेंतील विद्यार्थ्यांनीं सरकारची नोकरी तीन वर्षे करून त्या काळानंतर त्यांस राजीनामा देऊन खानगी वैद्यकी चालविण्याबद्दल मोकळीक दिली आहे.

एक शिपाई एका शेटाचा कर्जदार होता. शेट जेव्हां त्याच्या पाठीस लागला तेव्हां शिपाई ह्मणाला. आमच्या आटव्या दिवशीं तुह्मी माझ्या घरीं या. कां तर मी आपल्या मुलीच्या लग्ना करितां रुपये कर्जी काढणार आहे त्यांतून तुमचेही रुपये फेडून देईन. शेटजी ठरावाच्या दिवशीं शिपायाच्या घरीं गेले. शिपायानें पूर्वीच दारावर वाजंत्री लोकांची दारावर योजना करून ठेविली होती. शेटजीला शिपायानें घरांत नेलें व वाजंत्र्यास सांगून पाठविलें कीं सूर जोरानें वाजवा. नंतर शेटजीस येथेच्छ टोणगे देऊन रुपये भरून पावल्याची पावती घेतली" अस्तु त्या वेळेपासून रात्रीं वाजाचा अवाज शेटजींना ऐकूं येई तेव्हां सकाळीं आपल्या मुनिमास विचारतात कीं "रात्रीं कोणाची पावती घेतली गेली वाटतें." न्या० सिं०

ग्रेटब्रिटनांत पैशाचा पूर वहात आहे. ग्रेटब्रिटनच्या पोस्ट मास्तर जनरलच्या आफिसांतील माहिती वरून मि० हेनकीर हीटन ह्मणतात कीं, आस्ट्रेलिया, अमेरिका, आफ्रिकेंतील केप आफ गुडहोप, नेटल वगैरे ठिकाणीं मोलमजुरी व्यापार धंदा, व इतर धंदे करण्यासाठीं जे इंग्रज लोक गेले आहेत त्यांच्या कडून १८८८ सालीं मनीआर्डरीनें किती पैसा आला तो पाहा. आस्ट्रेलियांत गेलेल्या १२९७११ लोकांनीं ४४७६१२ पौंड पाठविले ह्मणजे दररोज १२०० पौंड पाठविले. अमेरिकेंत ३९१६६२ लोक आहेत त्यांनीं १०४१९४८ पौंड पाठविले कानडा येथें ७८१४० लोक आहेत त्यांनीं २०७१६० पौंड पाठविले. आफ्रिकेंत ११४९१ लोक आहेत त्यांनीं १२८७७१ पौंड पाठविले एकूण बाह्य देशीं गेलेल्या ६११२११ लोकांनीं १८२२५९९८ पौंड ह्मणजे दररोज ५००० पौंड पाठविले असें होतें. हिंदुस्थानांतून विलायतेस दररोज १० लक्ष रुपये तरी सहज जात असतील. या वरून बाह्य देशांत गेलेल्या ब्रिटिश लकशा लोकांचें रक्तशोषण किती झपाट्यानें शोषित आहेत हें पाहून लोकांनीं भगून तरी डोळे उघडावे.

विचित्र अर्ज उर्फ जाहिरातीचें महत्व:—आस्ट्रेलियांतील व्हिक्टोरिया वसाहतीच्या पोस्ट मास्तर जनरलास मेलबार्न येथील मेसर्स हंटर आणि ट्रेड कंपनीनें असा अर्ज केला आहे कीं, या वसाहतीच्या तिकिटा मागें आमच्या जाहिराती छापूं दिल्या असतां पहिल्या सालीं १०००० दुसऱ्या सालीं १२५०० आणि तिसऱ्या सालीं १५००० पौंड आह्मी सरकारास देऊं. टिकिटास डिंक लावण्याच्या पूर्वीं त्यांच्या मागें आह्मी जाहिराती छापूं अशी कंपनीची कबुलायत आहे. हा अर्ज त्या वसाहतीच्या मंडळीस इतका पसंत पडला आहे कीं, त्या रकमेंत कांहीं जास्त करण्यासाठीं त्या कंपनीशीं पत्रव्यवहार सुरू करावा असा प्रधान मंडळानें पोस्ट मास्तर जनरलास हुकूम दिला आहे. इंग्रज लोक जाहिरातीस किती महत्व देतात हे वरील हकीकती वरून आमच्या लोकांस सहज कळेल.

नेपाळी फौजेची तयारी— मेजर जनरल गफ हे नेपाळ येथील रेसिडेन्सी फौजेची देखरेख करण्यासाठीं नुकतेच गेले होते. तेव्हां नेपाळ सरकारच्या पंढ स्वारांच्या १० प्यादरी आणि ८ पायदळ पलटणी काटमांडु येथें होत्या त्यांची कवाईत त्यांनीं पाहिली. निरनिराळ्या तऱ्हेची कवाईत त्यांनीं बिनचूक केली. हल्ला करण्याचा प्रकार त्यांनीं फार उत्कृष्ट केला. एकंदरीनें ब्रिटिश फौजेपेक्षां ती फौज रतिमात्र कमी नाहीं असें आपण मोठ्या आनंदानें ह्मणतो असें जनरल गफ ह्मणाले. व. नेपाळची फौज युद्ध प्रसंगीं इंग्रजांस आपल्यास उत्कृष्ट मदत होईल असें त्यांनीं उद्गार काढले नेपाळ सारख्या हिंदुस्थानच्या फौजेची ही वाहवा ऐकून कोणास बरें संतोष होणार नाहीं!

१० पट दंड व ६ पट शिक्षा—सुरत जिल्ह्यांत एकानें गैर कायदा दारु गाळल्या बद्दल खटला होऊन त्यास सुरतच्या से० क्ला० माजिस्त्रेटानें त्यास ४ रु. दंड, तो न दिल्यास ८ दिवसांची कैद अशी शिक्षा दिली. पुढें हें खटलें हायकोर्टापुढें गेलें तेव्हां त्या कोर्टानें २०० रु. दंड व ६ आठवडे कैद अशी शिक्षा वाढविली.

सोन्याच्या मोठ्या खाणी—क्यालिफोर्नियांत सोन्याच्या उत्कृष्ट खाणी सांपडल्या आहेत. त्या खाणी इतक्या भयंकर आहेत कीं, आगगाड्या, पोष्ट तार खाणावळी इस्पितळांतल्या चाकऱ्या भराभर सोडून देऊन लांबलांबून लोक तिकडे गेले आहेत. सांगटारंटा येथल्या खाणींतून ९००० डालर किंमतीची माती खाणींतून काढली. एकंदर या १५ खाणी आहेत. मोक्स लोक तर या खाणीच्या कामांवर बरेच दिवस आहेत. तो एक मनुष्य रोज ६ पौंड किंमतीची माती खाणींतून काढतो. सर्वजण कामास गेल्यामुळें तिकडील कित्येक गांव ओस पडले आहेत असें ह्मणतात. या हकीकती वरून सोनें पुन्हा स्वस्त होईल कीं काय असा संशय वाटूं लागला आहे! मु० स

माळव्यांतून पंजाबांत जाणाऱ्या अफूच्या प्रत्येक पेटीवर ११० रु. नवा कर ता० १ एप्रील पासून ठेवण्यांत आला आहे.

लंडन टाइम्सपत्राचे मालक छापखाना विकून टाकण्याच्या विचारांत आहेत असें ऐकतों. तसेंच एक स्वार नांवाचें पत्र बंद होणार.

मादक द्रव्यविक्रय बंद केला—युनायटेड स्टेट्समधील कित्येक प्रांतामध्यें कोणत्याही प्रकारच्या मादक द्रव्याची कोणीं ही विक्री करूं नये असा हुकूम फर्मावला आहे. क० त०

जोडे पाण्यांत भिजून कडक झाले तर रॉकेल तेल बोळ्यानें घासले असतां पुनः मऊ होतात.

शाळा व कॉलेजें यांकरितां मि० स्लेटर हे एक नीतिशिक्षणाचें पुस्तक लिहित आहेत.

लांकूड कापतांना जो भुसा पडतो त्यांत धुराचे कारखान्यांत जो ग्यास तयार निघतो, तो मिसळून विटा बनविल्या असतां चांगल्या सर्पण बनते. अशा तऱ्हेची गोवऱ्या कमी झाल्या आहेत, तेव्हां हे बरें.

नवीन चालू झालेल्या सक्कर (इयानस्टोर) धुराला १८९२००० रु० खर्च आला. हा पूल अगदीं नवीन धुरकपांचा उपयोग करून बांधिला आहे. सिंधूच्या पाण्यास केवढाही वेग आला तरी यास इजा न होण्याची योजना आहे. याच्या नंतरचे पूल पूर्वीच्यापेक्षां आहेत. के०

---

☞ हें पत्र अकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

to serve the Local Government for

सहामाही ,, १ ,, ८
डाकखर्च ,, ७ ,, ८
किरकोळ अंकास..........................

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु०१
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस........०१

annum in advance 5 Postage 13 as.
Per annum in arrears 7 "1Rs. 8 as.
Six monthly..........3 " 2 as.
Single copy................................. 2 as.

Advertisements
Below 10 lines...2Rs.
per line over10... 4as.
Repetition decline3as

# वऱ्हाडसमाचार.

# THE BERAR SAMACHAR.

VOL XXIII AKOLA MONDAY 29 APRIL 1889 NO. 16

वर्ष २३ अकोला सोमवार तारीख २९ माहे एप्रील सन १८८९ इ० अंक १६

## HYDERABAD RESIDENCY ORDERS.

### NOTIFICATION

No. 89.

*Dated 16th April 1889.*

An examination of candidates for admission to the Subordinate Medical Department, Berar Hospital Assistant Class, will be held at the Medical School, Chandarghat, and at Amraoti in Berar, on the 9th May 1889, and the ten candidates who obtain the highest number of marks out of those examined at both the centres will be elected students in the school. Candidates for examination at Amraoti should apply to the Sanitary Commissioner, Berar.

II. Before a candidate can present himself for examination he will be required to produce—

(1) A certificate of physical fitness signed by a Commissioned Medical officer, unless passed as fit by the Principal of the School.

(2) Satisfactory evidence that his age is between 15 and 19 years, and that he is of respectable family.

*Standard of Examination.*

III. In English a portion not exceeding thirty lines in length selected from a standard English author will be given as an exercise in dictation. Twenty errors in spelling, exclusive of technical or other unusual words, which will not be counted, will exclude the candidate from further competition. Candidates will be required to translate a short exercise from their own vernacular into English, and from English into their own vernacular.

*Native Language.*— To read and write their own vernacular with fluency and accuracy and should their own vernacular not be Urdu, they must be able to speak Urdu fairly well.

*History.*—The leading facts of the History of India.

*Geography.*—The Geography of India.

*Arithmetic.*—The first four rules of arithmetic, vulgar and decimal fractions.

IV. Students will receive the following stipends, which include hutting money:—

| | | | |
|---|---|---|---|
| 1st year | ... ... | Rs. 11 | per month |
| 2nd ,, | ... ... | ,, 12 | ,, |
| 3rd ,, | ... ... | ,, 13 | ,, |
| 4th ,, | ... ... | ,, 14 | ,, |

V. From the date of admission successful candidates will be considered Government servants, and will be required to study for four years at the Hydrabad Medical school and Hospital before passing their final examination.

VI. Hospital Assistants must engage to serve the Local Government for seven years in either the military or Civil Department. In both of these departments service will be confined to the Hydrabad Territory and the Hydrabad Assigned Districts, but should the Hydrabad Contingent ever be called upon to undertake duty outside these limits, all Hospital Assistans enrolled in the Military Department will be available for duty with that force wherever it goes.

VII. Civil Hospital Assistants will be held liable for military duty with regiments serving within the limits above mentioned in the event of necessity arising for with-drawing the Military Hospital Assistants from such regiments.

VIII. Successful candidates will, on admission into the Medical school, be required to sign the from of attestation in force in the Bengal presidency before a justice of the Peace.

IX. Appointment to the Civil or Military Department, when the candidate is pronounced duly qualified, must necessarily depend on the requirements of, and vacancies in, each department at the time; but should a candidate express a preference for either, endeaveur will be made to meet his wishes on first appointment or by subsequent transfer or exchange as opportunity and the welfare of the public service may permit.

The rates of pay sanctioned for Hospital Assistants are as shown below:—

CIVIL DEPARTMENT

1st Class Hosp tal Assistant of above 14 year's service Rs. 55. 2nd Class Hospital Assistant of above 7 year's service Rs. 35. 3rd Class Hospital Assistant of under 7 year's service Rs. 25. Passed Medical Pupil Rs. 16.

MILITARY DEPARTMENT.

1st Class Hospital Assistant of above 14 year's service Rs. 60. 2nd Class Hospital Assistant of above 7 year's service Rs. 40. 3rd Class Hospital Assistant of under 7 year's service Rs. 25. Passed Medical pupil Rs. 16.

( By order )
G. S. FORBES,
*Secretary for Berar to the Resident.*

वऱ्हाडसमाचार.

मित्ती चैत्र वद्य ३० शके १८११

## सिंहावलोकन.

( क्राफर्ड प्रकरणासंबंधानें चार उद्गार. )

क्राफर्ड प्रकरणाचा लोकांस फार वीट आला आहे तेव्हां आम्ही त्या प्रकरणांत हा अखेरचा लेख लिहीत आहों. गेल्या वर्षी जुलई महिन्याच्या १६ वे तारखेस क्राफर्ड साहेब सस्पेंड झाले त्यावेळेस ह्या प्रकरणाची प्रस्तावना झाली. कमिशन चौकशीसाठीं बसलें आणि कथानकास आरंभ झाला. क्राफर्ड चरित्र फार विचित्र आहे ह्मणून सारखे नऊ दहा महिने वर्तमानपत्रकर्त्यांस त्याचा पाठ ह्मणावा लागत असे. हें शनिमहात्म्य एकदांचे शेवटास लागलें तेव्हां कथानकाच्या उपसंहारा दाखल गोळा बेरजेनें चार शब्द लिहून वाचकांची रजा घेऊं.

'हांसत कर्म करावें भोगावें रडत तोचि परिणामीं' हें कलम बहुत करून सर्वत्र लागूं पडतें त्या प्रमाणें क्राफर्ड साहेबांस हीं तें लागूं पडलें ही गोष्ट यथान्याय झाली. कांहीं कृतकर्माचा क्राफर्ड साहेबांस झाडा द्यावा लागला आणि ते सध्यां एकंदरीनें आपल्या पापांची निष्कृति करीत आहेत हें पाहून कोणाही न्यायी आणि निस्पृही मनुष्यास समाधान वाटेल. परंतु क्राफर्ड साहेब लांच खाऊं न ठरले आणि कर्जबाजारी ठरले तरी त्यांच्या सारख्या थोर गृहस्थावर गुदरलेला प्रसंग मनांत आणिला ह्मणजे सहजीं सहृदय मनुष्यांस वाईट वाटेल. क्राफर्ड साहेबांचे सुखाचे दिवस भरले आणि म्हातारपणीं दुःखाचे दिवस पुढें उभे राहिलें आहेत. वैभवाच्या शिखरास पोचल्या नंतर क्राफर्ड साहेबांस एवढी अधोगति प्राप्त होईल हें वर्षभरा पूर्वी कोणाच्या स्वप्नींही नसेल. ही ग्रहदशा आली नसती आणि कालगति फिरली नसती तर क्राफर्ड साहेब अनुपम लौकिक व पेनशन संपादून स्वगृहीं विजयी ह्मणवून गेले असते. हल्लीं उनेडांत आलेले त्यांचे दोष व कृष्णकारस्थानें आह्मा विसरण्याची युक्ति काढिली असती आणि फक्त गुणग्राहीत्व पत्करलें असतें. खरोखरच, क्राफर्ड साहेब मोठे मुत्सदी असून आपल्या लोकांचे कैवारी असत. साहेबांची शहामत खरी कीं इतकीं वर्षे ते आपल्या कर्तबगारीनें आणि कलमबहादरीनें दक्षिणेंत गाजत होते. साहेब लेखणीचे फर्डे असे आहेत कीं त्यांच्या पुढें थोड्याच इंग्रजी आणि मराठी फडणीसांचा टिकाव लागेल. शहाणपणाच्या आणि मनगटाच्या जोरावर अधिकारी काय काय करूं शकतील हें दाखविण्यास क्राफर्ड साहेबा पेक्षां दुसरें उदाहरण फार विरळा! साहेबांच्या हातून वाईट कामें झालीं आहेत तशीं चांगलीही पुष्कळ कामें झालीं आहेत. क्राफर्ड साहेबांनीं अन्याय केला, नच्या वाईट मार्गांनीं लक्षावधि रुपये कमावले आणि उधळले तरी त्यांच्या हातून लोकांचे कल्याण झालें आहे तितकें करण्याची फारच थोड्या अधिकाऱ्यांस हातोटी साधेल. अन्याय करून ता लोकांस गोड वाटविणें आणि सुखावह करणें काम महत् दुर्घट आहे. प्रांतोप्रांतीं आपणांस पुष्कळ उदाहरणें आढळतील कीं तेथील युरोपियन अधिकाऱ्यांच्या मानानें क्राफर्ड साहेब रयतेचा छळ आणि नागवणूक करणारे नसून न्यायी आणि दयाळू आहेत. असे आमचे समशेर बहादुर क्राफर्ड साहेब वर्षभरांत रंक आणि खंक बनले हें लिहिण्यास फार वाईट वाटतें. साहेबांचा बोभाटा होण्यास आणि न्याय कोडतापर्यंत मजल पोचण्यास दोन मुख्य कारणें झालीं आहेत असें दिसतें. लांच घेणें-असें ह्मणणें कायदशीर होणार नाहीं-तर अन्यायानें पैसा गोळा करणें हें एक आणि दुसरें पैशाच्या टंचाईमुळें बेबंदनगरींतल्या झोटिंगशाइशी समतोल आपल्या अधिकाराचा अंमल गाजविणें हें होय. आपखुषीनें लोकांनीं दिलेला लांच बहुत करून लोकांच्या नजरेसमोर येत नाहीं कारण देणार आणि घेणार या दोघांचा फायदा झालेला असतो. पण अशा भलत्या आडमार्गानें वागण्यांत जुलूम होऊं लागला आणि लोकांच्या सहनशीलतेचा कळस झाला ह्मणजे हल्लीं प्रमाणें गोष्ट निकरास येऊन पोचतें. ही गोष्ट फार करून सर्वांच्या अनुभवांतली आहे तेव्हां अधीक पाल्हाळ नको. क्राफर्ड साहेबांचे ऐषआराम व सुखसंपत्ति वाढली आणि तशांत साहेबास कटिशूळाची व्यथा असे तेव्हां कुबेरास ही भीक लागण्यास आणि कवडी मालाचा मनुष्य बनण्यास काय उशीर आहे!

मोठ्या गृहस्थास आपत्काळ फार कष्टप्रद होतो त्याप्रमाणें क्राफर्ड साहेबांस बहतर्फी भोवेल यांत तिळमात्र संशय नाहीं. या बाबदींत सरकारचा ही नाइलाज आहे. न्यायाच्या दरबारांत दया माया क्षमा हीं नाहींत. कायदेकानूप्रमाणें क्राफर्ड साहेब लाचखाऊ ठरले नाहींत याचें आह्मांस मोठें नवल वाटतें तरी लाचखाऊ ठरून ही हल्लीं पेक्षां जास्त शिक्षा व्हावी असें आमचें म्हणणें नव्हतें. पेनशन नाहीं आणि कामावरून दूर केलें ही शिक्षा पुरेशी आहे कां कीं शहाण्यास चाबकाचा मार लागत नसतो. क्राफर्ड साहेब काळचक्राच्या फेऱ्यांत सापडले आणि कर्म केलें आहे तसें पुढें भरतील हा विचार मनांत आला म्हणजे आम्हांस जरी त्यांची कीव येते तरी ते आमच्या दयेस पात्र आहेत असें खात्रीनें म्हणवत नाहीं. परंतु क्राफर्ड साहेबांच्या पैशावर शेकडों युरोपियन लोकांनीं मजा मारल्या आहेत. नाच, बाल, मेजवानी

न्या इत्यादि अनेक वैनबाजी उडविल्या आणि ऐषआरामांचा उपभोग घेतला आहे त्या शाळू सोबत्यांनीं कृतज्ञतापूर्वक क्राफर्ड साहेबांस यथाशक्ति साह्य देणें आणि शांतवन करणें विहित आहे; कां कीं क्राफर्ड साहेबांचें कपाळीं भोक्तृत्व आलें आहे तेव्हां मदत करण्याची वेळ ही हीच होय. शिवाय दक्षिणेंतील बरेच संस्थानिक, सरदार मंडळी, रत्नागिरीचे फडके, मामलेदार, फडणीस अव्वल कारकून वगैरे मंडळी ह्या प्रसंगीं पुढें सरसावतील आणि क्राफर्ड साहेबांचें शांतवन व समाधान करतील असें आम्ही इच्छितों. साधेल त्या रितीनें पैशा परी पैशानें किंवा अन्य प्रकारची लागेल ती मदत क्राफर्ड साहेबांस देणें त्यांचें कर्तव्य आहे. क्राफर्ड साहेबांच्या हातून सरकार मार्फत कित्येकांचीं पिढीजादी इनामें परत मिळालीं आहेत, कित्येकांची वतनें मोकळीं झालीं आहेत, कांहीं-जणास मुबलक जागा वंशपरंपरेनें मिळाल्या आहेत, आणि कांहीं जणांच्या तर अवघ्या जन्मांत प्रालब्धाची रेषा उपटली नसती अशा परीनें ते धनाढ्य आणि अधिकारसंपन्न बनले आहेत. अशा तऱ्हतऱ्हेनें शेंकडों लोकांचे कोटकल्याण होण्यास क्राफर्ड साहेब सर्वस्वी कारण आहेत. असो, ह्या लोकांनीं सुधारीषण घ्यावें आणि साहेबांस आपली कृतज्ञता दर्शवावी हेंच ह्या प्रसंगास उचित होय. आतां ज्यांनीं क्राफर्ड साहेबांस प्रत्यक्ष रीतीनें धुळीस मिळविलें त्यांचें तें मुखावलोकन ही करणार नाहींत तेथें आमच्या वरील सूचनेचा भागच खुंटला आहे.

क्राफर्ड साहेबांचे लोकांत हंसें झालें तरी हांसणाऱ्यांनीं आपापलें वर्तन पायाशुद्ध ठेवण्याची खबरदारी घ्यावी आणि नंतर त्यांस हंसावें अशी आमची साविनय प्रार्थना आहे. 'कोणास कोणी हंसूं नये ' अशा मासल्याचा सज्जनगडावरून रामदासी उपदेश करण्यास आम्ही प्रवृत्त नाहीं; परंतु आम्हांस भिती वाटते कीं क्राफर्ड साहेबांस दोष लावीत हांसणाऱ्या खिदळणाऱ्या गृहस्थांपैकीं पुष्कळजण मशारनिल्हे साहेबांपेक्षां अस्सल लांचखाऊ आणि लांचदेऊ निघतील. आमचें ह्मणणें प्रथमतः वेडें वाटेल पण त्याच्या प्रत्यंतरा साठीं ज्यांनीं त्यांनीं आपापल्या मनांत शोध करावा. बहुतेकांस अनुभव येऊन चुकला असेल कीं, डाक्टरांचीं सर्टिफिकीटें मिळवितांना दामाजीपंतांचें सोळा आणे साह्य होतें. फौजदारी वारंटें बजावितांना पोलिस लोक छदामची पैदास झाली नाहीं तर काय काय तऱ्हा करितात हें सर्वांस माहीत आहे. जमी कारकुनाच्या वर्षांच्या मिळकतीचा आढावा काढण्यास पगाराचें त्रैराशिक बसत नसतें ही गोष्ट कांहीं नवीन नाहीं. रेलवेवर फाजील ओझ्याचें भाडें चुकविण्यासाठीं हमालास पानसुपारी पुष्कळांनीं दिली असेल. आगगाडींतून माल रवाना करिते वेळीं आणि उतरते वेळीं व्यापाऱ्यांनीं वळणें कसकशी बांधली असतात ती व्यापारी आणि स्टेशनवरचे अधिकारी यांच्या डोळ्या समोर असतील. कांहीं माजिस्ट्रेट आणि न्यायाधीश निवळ न्यायाचे सौदागीर असतात ह्मणून प्रत्यहीं शकडों वादी प्रतिवादी आपापला फैसला पटविण्यासाठीं मोहरबंद थैल्या मोकळ्या करितात ही गोष्ट नित्याच्या व्यवहारांत दृष्टीस पडते. हा लांचा दाखल देण्या घेण्याचा मोबदला सर्वत्र दुनियेंत चालला आहे आणि तो कमजास्त मानानें अक्षयीं चालेल. कांहींच्या मतें लांच देणें आणि घेणें हा एका प्रतीचा उदीम आहे. कायदेशीर वर्तन असलें ह्मणजे पुरें आहे मग ते नीतीस अनुसरून नसलें तरी चालतें. हा लोकांचा ग्रह कांहीं खोटा नाहीं तरी तो सरसकट सर्व लोकास लागू पडेल असा नाहीं. कांहीं लोक नीतीमान आणि प्रामाणिक निघतील आणि सचोटी हेंच त्यांचें मूळ ब्रीद असेल परंतु वर वर्णिलेल्या प्रकारचीं मनुष्यें पुष्कळ सांपडतील हें उघड आहे.

लार्ड रे साहेबांनीं कंबर बांधली म्हणून क्राफर्ड सारखा राक्षसी वृक्ष समूळ उपटून पडला. कांहीं मामलेदारांस सरकारचें पाठबळ मिळालें तेव्हां साक्षीपुराव्यानिशी क्राफर्ड प्रकरणें इतक्या थाटानें चाललें. क्राफर्ड कमिशनचें मत कांहीं ही होवो. क्राफर्ड साहेब लाच खाऊ आहेत किंवा नाहींत या संबंधानें फार थोड्यास संशय असेल. क्राफर्ड साहेब ह्मणतात म्हणूनच कमिशनरांस खात्री पूर्वक वाटलें कीं त्यांनीं गैरकायदा कर्जे काढिलीं आहेत. अपराध्याचा कबूली जबाब होता बेवड्याच अपराधाबद्दल तो दोषी ठरला. कमिशनर लोक हुशार शहाणे सुरते होते तेव्हां त्यांच्या ६७ दिवसांचा निकाल हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरी यांस मंजूर पडला आणि लार्ड रे साहेबांचे विचार त्यांस सयुक्तिक वाटले नाहींत हें यथास्थित झालें किंवा नाहीं याचा निर्णय सध्यां करण्यास कमिशनरांचा रिपोर्ट आणि गव्हरनर साहेबांचें मत हीं दोन्ही हीं इत्थंभूत आम्हासमोर नाहींत. लोक काय बोलतात व सर्वांचा समज लार्ड क्रासच्या निकाला संबंधानें काय झाला आहे हें आम्हीं वर ध्वनित केलें आहे.

क्राफर्ड साहेब खटल्यांतुन मोकळे झाले आणि त्या प्रमाणें लांच देणाऱ्या मंडळींचा परामर्ष लार्ड रे साहेब योग्य रितीनें घेऊन त्यांस मोकळे करतील. परंतु बिचारा हणमंतराव कारागृहांत आयुष्याचे दिवस काढीत आहे!! हणमंतराव क्राफर्ड साहेबांचे हातांत परीस बनले होते. हणमंतरावास निरोप पोंचला कीं क्राफर्ड साहेबांच्या बंगल्यावर थैली खुली झाली. कमिशनर लोक ह्मणतात कीं क्राफर्ड साहेबांस हणमंतरावाची पैसे पाठविण्याची गुरुकिल्ली माहित नव्हती ह्मणजे आपण हणमंतरावाच्या द्वारें लांच घेत आहों हें क्राफर्ड साहेबांच्या कधींच मनांत आलें नाहीं. हें मत खोटें ह्मणणें ह्मणजे मोठी पंचाईत आहे. पण कमिशनचें मत खरें असेल तर क्राफर्ड साहेब केवळ दुधखुळे आहेत असें ह्मणावें लागेल. क्राफर्ड कोण आणि काय आहेत हें आज काल अबालवृद्धांस महशूर आहे तेव्हां लार्ड रे साहेब सध्यांपर्यंत भोगलेल्या शिक्षेवरच हणमंतरावांचा मोक्ष करतील असें आह्मीं इच्छितों.

इंग्रजी न्यायाची मौठी मौज आहे! क्राफर्ड प्रकरण ही एक कादंबरी आहे म्हटलें तरी चालेल. पूर्वीं गोष्टी घडतात आणि त्याचे परिणाम दृष्टोस पडतात त्या पेक्षां न्यायासना समोर मूळच्या वस्तुस्थितीस निराळेंच स्वरूप येतें. बारिस्टरांच्या मसलतीनें कधीं कधीं मूळचा सर्व वृत्तांत ही पालटतो. हल्लीं न्यायाच्या कोडतांतून कायद्या प्रमाणें पळवाट किंवा धरपकड सांपडते किंवा नाहीं हें पाहण्या कडे उभयपक्षा कडील वकीलांचें लक्ष्य ओढवलें असतें. ही गोष्ट प्रतिपादण्याचा आशय हा कीं क्राफर्ड प्रकरणांत ही खरेपणा आणि कायदा यांची सांगड नाहीं. क्राफर्ड प्रकरण सर्व बाहेर आल्या नंतर आम्ही प्रसंगानुसार त्यांतलीं वादग्रस्त मतें लोकापुढें मांडणार आहों तरी वकीलीच्या पेषास मदत द्यावी आणि कोणी कसा कोटिक्रम लढविला आहे हें दाखविण्या पलिकडे आमच्या लिहिण्याचा कांहीं एक उपयोग होणार नाहीं.

---

## हैदराबादची जमाबंदी

---

निजाम सरकारची दौलत फार मोठी आहे पण त्या संस्थानास कर्ज हा भारी आहे. जमाबंदींत आंतबट्टा झाला ह्मणजे संस्थानचा पाय आंत आंत येऊं लागतो ही गोष्ट चालूं साळच्या जमाबंदीच्या अंदाज पत्रका वरून सहजी लक्ष्यांत येईल. हिंदुस्थानच्या सरहद्दीचें संरक्षण व्हावें आणि इंग्रजी राज्याचा पाया जास्त मजबूत व्हावा ह्मणून दोन अडीच वर्षांपूर्वीं निजाम सरकारनें तीन वर्षे पर्यंत सालिना वीस वीस लक्षाची देणगी हिंदुस्थान सरकारास कबूल केली तेव्हां आम्हांस निजाम सरकारचें औदार्य आणि राजनिष्टा हीं पाहून संतोष वाटला; परंतु आदा किती आणि व्यय किती याची ताळेबंदी न पाहतां कोत्या विचारानें हा उचल घेतली आणि दूरवर दृष्टी पोचविली नाहीं असा आमचा निजामसरकारवर तेव्हांपासून ठपका आहे. शिवाय लाट साहेबासारखे बडे बडे गृहस्थ हैदराबादेस पाहुणे असतांना पाहुणचार ह्मणून जो अतोनात खर्च होतो तो ही करणें रास्त नाहीं. कारण खर्चाचें प्रमाण वाढलें ह्मणजे करांचा बोजा वाढतो आणि प्रजेची निवळ अवहेलना होते. रयत सुखी तर सरकार सुखी हा नियम सदा सर्वकाळ मनांत वागवून वर्तन राखिलें तरच संस्थानांत अबादानी अक्षय्य राहील.

हैदराबादचे पोलिटिकल आणि फायनानशिअल फडणीस यांनीं चालू सालचा जमाबंदीचा तक्ता तयार केला आहे तो सर्वांस सुगम वाटेल आणि झटदिशी संस्थानची वस्तुस्थिती कळून येईल. ही गोष्ट खरी तरी त्यामुळें निजाम सरकारचा आब रहाणार नाहीं. झांकलेली मूठ सव्वा लाखाची असते त्याप्रमाणें कांहीं गोष्टी गुप्त ठेवणें फार महत्वाचें असतें त्याकडे फडनवीस मि० मेहदीअली यांची नजरचूक झाली असें दिसतें.

चालू हैदराबादच्या जमाबंदीच्या साली ह्मणजे सन १८८८ सालच्या आक्टोबरपासून वर्ष अखेरपर्यंत एकंदरीनें २३ लक्ष रुपयांची तूट पडेल असा अंदाज आहे. हा पैसा सावकारापासून कर्ज काढला पाहिजे आणि तशांत निजाम सरकारचे सावकार शेकडा नऊ व्याज घेण्याचा पिढीजादा हक्क सांगतात. वर्षारंभींच चौदा लक्ष रुपये कर्जाऊ काढले होते त्याची अद्याप बिलकुल फेड नाहीं. एका वर्षापूर्वी निजाम सरकारचें नवें कर्ज एक कोटी जवळ जवळ होतें; त्या शिवाय जुने अकरा कोट रुपये सावकारांचें देणें आहे. हें अकरा कोटींचें कर्ज सर्वथैव खरें आहे किंवा यांत कांहीं वाद आंकडा आहे याचा निर्णय करण्यासाठीं एक ( Debt Commission ) कर्ज कमिशन बसविलें आहे. ह्या कमिशन खात्याचा खर्च विनाकारण पडत आहे त्यास मुख्य कारण सरकारी देण्या घेण्याचा मुळीं ताळमेळ नाहीं.

हा ब्रह्म घोटाळा दूर करण्यास एक युक्ति योजिली आहे कीं साल अखेर खर्चवेंच भागेल इतकें कर्ज अगोदर काढावें आणि इंडिया गव्हर्नमेंट पेपर त्या कर्जानें विकत घ्यावे. ह्मणजे लागेल त्या वेळीं पैसा हातांत खेळतां राहील आणि राज्यकारभार सुयंत्र चालेल. ही युक्ति अंमलबजावणींत आली नाहीं आणि ती पुढें येऊं नये अशी आमची इच्छा आहे. भारी व्याजानें कर्ज गोळा करावें आणि नंतर गव्हर्मेंट पेपर मध्यें तो पैसा वाळवा हा निवळ द्राविडी प्राणायाम आहे व विशेष फलप्राप्तीचीही बहुतेक निराशा आहे असें दिसून येईल.

चालू जमाबंदी सालांत पाव कोटीवर तूट येण्यास दोन कारणें झालीं आहेत. पहिलें, सालमजकुरीं पावसाळा थोडा कमी असल्या मुळें जमिनीचें ऐन उत्पन्न कमी झालें आणि सुमारें आठ नऊ लक्षांची तूट पडली. बाकीची तूट खर्च वाढत चालल्या मुळें आली. यंदा खर्चाच्या अंदाजावरून गुदस्त साला पेक्षां सोळा लक्ष रुपये खर्च अधिक लागणार आहे. मि. मेहदीअली यांनीं काटकसर करण्यांत आपली शिकस्त केली तरी सर्व गोष्टी अद्याप चांगल्याशा जुळून आल्या नाहींत. मागील वर्षी पाऊणे चार लाखांचा खर्च लष्करी खात्यांतला कमी केला होता तो या साली पुन्हा त्या खात्यांतल्या सरकारकडे थकलेल्या पैशाची फेड करण्या साठीं वाढला आहे. बहुतेक सर्व जमाबंदीचा कारभार असा अव्यवस्थित झाल्या मुळें सुचविलेल्या सुधारणा होण्यास अनेक विघ्नें येतात तरी शाळाखात्यांत लागणाऱ्या खर्चांत कमतरता पडूं देत नाहींत इत[illegible] तर आणखी शाळा वाढवून शिक्षण [illegible] सर्व सामान्य लोकांस

मिळण्या साठीं नवीन नवीन उपाय योजीत आहेत ही गोष्ट पूर्णपणें आनंद वाटण्या सारखी आहे.

मुंबईच्या 'ग्याझेट' अन्हिक पत्रास एक गृहस्थ लिहितात कीं वऱ्हाडांत सरकारतर्फे फौजदारी खटल्यांतून निराळा 'पब्लिक प्रासीक्यूटर' नसतो. ही खरोखर मोठी उणीव आहे. खुना सारख्या सेशन खटल्यांत जिल्ह्याचे सुपरीनटेंडंट किंवा त्यांचे दुय्यम अधिकारी सरकारच्या मार्फत खटला चालवितात. कायदेकानूंत निष्णात अशा गृहस्थास कायमचे 'पब्लिक प्रासीक्यूटर' नेमण्याची अलिशान रेसिडेंट साहेब तजवीज करतील काय?

'डेकन मायनिंग' कंपनीं संबंधानें रेसिडेंट मि. हावेल साहेब यांनीं निजाम सरकारच्या वतीनें चांगली तरफदारी केली त्याबद्दल त्यांजवर 'स्टेट्समन' पत्रकर्त्यांनीं ठपका ठेविला आहे कीं, मि० हावेल साहेबांनीं दुसऱ्याचा नाश करण्याच्या बुद्धीनें हें काम पतकरलें होतें. खरें इंगित काय असेल तें असो. पण 'डेकन मायनिंग' प्रकरणांतला वाद मिटून निकाल लागत नाहीं असें वाटल्यावरून उभयतां दिवाण साहेब आणि मि. हावेल साहेब हे व्हाइसराय साहेबांच्या समक्ष भेटी साठीं कांहीं महिन्यां पूर्वीं जाऊन आल्याचें वाचकांस स्मरत असेल. सारांश हें उघड आहे कीं मि. हावेल साहेब आणि हैदराबाद दरबारचे कांहीं प्रमुख मुत्सद्दी नबाब या मध्यें सलोखा व एकमत नाहीं. अशा प्रकारचीं कारणें मि. हावेल साहेबांस हैदराबादेहून फर्लोवर जाण्यास आणि मि. फिट्स्पाट्रीक यांस आसामाहून आणण्यास झालीं असावींत असा लोकांचा समज आहे.

# The Berar Samachar

**MONDAY APRIL 29 1889.**

## A SATTA MEETING AT AMRAOTI.

A meeting of the chief Satta-floaters met at the Amraoti city Library to consider what steps should be taken regarding the opinion expressed by the Hyderabad authorities and Inspector General of Registration that sattas require to be stamped as agreements. It was resolved that a Committee should be appointed to take steps by way of petitioning government or otherwise as necessary, in the matter of stamping Sattas.

The sowcars in a body were of opinion that if the sattas were once taxed with stamp duty the Satta trade of Amraoti would be annihilated and in fact the principal trade of the native part of the town is the Satta trade. They maintain that the duty would be ruinous to their trade and Amraoti would lose much of its importance.

So last year we wrote about the Satta trade and we said that the effect of the Satta trade was mischievous and very far reaching. The peasantry was affected by it and the energy of the traders who would otherwise occupy themselves in other trades was misdirected so long as it remained in the Satta trade. The Satta trade is very temptingly lucrative and so long as public morality does not increase and more enlightened ideas about acquiring bread by industrial pursuits do not predominate, the Satta trade will go on. The Satta traders are trying to move the government to declare the immunity of Sattas from taxation. We believe, as the law now stands, the Sattas cannot be properly taxed for they are covered by the exemption clause in the schedule enumerating exceptions. But for all that we believe it would be in the interests of the general trade that Government ought to legislate and declare the Sattas as liable to be taxed with stamp duty. This could be easily done by adding a clause to that effect to the present Stamp Act. Whatever its defenders might say and argue the Sattas are transactions of a gambling nature and Government would confer a boon on the public to stop it if it can. At present the trade is indirectly encouraged as it is recognized by Government and made liable to local taxation. The dubious exemption clause is also encouraging. We would therefore solicit the attention of the authorities to the matter and to the necessity of special legislation regarding it.

### ( EDITORIAL NOTE )
### HIGH-HANDED POLICE ACTION

In October or November last a shroff of Amraoti and one or two others were called upon by the local Police to show them certain ornaments which they had purchased. They showed the ornments and the corresponding entries in their books. The Police was, it would appear, satisfied that the ornaments were under no suspicion of their being stolen property or any thing of that kind. One would expect that if those that possessed the ornaments were not criminally prosecuted for some offence in connection with the ornaments the ornaments would be returned in due course to those from whom they were taken. But the Police sent the ornaments to the magistrate as 'Lawaris' perperty i e ' ownerless ' property. The Magistrate calls upon the above named persons to prove that the ornaments belong to them. These men have after dancing attendance on the Magistrate more than once, show the entries in their books and say they bought the ornaments from another respectable Sowcar of the place and give out his name. The Magistrate refers these men to the District Magistrate who, it is said, issued notices as if the ornaments were 'Lawris' or ownerless property. Now if these facts are correct and we believe they are substantially correct, how can either the Police or the Magistracy justify their action? Can Police officials go and fetch other peo ple's property and send it on to a Magistrate as ownerless property; and is it right that the Magistracy should countenance this? It is monstrous to snatch a thing from a person and tell him that he must prove his ownership before he can get it back. We hope that the authorities concerned will take the proper steps in the matter so as not to add insult to injury as regards the owners of the ornaments.

The following is the telegram sent by the Sub-Committee appointed by the public meeting held at Akola to the Secretary to the Government of India.

" Please obtain sanction of H. E. the governor general in council to suspend the operation of the Hydrabad assigned Districts courts Law 1889 till the memorial of Akola towns-people is considered. In cases above Rs 500 the Law deprives the public of the right of a second appeal and is not in other respect at all suited to the wants of the People Memorial follows.",

## वऱ्हाड.

हवामान— या आठवड्यांत सरासरी इंच दीड इंच पाऊस पडला ह्मणून हवेंत थोडा गारवा आला आहे. मधून मधून वाराही चांगला सुटतो. कालऱ्याचा उपद्रव तुरळक आहे.

मि. जी. एस्. फार्बिस पोलिटिकल एजंट वर्ग २ रा आणि वऱ्हाड रेसिडेंटचे सेक्रेटरी यांस सहा महिन्याची रजा मिळाली आहे ती त्यांस एप्रीलच्या १७ वे तारखेपासून घेण्याची परवानगी मिळाली होती परंतु त्यांचे जागीं नेमलेले बेंगाल सिव्हिलसर्व्हिस मधील गृहस्थ मि० पिटर साहेब कामावर लवकर रुजूं न झाल्यामळें गेल्या आठवड्या पर्यंत त्यांस जातां आलें नाहीं.

वऱ्हाड शाळा खात्याचे डायरेक्टर राव बहादूर श्रीराम भिकाजी जठार हे पूर्वीं लिहिल्या प्रमाणें एक वर्षाच्या रजेवर गेल्या शुक्रवारीं रात्रीच्या गाडीनें पुण्यास गेले.

राव बहादुरांच्या रजेंत मि. जो. सी. एटकिन अकोला हायस्कूलचे हेडमास्तर यांस आफिशिएटिंग डायरक्टर नेमिलें आहे. नेटिवांस वऱ्हाडचे डायरेक्टर नेमण्याचा हिंदुस्थान सरकारचा ठराव आहे असें गृहीत केलें तरी वर्षभरा पूरत्या ह्या निवडणूकीनें त्या ठरावास प्रत्यवाय येतो असें आम्हांस वाटत नाहीं.

अलिशान मि. हावेल साहेब हे हैदराबादेहून जुलै अखेर रेसिडेंटच्या जागेवरून जात आहेत ह्मणून निजाम सरकारचे पोलिटिकल आणि फानाशिअल सेक्रेटरी नबाब मेहदीअली यांनींही आपल्या कामाचा राजिनामा हुजुरांत दाखल केला आहे.

गेल्या बुधवारीं येथील नेटिव लायब्ररीची सभा भरून दस्तूर माणिकशा यांस अध्यक्ष, रा. रा. हरी रामचंद्र रोहिणखेडकर बी. ए. यांस उपाध्यक्ष, आणि मि. सोराबजी मंचरजी व रा. रा. नारायण वामन हरकरे यांस सेक्रेटरी नेमण्यांत आलें आहे.

वाशिमचे नौलीस साहेब यांनीं आजारी असल्या मुळें सहा महिन्यांच्या रजा मिळण्या साठीं अर्ज दाखल केला आहे.

इलिचपूर येथील डेपुटी कमिशनराचे हेड क्लार्क रा. रा. बापूजी भिकाजी यांनीं सहा महिन्यांची रजा घेतली आहे. त्यांच्या जागीं जुडिशियल कमिशनरचे क्लार्क मि. थाय यांस नेमिलें. आहे. मि. थाय यांच्या वर्गावर्गींत रा. ग. हरीहर काशिनाथ, काशिनाथ यादव, आणि गणेश वासुदेव निमकर यांस परस्पर अनुक्रमें बढतीवर नेमिलें आहे.

कलकत्यास बाबू प्रताप चंद्रराय हे इंग्रजींत महाभारताचें भाषांतर आज अनेक वर्षें छापून प्रसिद्ध करीत आहेत. त्यांच्या सदुद्योगास निजाम सरकारांनीं मागें ४५०० रुपयांची मदत दिली होती. तींत त्यांनीं आणखी दोन हजारांची पुन्हा भर घातली असल्याचें समजतें.

राज्ञीपुत्र ड्यूक आफ कनाट यांच्या मुलाखती साठीं सर सालरजंग के० सी० आय० इ० हे नबाब मीर जहांदर अलीखान आणि मि० सोहारबजी दादाभाई या उभयतां समवेत गेल्या सोमवारीं गेले होते. प्रथम भेट झाल्या नंतर दुसरे दिवशीं राजपुत्रांनीं परत भेट दिली.

रा० रा० माधव काशिनाथ ओक यांस शिरसगांव बंड येथें २५ रुपयांवर नवीन शाळामास्तर नेमिले आहे. रा० ओक यांचा अभ्यास पाहिल्या बी. ए. च्या परीक्षेपर्यंत झाला आहे.

उमरावती येथील जमेदार, व्यापारी, शेटसावकार इत्यादि मंडळीची सभा भरली होती तिने व्हाइसराय साहेबाकडे तार केली आहे कीं मागाहून येत असलेल्या अर्जाचा विचार होईल पर्यंत नवीन 'वऱ्हाड दिवाणी कोडतांचा कायदा' तहकूब ठेवण्याची व्यवस्था व्हावी.

उमरावती सेशनच्या पाहिल्या मुकदम्यांत उतारवयाच्या एका बाईवर भर्तृहत्येचा आरोप होता. विषप्रयोग केला आहे असा तिचा कबूली जबाब पोलीस आणि माजिस्ट्रेट यांनीं नमूद करून ठेविला होता पण तिच्या प्रारब्धानें कालीजाच्या परीक्षेंत विषप्रयोग ठरला नाहीं. बाईस निरपराधी म्हणन सोडून दिलें आहे तेव्हां तिचा कबूली जबाब कसा कोणी काढिला याची सरकारांतून चौकशी होईल तर बरें.

दुसऱ्या सेशन खटल्यांत बडनेरच्या कसबिणीचा खून केल्या मुळें चारी अपराध्यांस काळे पाण्याची शिक्षा झाली. आणि तिसऱ्या खटल्यांतला बायकोच्या खुना बद्दल नवरा कबूल होता पण त्यास भ्रम झाला आहे म्हणून तीन महिनें इस्पितळांत पाठविलें आहे.

नवीन 'स्मालकाज कोडताचा कायदा' वऱ्हाडा करितां केला आहे तो बहुतकरून सर्वांस पसंत पडण्या सारखा आहे. या कायद्या अन्वयें फेर तपासणीचें अपील डेपुटी कमिशनर कडे होत जाईल तेव्हां उमरावती जुडिशिअल कमिशनर पर्यंत मजल करण्याची दगदग चुकली. किरकोळ फेरफार हो प्रत्यवाय घेण्या सारखे नाहींत.

## वर्तमानसार.

पाहरेकऱ्यास इषारा—थोड्या दिवसा मागें पुण्या जवळील खडकी येथील एका भागाचा पोलिस कान्स्टेबल रात्रीं पाहरा करीत असतांना गाढ झोपीं गेला. त्याच रस्त्यानें कांहीं गृहस्थ चालले होते त्यांनीं त्यास निजलेला पाहून हळूच उचलून बिनचूक जवळील थोड्या पाण्याच्या तळ्यांत फेंकून दिलें. खाडदिशी तो मनुष्य जागा झाला आणि मनांत ओशाळला. एक चकार न काढतां आपल्या पाहऱ्यावर झटकन उभा राहिला. असल्या प्रकारची समज बिनबोभाट मिळत गेल्यानें ठिकठिकाणचे पोलीस पुष्कळ शहाणे होईल.

मनुष्य प्राणी जन्मतः स्वतंत्र आहे तसा निखाणही आहे. नैसर्गिक स्वतंत्रता त्याला सोडावी लागते आणि स्वतांच्या सुखा साठीं सामाजिक बंधनांनीं तो स्वतांस आपखुषीनें बांधून घेतो. हा प्रकार खरा तरी दुसऱ्याचा बंदा गुलाम होऊन राहणें ह्मणजे मनुष्य आणि पशु कोटींच्या चळनवलनांत फरक उरला नाहीं. गुलामाचा व्यापार सुधारलेल्या राष्ट्रांतून अजीबात बंद झाला आहे आणि त्या राष्ट्रांचा सदोदित दीर्घ उद्योग अन्य अज्ञाणी राष्ट्रांतील बंद करण्या साठीं अव्याहत चालला आहे. आफ्रिकेंतील युरोपियन वसाहतींतून दिवसेंदिवस गुलामाचा व्यापार समूळ नाहींसा होण्यास कांहीं वर्षें लागतील तरी हल्लीं झांझिबारच्या गुलामांच्या व्यापारा संबंधानें पार्लमेंटांत मोठी चळवळ उडाली आहे. सरकारांतून योग्य मदत मिळेल तर मुंबईचे माजी गव्हरनर सर रिचार्ड टेंपल साहेब विडा उचलतात कीं तांबडा समुद्र आणि इराणचें अखात येथील आफ्रिकेंतील लोकांची गुलामगिरि अगदीं नाहींशीं करून टाकीन. माजी अखेरचे गव्हरनर फर्ग्युसन यांनींही या प्रकरणांत पुष्कळ उचल घेतली आहे. त्यांच्या मतें आफ्रिकेंतील गुलामगिरी बंद होण्यास जर्मनीशीं विलायत सरकारनें एकोपा केला पाहिजे.

आंत एक बाहेर दुसरे अशांतला प्रकार हल्लीं इंग्रजी आणि मराठी वर्तमान पत्रांतून दृष्टीस पडतो. सांवतवाडी संस्थानचे पोलिटिकल अधिकारी कर्नल वेस्ट्राफ विलायतेस गेले तेव्हां त्यांच्या तेथील अकरा वर्षांचे कारकिर्दीची फुशारकी मिरवितांना बांबेग्याझेट पत्रानें सांवतवाडी संस्थान इंद्राची अमरावती बनविली आहे. सुधारणेचा डंका वाजविण्यांत इंग्रजी पत्रांचें हातखंडा काम दिसतें. परंतु अंतस्थ स्थिती पहावी तों 'पुणेवैभव' ओरडतात कीं 'सांवतवाडी संस्थानांत बेदाद' आहे. सांवतवाडी हें फक्त नांवानेंच नेटिव संस्थान उरलें आहे कारण तेथें इंग्रजी अंमल मोठा करडा आहे. संस्थानचे मालक गादीवर बसण्यास लायक असून लायक नाहींत ह्मणून ठरविलें आहे. इंग्रजी मासलेवाईक न्यायकोडतें आहेत तरी तेथें अनर्थकारक बोभाटे आणि बखेडे चालले आहेत हें मोठें नवल आहे.

रा. रा. गोविंदराव चिमणाजी बुळे माजी तुकोजीराव होळकर यांचे जामांत यांजवर येथील माजिस्ट्रेट कोर्टांत फिर्याद झाली होती. ती अशी कीं, गोविंदराव यांणी आपली बायको तानु उर्फ मंजुळाबाई इजला मारहाण केली. रा. रा. गोविंदराव यांच्या १५-१६ बायका झाल्या. त्यांत ही तानुबाई शेवटी होय. इचें वय ९ वर्षांचें आहे व गोविंदरावाचें वय ४७ वर्षांचें आहे. नवऱ्याबरोबर कसें वागावें व त्यांणीं सांगितलेलें काम कसें बजवावें हें समजण्याचें ज्ञान तानुबाईस नसल्यामुळें ती गोविंदरावाच्या म्हणण्या प्रमाणें वागत नसे. म्हणून गोविंदराव तिच्या पाठींत व थोबाडांत चापट्या मारीत, व हा प्रकार मोठा अघटित आहे असें नाहीं. जेथें गांव आहे तेथें माहारवाडा आहेच. तशांतीलच हा नवरा बायकोचा प्रकार आहे. आणि असा खटला कोर्टापर्यंत जाणें हें अगदीच गैर होय. फिर्यादी यांणीं आपली अल्पवयी मुलगी गोविंदरावांस देऊन नंतर तिच्या करितां असा दुर्लौकिक होण्या सारखा प्रकार करणें बरें नाहीं. दी० बं०

“ जो जो रावा पडे तो तो पिंजऱ्यांत पडे ” अशी आम्हां लोकांत एक सामान्य म्हण आहे. त्या म्हणी प्रमाणेंच सध्यां हिंदुस्थानच्या पंचवीस कोटी जनसमूहाची सर्वांशीं स्थिति झाली आहे! आम्ही परांधीन परतंत्र, इग्लंडच्या ओंजळीनें पाणी पिणारे बनलों आहों. तेव्हां आम्हांस स्वसामर्थ्य, स्वमत व स्वाभिमान यांचा ठाव नाहींसा झाल्यासारखा जगांत भास होत आहे तो विदितच आहे. आमच्या राज्यकर्त्या इंग्लिश लोकांच्या सहवासानें व पाश्चिमात्य विद्येच्या बळानें अर्भका प्रमाणें आह्मी राज्यकर्त्यांजवळ ज्या ज्या मागण्या मागतों त्या त्यांचेकडून देणें तर होतच नाहीं. पण उलट वरील ह्मणी सारखी अवस्था होऊन आपले जास्त नुकसानीस पात्र होत आहों! कमिशनें नेमा, राष्ट्रीय सभेच्या बैठका करवा, पार्लमेंटापर्यंत अर्जाची भेंडाळी पाठवा, किंवा कोणतींही हितसाधनें योजा त्या हितसाधनांचा परिणाम आम्हांस अनिष्ट असाच होत आहे. न्या० सिं०

भावनगरच्या महाराजांचें औदार्य— काठेवाड प्रांतांत या सालीं अवर्षण पडल्यामुळें त्या भागांत पाण्याचा एव्हांपासून खडखडाट झाला आहे. तसाच भावनगरांत ही आहे. भावनगरापासून दोन मैलांवर गौरीशंकर नांवाचा मोठा तलाव आहे. महाराणी साहेबांच्या ज्युबिलीचें स्मारक ह्मणून भावनगरच्या लोकांस मोफत पाणी आणून आपण देणार असा महाराजांचा निश्चय होता. त्या निश्चया प्रमाणें संस्थानच्या इंजनेरानें नळ बांधून गावांत पाणी आणलें तें सोडण्याचा मोठ्या थाटाचा समारंभ गेल्या रामनवमीस झाला. सरकारी वाड्यांतून १०-१०॥ शेर वजनाची चांदीची घागर आणविली. जेथें पाणी सोडण्याचा समारंभ झाला त्याच्या जवळच एक विहीर आहे तिचे पाणी एक गरीब ब्राह्मणाची सवाष्णबाई ओढीत होती तीस महाराजांनीं बोलावून तिच्या हातांत ती घागर दिली आणि आपण चावी फिरवून पाणी सोडलें. घागर भरल्यावर ती तुला बक्षीस दिली आहे तूं घेऊन जा असें महाराजांनीं त्या बाईस सांगितलें. तेव्हां तीस क्षणभर हें स्वप्न तर नव्हे असेंच वाटलें. आतां भावनगरांत पाण्याची अगदीं चंगळ उडून गेली आहे.

ब्रह्मदेशाप्रीत्यर्थ हिंदुस्थान किती बुडाला! खालच्या ब्रह्मदेशासाठीं १८२६ सालीं पहिली लढाई झाली ती बद्दल हिंदुस्थानांस १३ कोट रुपये खर्च करावा लागला. पुन्हा १८५२ सालीं दुसरी लढाई झाली तिजबद्दल ५ कोट रुपये खर्च झाला. पण त्यांत स्वस्थता होण्यास बरोबर १० वर्षें लागलीं तेव्हां दरसाल दोन कोटी रुपये प्रमाणें २० कोटी रुपये खर्च झाला तो धरला ह्मणजे दुसऱ्या लढाईसाठीं २५ कोट रुपये खर्च झाला. वरचा ब्रह्मदेश खालसा करण्याकरितां फक्त ३० लक्ष रुपये खर्च होईल असा मूळ अंदाज होता. पण सन १८८६ सालापासून ह्या देशा प्रीत्यर्थ ८ कोटींवर खर्च झाला असेल असें भीतभीत अनुमान केलें तरी चालेल कारण गेल्या एकाच सालांत १८७५००० पौंड ब्रह्मदेशांकरितां खर्च झाला असें हिंदुस्थानच्या फडणविसांनीं फिन्यान्शियल स्टेटमेटांत सांगितलें आहे. श्रीमान ग्रेटब्रिटनानें स्वार्थ साधण्यासाठीं जमा आणि खर्चामध्यें ज्यांचे काडीमात्र अनुमत नाहीं अशा नेटिव लोकांस असें लुबाडावें हाच सुधारलेल्या काळाचा न्यायना?

सरजेम्स फर्ग्युसन व त्यांचा बुटलर-सरजेम्स फर्ग्युसन हे मुंबई इलाख्याचे गव्हरनर असतां त्यांनीं आपल्या बटलरास ३७५ एकर जमीन दिल्याचें एक प्रकर्ण मुंबई हायकोर्टापुढें आलें आहे. ह्या जमिनीची अशी मौज झाली आहे कीं ही जमीन मिठागर करण्याकरितां द्यावयाची आहे अशी मीठ खात्याच्या कमिशनरनी जाहिरात दिली होती, व इकडे फर्ग्युसन साहेबांनीं ती जमीन आपल्या बटलरास दिली. पुढें मीठ खात्याच्या कमिशनरांनीं तक्रार केली तेव्हां “ झालें तें झालें आतां त्याबद्दल कांहीं इलाज नाहीं ” असा फर्ग्युसन साहेबांनीं शेरा दिल्याचें बाहेर आलें आहे. शु. सु

रशिया व हिंदुस्थान यांच्या दरम्यान आफगाणिस्थान खिंड आहे हें सर्वत्र प्रसिद्धच झालेंच आहे. या खिंडीत पडलेल्या मोहोऱ्यावर इंग्लंड व रशियन हे दोघे ही जोर घालीत आहेत. या जोर घालण्यांतच एखादी वेळ ज्याचा जोर जास्त होईल तो मारामारीची सुरुवात करून अखेर विजयीही होईल हें उघडच आहे. अमिराचा मुक्काम हल्लीं चारीवलायत येथें आहे. बुखाऱ्याचा अमीर आपली फौज दरवेज येथें सांचवित असून काबुलच्या अमिराची व त्याची लवकरच चकमक झडेल असा लोकांचा तर्क आहे. रशियाची भयंकर तयारी पाहून अमीर फारच भिऊन गेला आहे. व इंग्रजांकडून काय साह्य येतें व सल्ला मसलत कशी सांगतात याची तो रात्रंदिवस वाट पहात आहे. त्यानें रशियाविरुद्ध आपल्या रयतेनें उठावें ह्मणून तो कयंकरी व पुराणीक ( मुल्ला लोक ) यांच्या मार्फत खटपट करीत आहे. या सर्व चिन्हावरून आफगाणिस्थानांत मोठी गडबड असून केव्हां कसा प्रसंग येईल याचा कांहींच अदमास होत नाहीं.

रशियानें आफगाणिस्थानच्या सरहद्दीवर सुमारें ६०,००० फौज गोळा केली असून हिरात शहरापासून इराणच्या हद्दीपर्यंत सर्व रस्ता आपल्या ताब्यांत करून घेतला आहे एवढेंच नव्हे, तर इराणच्या शहाकडून त्याच्याही राज्यांतील बराच भाग आपल्या करितां व्यापारास ह्मणून घेतला आहे. ही बातमी खरी असेल तर इराणच्या आखातांतून रशियास हिंदुस्थानच्या राजधानीच्या शहरावर येण्यास ही उशीर लागावयाचा नाहीं. आमचें सरकार रशियाच्या या खटपटीस अजाण असेल असें ह्मणवत नाहीं. तथापि या अंतक शत्रूंवर चाल करून त्याची गति कुंठित करण्यास आमच्या लोकांस परवानगी द्यावी व आमच्यावर भरंवसा असून तरी असूं द्यावा. एवढेंच आह्मी आपल्या कर्तव्यास जागून पुनः सरकारास सुचवितों. पु. वै.

## ढेंकूण हारक.

ढेकुणांचा उपद्रव नाहीं, असें ठिकाण क्वचितच असेल. तशांत हल्लींच्या गरमीच्या दिवसांत ढेंकणांच्या उपद्रवानें फारच त्रास सोसावा लागतो. ह्मणून मुद्दाम हें चूर्ण तयार केलें आहे. त्या सोबत दिलेल्या माहितीं प्रमाणें ह्या चूर्णाचा उपयोग केला असतां ढेंकणांचा उपद्रव नाहींसा होतो. [ १५ ] तोळे चूर्णाच्या पुडीची किंमत ( १० ) आणें, व्हा० पे० व ट० बंगी खर्चासह किं० १ रुपया पडेल. हें चूर्ण आह्माकडे विकत मिळेल.

भाऊ चिमणाजी महाबळेश्वरकर.
ठि० सोनार आळी, मुंबई.

नोटिस.

गिरधारी जगन्नाथ गऊड ब्राह्मण राहणार पातुरडे यांस. नोटीस देणार मुखत्यार सखाराम रोडाजी दंडे तर्फे जावलाबाई जवजे शिवजीराम आगरवाले राहाणार पातुरडे. नोटिशीनें असें कळविलें जातें कीं, तुम्ही आह्मापासून तसमे दोन जागा विकत रुपये १०० शंभरास घेतल्या व त्याजबद्दलचे रुपये आज पावेतों आदा झाले नाहींत. याजकरितां नोटिशीनें असें कळविलें जातें कीं, नोटीस पावल्या पासून आठ दिवसांत सदरहू जागा अगर जाग्याचे ठरलेले रुपये १०० शंभर आणून देऊन निकाल करावा. असें न केल्यास रीतीप्रमाणें काम चालवून अखेर निकाल होइपर्यंत जे नुकसान वगैरे होईल तें व ह्या नोटिशीचा खर्च असें सर्व भरून घेतलें जाईल. आतां असें प्रसिद्ध करून कळविलें जातें कीं, तुम्हां बक्षीसपत्र लिहून घेतलें आहे तें बक्षीसपत्र तुमच्या गुणानीं आम्ही सर्व प्रकारानें रद्द केलें आहे. कारण तुम्ही रुपये २०० चे दागिने घालण्यास घेऊन गेला व ते आम्ही तुम्हापाशीं मागितले त्यांवेळीं बक्षीस दिलें आहेत वगैरे बऱ्याच थापा मारिल्या त्या नंतर सदरहू दागिन्या बद्दल रीतीप्रमाणें काम चालवून सरकार मार्फत दिवाणी कोर्टांतून दागिने फिर्यादीचा खर्च वगैरे सर्वत्र घेतला आहे. या सर्व कारणावरून तू भला मनुष्य नाहींस हें उघड दिसतें. याजकरितां तुजला दिलेलें बक्षीसपत्र आम्ही रद्द केलें आहे हें तुजला कळावें. आतां तूं जी जागा विकत घेतलीस त्याचे रुपये १०० सदरील मुदतींत आणून देऊन निकाल करावा ह्मणून दिली नोटीस सही ता० २२ माहे एप्रील सन १८८९ इ०

(सही.)
सखाराम रोडाजी दंडे तर्फे
मु० जावलाबाई जवजे शिवजीराम आगरवाले रहाणार
पातुर्डे दस्तुर खुद.

☞ हें पत्र अकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे “वऱ्हाडसमाचार” छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.